|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १२ | अंक : ३ | सोमवार दि. ०८ जानेवारी २०२४ ते रविवार दि. १४ जानेवारी २०२४ | पाने : ८ | किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com | महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक | crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड


## मुलाशी भांडल्याने चिडला फार मामाने केले भाच्यालाच ठार

तलासरी/क्राईम रिपोर्टर

आजकाल माणसाला छोट्या छोट्या कारणांवरून राग येतो आणि मग रागाच्या भरात त्याच्या हातून काहीही घडू शकते. अशावेळी तो माणूस इष्ट मित्र, नातेवाईक किंवा अन्य कोणाचाही विचार करीत नसतो. त्यामुळे अशा सरफिऱ्या माणसापासून इतरांनी सावध रहायचे असते. खास करून एखादा माणूस गुन्हेगारी प्रवृत्तीचा असला आणि जेल भोगून आलेला असला कि मग त्याला कायद्याची भीती राहत नाही. धनु तालुक्यातील झारी फोंडा पाडा चंदू खरपडे ...पान २ वर

## अश्विनीच्या 'लव्ह स्टोरी'चा भयंकर शेवट झाला चिडलेल्या भावाने बहिणीचा गळा दाबून खून केला

भंडारा/क्राईम रिपोर्टर



बहीण -भावाचे नाते अत्यंत संवेदनशील असते. आपल्या बहिणीने मर्यादेत रहावे आपल्याला समाजात मान खाली घालायला लगे असे काही करू नये. अशी प्रत्येक भावाची इच्छा असते. पण आजकालच्या मुलींना हे पटत नाही. कारण वयात आल्यावर शाळा-कॉलेजपासूनच मुलं मुलींच्या मनात प्रेमाचा नाजूक अंकुर फुलू लागतो. त्यामुळे मुलींना मुलांबद्दल तर मुलांना मुलींबद्दल आकर्षण वाटू लागते. याच आकर्षणातून मुले - मुली एकत्र येतात आणि त्यांची प्रेम प्रकरणे सुरु होतात. मात्र अशा प्रेम प्रकरणात मुलींना घरच्यांकडून फारशी सवलत नसते. मुलीच्या प्रेमाला आई-वडील भिन्न भाऊ यांचा विरोध असतो. हा विरोध कधी जाती पातीच्या कारणावरून होतो तर कधी इतर कारणांवरून होत असतो. कारण आपल्या भारतीय संस्कृतीत मुलींवर अनेक बंधने असतात. काही मुली या बंधनाच्या मर्यादेत रहातात, तर काही मुली कुटुंबीयांविरुद्ध बंडखोरी करून त्यांची बंधने झुगारून देतात. सुरुवातीला टेन्शन होते पण नंतर मात्र आई -वडिलांचा राग शांत होतो. पण जो भाऊ असतो त्याला मात्र आपल्या बहिणीचे प्रेमसंबंध अजिबात सहन होत नाही. आपली बहीण हि आपल्या घरची इज्जत आहे. त्यामुळे तिने कधीही कुठल्या पुरुषाकडे पाहू नये, कुणाच्या प्रेमात पडू नये असे त्याला वाटत असते. अशावेळी बहिणीने जर भावाचे ऐकले नाही तर भाऊ कुठल्याही थराला जाऊ शकतो. भंडारा जिल्ह्यातील सोनुली गावात अशीच एक घटना घडली आहे. बहिणीच्या प्रेमाला विरोध असलेल्या भावाने तिची गळा आवळून निर्घृण हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी भावाला अटक केली आहे.





चारित्र्याच्या संशयावरून मोठ्या भावाचा बहिणीसोबत शाब्दिक वाद झाला. वादाचे पर्यवसान मारहाणीपर्यंत पोहचले, अशातच भावाने बहिणीचा गळा दाबला आणि तिचा मृत्यू झाला. सदर घटना भंडारा तालुक्यातील वरठी लगतच्या सोनूली येथे घडली. वरठी पोलिसांनी गुन्ह्याची नोंद करून आशिष गोपीचंद बावनकुळे (२२) याला अटक केली आहे. अश्विनी बावनकुळे (२०) असे मृत बहिणीचे नाव आहे. भंडारा तालुक्यातील वरठी नजीकच्या सोनूली या गावात रविवारी घडलेली ही घटना रात्री उशिरा उघडकीस आली. सोनूली येथे गोपीचंद बावनकुळे आपल्या परिवारासह अनेक वर्षापासून राहतात. ते एक मुलगा व मुलगी आणि पत्नी सोबत राहत असून आई वडील मोलमजुरी करतात. घटनेच्या दिवशी आई साकोली व वडील कन्हानला कार्यक्रमानिमित्त गेले होते. दरम्यान आशिष व त्याची बहीण अश्विनी दोघे घरी होते. दुपारी दोघात प्रेमप्रकरणावरून शाब्दिक वाद झाला. क्षुल्लक वादाचे पर्यवसान मारहाणीत झाले. वाद एवढा विकोपाला गेला की आशिषने अश्विनीच्या नाका-तोंडावर बुक्क्या हाणल्या. एवढ्यावरच न थांबता तिचा गळा आवळला. यात नकळत ती गतप्राण झाली. घटनेनंतर कुठेही वाच्यता न करता तो गावातच थांबून राहिला. आपल्या हातून घडलेले कृत्य लपविण्यासाठी त्याने लहान बहीण छतावरून पडल्याचे आई-वडिलांना सांगितले. सायंकाळपर्यंत गावातही शुकशुकाट होता. दरम्यान, पोलीस पाटीलांनी घटनेबाबत पोलिसांना सायंकाळी सूचना केली. पोलिसांनी घटनास्थळ गाठून मृतदेह शवविच्छेदन करण्यासाठी सामान्य रुग्णालयात हलवला. तो पर्यत पोलिस यंत्रणा घटनेचा शोध घेण्यास ...पान ६ वर

## चार गोष्टी सुनावताच संतापाने पेटला दारुड्या बापाने लेकीचाच जीव घेतला



पुणे/क्राईम रिपोर्टर

**दारूचे व्यसन असलेला माणूस कुटुंबासाठी तापदायक ठरलेला असतो. अशा माणसाचा वेळीच बंदोबस्त केला नाही तर त्याच्या हातून काहीही घडू शकते. कारण दारुडा माणूस दारूच्या नशेत असला कि त्याचा स्वतःवर ताबा रहात नाही. अशावेळी त्याला कुणी काही बोलले तर तो त्याचा जीव घ्यायलाही मागेपुढे पहात नाही. पुण्यातील वाघोलीमध्ये राहणार फकीर अट्टल दारुडा होता. कोणताही कामधंदा न करता तो दारू पिऊन पत्नी व २ मुलांना छळत असे. एके दिवशी दारुड्या फकिराला मुलीने दोन शब्द सुनावताच संतापलेल्या फकिराने तिच्या डोक्यात लाकडी दांड्याचे प्रहार करून तिची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी फकिराला अटक केली आहे.**

लोणीकंद पोलीस स्टेशनच्या हद्दीत नगर रोड वर फकीरा गुंडा दुपारगुडे हा आपल्या पत्नी आणि मुलासह राहयला आहे.तो मुळचा सोलापूर जिल्हयातील असून गेल्या काही वर्षापूर्वी तो कामा निमित्य पुण्यातील वाघोली येथे आला.त्याच्या घरची परिस्थीती तशी बेताचीच फकीर हा सुरूवातील हमालीचे काम करीत होता. हमालीचे काम करीत असताना त्याला दारू पिण्याचे व्यसन लागले. त्या दारूच्या व्यसनात तो इतका बुडला की, दिवस रात्र तो दारू पिऊन बायको मुलांच्या बरोबर भांडण काढून त्यांना मारहाण ही करीत होता. त्याची बायको तर त्याच्या दारूच्या व्यसनाला इतकी कंटाळलेली होती की,ती त्याच्या बरोबर भांडण करून आपल्या माहेरी जात होती. त्यामुळे तर फकीर हा जास्तच चिडत होता. हल्ली तो कोणताही कामधंदा करीत नव्हता. दारू पिणे आणि निवांत पडून राहणे एवढेच करीत होता. त्यातच तो दारू पिऊन पिऊन सारखा आजारी ही पडत चालला होता. त्याची मोठी मुलगी अक्षता ही या वर्षी १०च्या वर्गात शिकत आहे.ती तिच्या आभ्यासाकडे लक्ष देत होती.परंतु तिचा आभ्यास नीट होत नव्हता. सारखे आई वडिलांचे भांडण ऐकून ती ही त्रासलेली होती. वडिलांच्या तोंडात तर सारखे शिव्याच असायच्या. मुलीला काय लागते, मुलगा काय करतो याकडे त्याचे ...पान २ वर

## राम राम केला म्हणून जाब विचारायला गेला भाजपच्या मुन्ना यादवचा गावातच गेम झाला

लातूर/क्राईम रिपोर्टर



मयत मुन्ना यादव

**जेंव्हा दोन इसमांमध्ये वाद असतो तेंव्हा त्या वादातून दोघांमध्ये नेहमी ठासून असते. एकमेकांकडे रागाने बघणे शिवीगाळ करणे यासारख्या गोष्टी होत असतात. पण आपल्या दुष्मनाने अचानक दारात येऊन रामराम केला, तर त्याचा हेतू आपल्याला खिजवण्याचा होता असे वाटू लागते. आणि मग त्यातून वादाची ठिणगी पडते. लातूर जिल्ह्याच्या औसा तालुक्यातील होळी गावात रस्त्याच्या कामावरून भाजप कार्यकर्ता मुन्ना यादव व त्याच गावातील प्रकाश जाधव याच्याशी वाद होता. असे असताना प्रकाश जाधव याने मुन्ना यादव यांच्या घर समोर जाऊन राम राम केला. याचा यादव कुटुंबियांना राग आला आणि याच रागातून ते जाधव याच्या घरी जाब विचारायला गेला. यावेळी प्रकाश जाधव याने मुन्ना यादव व त्याच्या भावावर चाकूने वार केले. या मुन्नाचा जागीच मृत्यू झाला, तर त्याचा भाऊ जखमी आहे. या प्रकरणी पोलीस फरारी आरोपीचा शोध घेत आहेत.**

गावातील राजकारण आणि जमिनीचा वाद यातून कायमच खटके उडत असतात. वाद किरकोळ असतात नंतर वाद विकोपाला जाऊन खूनही होतात,काहीसा असाच प्रकार लातूर जिल्ह्यातील होळी या गावात झाला आहे. नमस्कार का घातला? ...पान ६ वर

## काम करताना डोक्यात घर लुटण्याचे विचार शातीर सुताराने केली सोनाराचीच शिकार

अमरावती/क्राईम रिपोर्टर



मयत संजय

**घरात कामासाठी येणाऱ्या कारागिरांपासून घरमालकाने सावध रहायचे असते. कारण कधी कधी काही कारागिरांची घर मालकाच्या तिजोरीवर नजर असते. त्यामुळे पैशासाठी ते कोणत्याही थराला जाऊ शकतात. तिवसामध्ये रहाणाऱ्या संजय मांडले या सोनाराने घराचे काम काढले होते. त्यासाठी काही सुतार त्याच्या घरी येत असत. त्यातीलच एक होता रोशन तांबटकर! रोशनची संजय मांडले यांच्या पैशावर आणि दागिन्यांवर नजर होती. एके दिवशी घरात कुणी नसताना ऍडव्हान्स मागण्यासाठी तो संजयकडे गेला. पण त्यांनी नकार देताच संतापलेल्या रोशनने डोक्यात लाकडी दांड्याचे प्रहार करून त्यांची हत्या केली. हत्येनंतर त्याने पोलिसांना चकवण्याचा प्रयत्न केला. पण पोलिसांनी त्याच्या मुसक्या आवळल्या.**





व्यवसाय किंवा कामाच्या निमित्ताने काही लोकांची ओळख होते. नेहमीच्या भेटी-गाठीतून जवळीक वाढते. काही वेळा घरोबाही निर्माण होतो. साहजिकच एकमेकाबद्दल बरीचशी माहितीही होते आणि परिस्थितीचा अंदाज येतो. मग काही जणांची नियत फिरते. विश्वासाने ज्या घरात गेले, त्याच घराचा घात करण्याचा अविचार मनात येतो. अलिकडे तर माणसातील सैतानी वृत्ती जास्तच उफाळून आली आहे. स्वार्थासाठी कोणाचाही घात करण्याची, जीव घेण्याची वृत्ती वाढत आहे. याचेच दुर्दैवी उदाहरण अमरावतीमध्ये दिसून आले. कामासाठी ...पान २ वर

## प्रेयसीच्या चारित्र्यावर संशय आला अखेर प्रियकराने तिचा खून केला

इचलकरंजी/क्राईम रिपोर्टर



मयत सुरेखा

**अनैतिक संबंधात प्रियकर किंवा प्रेयसी स्वतःची खरी माहिती सांगत नाही. केवळ मौजमजा सुरु असते पण मौजमजा करण्याच्या एकाच हेतूने एकत्र आलेल्यांचे संबंध जास्त दिवस टिकत नाहीत. इचलकरंजीत भाड्याच्या घरात राहणाऱ्या सुरेख सोलंकर व सचिन माने यांच्या बाबतीतही तसेच झाले. दोघांचीही लग्न झालेली होती, पण हि माहिती दोघांनी एकमेकांपासून लपवूंन ठेवली होती. सुरेखाला सचिन बरोबर लग्न करायचे होते, पण तो तिला खेळवत होता. त्यातच तिच्या चारित्र्याबद्दल त्याला संशय येऊ लागला आणि याच संशयातून झालेल्या भांडणात त्याने सुरेखा हिची गळा दाबून हत्या केली.**

शिरोळ तालुक्यातील चिपरी येथील सुरेखा सोलनकर ही कामानिमित्य सांगली येथे राहत असताना सचिन माने बरोबर तिची ओळख झाली. त्या ओळखीतूनच त्या दोघांचे प्रेमसंबंध जुळले. सुरेखाचे आई वडिल व भाऊ हे जत तालुक्यातील अंकले येथे राहयला आहेत. सुरेखाने शिरोळ तालुक्यातील राजु सोलनकर याच्याशी लग्न केले असल्याने ती त्याच्याबरोबर ...पान २ वर

## दारुड्या मुलाने आयुष्याची माती केली बापानेच त्याच्या हत्येची सुपारी दिली

नाशिक/क्राईम रिपोर्टर



मयत किशोर

**काही माणसे इतकी संवेदनशील असतात कि त्यांना एखाद्या गोष्टीचा संताप अनावर झाला कि मग त्यांचा स्वतःवर संयम रहात नाही. अशावेळी ती माणसे नात्यागोत्याचा जराही विचार करीत नाहीत. तसे पाहता वृद्ध आईवडिलांना त्यांच्या उत्तर वयात आपल्या मुलांकडून खूप अपेक्षा असते. पण काही मुले म्हाताऱ्या आई-वडिलांचा आधार बनण्याऐवजी त्यांच्याच जीवावर ऐतखाऊ बनतात आणि त्यांच्याकडून आपली व्यसने पूर्ण करण्यासाठी त्यांचा छळवाद करतात, चांदवड तालुक्यातील खडकजांब गावातील किशोर उशीर हा त्यापैकीच एक होता. त्याला दारूचे व्यसन होते. त्यामुळे त्याची पत्नी त्याला सोडून गेली. तेंव्हापासून दारूसाठी तो वडिलांना त्रास देत होता. अखेर नाईलाजाने बापानेच मुलाच्या हत्येची सुपारी देऊन त्याची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी सर्व आरोपीना अटक केली आहे.**



नाशिक जिल्ह्य तालुका चांदवडमधील खडकजांब या गावामध्येदगू जयराम उशीर हे आपली पत्नी मीनाबाई, मुलगा किशोर, सून माधुरी व लहान मुलगा दादू यांच्यासह रहातात. त्यांचा मुलगा किशोर हा नाशिक परिसरातील सातपूर येथील कार्बन कंपनीत ...पान ६ वर

## सहन झाला नाही तिला सिगारेटचा धूर त्याच धुराच्या वादातून पती झाला दूर

मुंबई/क्राईम रिपोर्टर

**सध्याचे वातावरण खूप वाईट आहे. मुंबईसारख्या शहरात कधी कुणाचे काय होईल याचा नेम नाही. कारण इथे प्रत्येकजण मुजोरीने वागत असतो त्याला दुसरा कुणी काही बोललेलं सहन होत नाही त्यातून वाद होतात आणि या वादाचे गंभीर घटनांमध्ये रूपांतर होते. इथे भांडणाची शुल्लक कारण पुरेसे असते. अशावेळी भांडण मिटले तर ठीक पण वाढले तर मात्र त्यातून एखाद्याचा जीव जाऊ शकतो. सिगरेटचा धूरामुळे थोडासा त्रासदायक असला तरी तो त्या धुरामुळे झालेल्या भांडणात एखाद्याचा जीव जाऊ शकतो, यावर कुणाचाही विश्वास बसणार नाही. पण मुंबईच्या वांद्रे परिसरात असे घडले आहे.**

रस्त्याने जाणाऱ्या एका जोडप्याला तिथे सिगारेट ओढत असलेल्या इसमाच्या सिगारेटचा धूर सहन झाला नाही, त्याने याबाबत सिगारेट ओढणाऱ्याला जाब विचारला व माझ्या पत्नीला तुझ्या सिगारेटच्या धुराचा त्रास होतोय असे सांगितले. या शुल्लक कारणावरून दोघांमध्ये भांडण झाले. यावेळी सिगारेट ओढणाऱ्याच्या बाजूने एक महिला आणि एक तरुण आला आणि सर्वांनी मिळून जाब विचारणाऱ्याला ठार मारले. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. आजकाल शुल्लक कारणावरूनही हत्या होत आहेत. सिगारेटच्या ...पान ६ वर

## ७ वर्षाच्या भावाला होता कबुतरांचा लळा संतापलेल्या चुलत भावाने आवळला गळा

अकोला/क्राईम रिपोर्टर

**आजकाल आई-वडिलांचे मुलांकडे लक्ष नसल्याने बालवयातच मुलांचे धाडस वाढते व त्यांची पावले गुन्हेगारीकडे वळतात. त्यांना कायदा किंवा पोलिसांची अजिबात भीती नसते. रागाच्या भरात ते कोणत्याही थराला जाऊ शकतात. आई-वडिलांनी मुलांवर चांगले संस्कार केल्यास त्यांना चांगले वळण लागते. चुकीच्या मार्गाने त्यांची पावले पडत नाहीत आणि मुख्य म्हणजे आपण काही केले तर आपले आई-वडील आपल्याला कठोर शिक्षा देतील अशी भीती त्यांच्या मनात असते. पण ज्या मुलांच्या मनात अशी भीती नसते ती मुले बेधडक काहीही करू शकतात. अकोल्यात कबुतरावरून झालेल्या वादात एका १७ वर्षाच्या मुलाने आपल्या ७ वर्षाच्या चुलत भावाची गळा दाबून हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.**



कबुतर पकडण्यासाठी शेतात गेला असता तेथे झालेल्या वादानंतर सात वर्षीय मुलाचा गळा आवळून खून केला. त्यानंतर मृतदेह शेतातील विहिरीत टाकून दिला. १६ दिवसांनी मृतदेह विहिरीत आढळून आला. मुलाचा खून गळा आवळून झाल्याचे निष्पन्न झाल्यानंतर मारेकऱ्याला शोधण्याचे मोठे आव्हान पोलिसांपुढे होते. अखेर हा खून मृतकाच्या विधिसंघर्ष १७ वर्षीय चुलत भावानेच केला असल्याचे गुढ उकलण्यात स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांना यश आले. अकोला जिल्ह्यात नव्याजे रुजू झालेले पोलिस अधीक्षक बच्चन सिंह यांचे नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेने ...पान २ वर

08 TO 14 JANUARY 2024 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 1/6/2024 7:37 PM Page 1



पान १ वरून...

## मुलाशी भांडल्याने चिडला फार...

हा पत्नीच्या खुनात तुरुंगाची हवा खाऊन आलेला होता. त्यामुळे तो निर्ढावलेला होता. गाडी वेगाने चालवल्याच्या कारणावरून चंदूच्या मुलाचे चंदूचा भाचा देवराम याच्याशी भांडण झाले. याच कारणावरून चंदूने आपला भाचा देवराम  याची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.  मुलगा, पुतण्या आणि भाच्यामध्ये झालेल्या किरकोळ वादात चुलत मामाने भाच्याचा खून केल्याची धक्कादायक घटना तलासरी तालुक्यात घडली आहे. याप्रकरणी तलासरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून तीन आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे. यातील मुख्य आरोपीने यापूर्वी आपल्या पत्नीच्या खुनाच्या गुन्ह्यात कारावास भोगला असून त्याने भाच्याचा खून अगदी शिताफीने केल्याचे समोर आले आहे. तलासरी तालुक्यातील झरी फोंडा पाडा येथील देवराम रघ्या जवलिया ३० हा आपल्या वडिलांसह मुंबई येथे मासेमारी बोटीवर काम करत असून काही दिवसांसाठी आपल्या घरी आला होता.

दरम्यान चुलत मामाची मुले प्रदीप खरपडे ३१ आणि विकास खरपडे वय २३ यांच्यासह शनिवारी दुपारी ३ वाजता घरातून बाहेर गेला असून रात्री ८ वाजता घरी परतला. त्यांनतर देवराम याने वाहन जोरात चालवल्याच्या मुद्यावरून तिघांमध्ये वाद होऊन झटापटी सुरू होती. दरम्यान प्रदीपचे वडील चंदू खरपडे ५३ याने मागून येऊन देवरामच्या मानेवर चाकूने वार केला. याविषयी आरडाओरडा झाल्यानंतर परिसरातील लोकांनी जखमीला तलासरी शासकीय रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी देवरामला मयत घोषित केले. याविषयी तलासरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी रात्री उशिरा जंगलात पळून गेलेल्या चंदू खरपडे या सराईत गुन्हेगारासह दोघांना ताब्यात घेतले असून त्यांना रविवारी न्यायालयासमोर हजर केले असता. त्यांना चार दिवसाची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

## चार गोष्टी सुनावताच संतापाने पेटला...

अजिबात लक्ष नव्हते. घरात नेहमी भांडण तंटा हा होता. मुलगी अक्षता ही १६ वर्षाची असल्याने तिला चांगले वाईट समजत होते. वडिल दारू पिऊन आपल्या आईना मारहाण करून त्रास देत आहेत याची तिला जाणीव होती.त्यामुळे ती ही वडिलांच्यावर चिडत होती. ती त्यांना बाबा तुम्ही दारू पिऊ नका, घरात भांडण काढू नका असे सांगत होती. पण तो मात्र कोणाचेच काही ऐकत नव्हता.आपले तेच खरे करीत होता. उलट तो बायकोला मुलीला तुम्ही मला पोटाला घालत नाही, खर्चाला पैसे देत नाही असे म्हणून त्यांनाच दमदाटी देत होता. त्याची मुलगी त्याच्या व्यसनाला कंटाळलेली होती.ती तर बाबांना किती सांगणार होती. घरातील भांडणाने तिची दमछाक होत होती. तिचे आभ्यासात लक्ष लागत नव्हते.फकीर हा कोणाचेच काही ऐकत नसल्याने सांगणाऱ्याची अडचण होत होती.त्यामुळे घरातील भांडणे ही नित्याचीच होऊन पाचवीलाच पुजलेली होती. हल्ली फकीर हा काम करीत नसल्याने त्याची बायको व अल्पवयीन मुलगा कामाला जात होते. त्यावरच त्याचा उदरनिर्वाह चालू होता. त्यातच रोज फकीर हा दारूला पैसे बायको आणि मुलाकडे मागत होता. दारू प्यायला पैसे दिले नाही तर भांडणे ही ठरलेलीच होती. सगळा विस्कोट बाजार होता. त्याच्या बायकोला काय करावे आणि काय नको असे झाले होते. आपल्या आईची हालत फक्त मुलगी अक्षदाच समजत होती. आपली आई घर कसे चालविते. किती काटकसर करते आणि बाप नुसता दारू पिऊन राहतो.त्याचा नुसता घरादाराला तापच आहे याची जाणीव तिला होती.त्यामुळे फकीर हा जास्त दारू पिऊन आला की त्याला ती तुम्ही दारू पित जावू नका काही तरी काम धंदा बघा.आईला किती त्रास देता असे म्हणत होती. त्यामुळे मुलगीचे सांगणे त्याला टोचत होते. उलट तो तिला तुघे तु बघ मी काय करायचे ते करतो असे म्हणत होता. तिच्याबरोबर ही भांडण काढून तुझे लग्न लावून देतो म्हणजे मी ही रिकामा आणि तु ही रिकामी असे म्हणून तिलाच गप्प करीत होता. बुधवार दि.३ जानेवारी रोजी सकाळपासूनच फकिरा हा दारू पिऊन टल्या होता.दुपारी १च्या दरम्यान तो दारूच्या नशेत घरात जेवायला आला.त्याची बायको आणि मुलगा हे त्यावेळी कामानिमित्य बाहेर गेले होते. फकिर हा ज्यावेळी दारूच्या नशेत घरात आला त्यावेळी अक्षदा ही आभ्यास करीत होती. दारूच्या नशेत तो आल्या आल्या मला जेवायला वाढ असे त्याने घरात बायको आहे असे समजून सांगितले. परंतु त्याची बायको आणि मुलगा हे दोघेजण बाहेर गेल्याचे त्याला माहित नव्हते.बापाला दारूच्या नशेत बघून अक्षदा ही चिडली. काय बाबा तुम्हाला किती वेळा सांगितले तरी तुम्ही काय ऐकत नाही. या कारणातून त्या दोघांत वाद सुरू झाला. मी काढलेली मुलगी मलाच शहाणपणा शिकवते.याचा त्याला राग आला.रागाच्या भरात तो मुलीला मारायला गेला.तो तिला मारहाण करताना त्याने बाजुलाच पडलेला लाकडी दांडका उचलला आणि अक्षदाच्या डोक्यात जोरात हाणाला. तिच्या डोक्यातून भळाभळा रक्त येवू लागले. ती बाबा तुम्ही मला मारले म्हणत ओरडत जमीनीवर खाली पडली. त्यातच ती बेशुध्द पडल्यावर दारूच्या नशेत असलेला फकीर हा शुध्दात आला. आपण काय करून बसलो याची त्याला जाणीव झाली. तो ही अक्षदाच्या डोक्यातून रक्त येत असल्याचे बघून रडत रडत खाली बसला. त्याच्या रडयाने बाजुलाच राहत असलेला त्याचा भाऊ आणि शेजारी जमा झाले. त्यांनी त्याला न विचारताच जखमी असलेल्या अक्षदाला जवळच्या दावाखान्यात नेले. या घटनेची माहिती अक्षदाच्या आईला आणि भावाला ही देण्यात आली. ते दोघे घरात येईपर्यंत आता आपले काही खरे नाही हे ओळखून घरातून फकीर हा पळून गेला. इकडे दवाखान्यात नेलेल्या अक्षदाचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे तेथील डॉक्टरांनी नातेवाईकांना सांगितले.दारूच्या नशेत आपल्या १६ वर्षाच्या मुलीला बापाने मारून टाकल्याची माहिती समजली असल्याने आजुबाजुचे लोक ही घटनास्थळी दाखल झाले. कुणी तरी या घटनेची माहिती लोणीकंद पोलीसांना दिल्यावर पोलीस ही तातडीने घटनास्थळी आले. त्यांनी घटनेचा पंचनामा करून या घटनेची माहिती घेतली.ही घटना कोणत्या कारणातून कुणी केली याची माहिती मिळाल्यावर पोलीसांनी तपासाला सुरूवात केली.त्यापूर्वी पोलीसांनी मयत अक्षदाचा मृतदेह पोस्ट मार्टम साठी सरकारी दवाखान्यात पाठवून दिला. या घटनेची फिर्याद लोणीकंद पोलीसात फकीर दुपारगुंडे याच्या भावाने दिल्याने पोलीसांनी पळून गेलेल्या फकीर दुपारगुंडे याचा शोध घ्यायला सुरूवात केली. या घटनेचा तपास लोणीकंद पोलीसाबरोबर स्थानिक गुन्हे शाखेचे युनिट ६ चे पोलीस ही करीत होते. या युनिट ६च्या पोलीसांना संशयीत फकीर दुपारगुंडे हा हडपसर भागातील गाडीतळ येथे असल्याची माहिती मिळाली. पोलीस तेथे आपल्याला शोधत आल्याची कुणकुण फकीर याला लागताच तो तेथून पळून जाण्याच्या तयारीत लागला. तेथून तो पळून सोलापूर जिल्यातील आपल्या मुळ गावी पुणे सोलापूर बसने जात असल्याची माहिती पोलीसांना मिळताच पोलीसांनी त्याला बस मध्ये बसण्यापूर्वीच पकडले. परंतु पोलीसांनी त्याला फकडताच तो त्याच्या हातातून निसडा देवून पळू लागला. तो पळून जात असताना पोलीसांनी त्याचा रस्त्यावर पाठलाग करून त्याची गचांडी पकडली. त्याला ताब्यात घेऊन लोणीकंद पोलीस स्टेशनला आणून त्याचेकडे अक्षदाच्या मृत्यू विषयी विचारणा केली असता तो पोलीसांना उडवा-उडवीचे उत्तरे देत होता. ज्यावेळी पोलीसांनी त्याला पकडले त्यावेळी ही तो फुल्ल दारूच्या नशेत होता. त्याची दारूची नशा उतरल्यावर पोलीसांनी त्याला बोलते केले असता त्याने आपला गुन्हा कबुल करून तो का? आणि कशासाठी केला याची माहिती पोलिसांना दिली. त्याने आपला गुन्हा कबुल केल्यावर त्याच्या भावाने दिलेल्या फिर्यादीनुसार अक्षदा फकीर दुपारगुंडे (वय १६) हिच्या खून प्रकरणी तिचा बाप फकीर गुंडा दुपारगुंडे (वय ४५)याच्या विरोधात लोणीकंद पोलीसात भा.दं.वी.कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीसांनी त्याला कोर्टात हजर केले असता मा. कोर्टाने त्याला पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. पोलीस कोठडी दरम्यान त्याने गुन्हयात वापरलेला लाकडी दांडका पोलीसांना काढून दिला. या घटनेचा तपास पोलीस आयुक्त रितेश कुमार सह पोलीस आयुक्त (अतिरिक्त कार्यभार) अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) रामनाथ पोकळे, पोलीस आयुक्त (गुन्हे) अमोल झेंडे, सहायक आयुक्त (गुन्हे २)सतीश गोवेकर याच्या मार्गदर्शनाखाली पो.निरी. उल्हास कदम, पो.उप.निरी. भैरवनाथ शेळके, पोलीस अंमलदार विठ्ठल खेडकर, बाळासाहेब सकटे, नितीन मुंडे, प्रतिक लाहीगुडे, सचिन पवार, ऋषीकेश व्यवहारे, नितीन धाडगे, ज्योती काळे यांनी केला. दारूची नशा करी जीवनाची दुर्दशा असे म्हटले जाते परंतु तरी ही अनेक जण एकच प्याला म्हणत घोट घोट रिचवत आपल्या कोरड्या घशाला साफ करीत असतात. परंतु हिच नशा ज्यावेळी डोईजड होते त्यावेळी माणसाला नको ते करायला भाग पाडते. दारूच्या नशेत माणुस आपल्या पोटच्या गोळ्याचा ही विचार करीत नाही हेच या घटनेवरून दिसून येते.

## काम करताना डोक्यात घर लुटण्याचे ...

येणाऱ्या मिस्त्रीने सुवर्णकारांशी आपुलकीचे संबंध निर्माण केले, कारण त्याला त्यांच्याकडून ॲडव्हान्सच्या नावाखाली कधीही जास्त पैसे घेता येत होते. त्याची वारंवार पैशाची मागणी असल्याने सुवर्णकारांनी त्याला नकार देण्यास सुरूवात केली, तसा तो बिथरला. पैशासाठी तो त्या सुवर्णकारांच्या जीवावर उठला. त्याने त्यांची अत्यंत निर्दयीपणे हत्या केली. कोणताही पुरावा मागे न ठेवता तो पसार झाला, पण पोलिसांनी अवघ्या २४ तासात त्याला बेड्या ठोकल्या. अमरावती जिल्ह्यातील तिवसा शहरातील संजय भगवंत मांडळे वय ५५ हेप्रसिद्ध सुवर्णकार. त्यांचे तिवसा शहरात मुख्य बाजारपेठेत सराफा सलाईनमध्ये सराफा दुकान आहे. काही महिन्यांपूर्वी त्यांचा अपघात  झाल्याने ते घरीच होते, तर दुकानाची जबाबदारी त्यांचा स मुलगा वैशाख सांभाळत होता, तर व ते काही सराफा व्यवहार घरूनचकरत होते. दोन-तीन महिन्यापूर्वी त्यांनी घराचे रिपेअरिंगचे व थोडे बांधकामही सुरू केले असल्यामुळे त्यांच्या घरी बांधकाम करणाऱ्या ३-४ मिस्त्रींची रेलचेल असायची. संजय मांडळे यांच्या पत्नीस किडनीचा आजार असल्याने ठराविक दिवसानंतर अमरावतीयेथे डायलिसिससाठी न्यावे लागतअसते. मिस्त्री काम करणाऱ्या तीन-चार मिस्त्रीपैकी रोशन दिगंबर तांबटकर (रा. देऊरवाडा ता.आर्वी जि. वर्धा) हा होता. त्याचेगाव तिवसापासून काही अंतरावर होते. त्याचे मांडळे यांच्या घरी जाणे-येणे होते. सुवर्णकार मांडळे यांचा मुलगा वैशाख सोबतही रोशनचे मित्रत्वाचे संबंध होते, मात्र रोशनची नियत चांगली नव्हती. तो मजुरी व्यतिरिक्त नेहमी मांडळे यांच्याकडे पैसे मागायचा. रोशन सोमवार दिनांक २७ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता ॲडव्हान्स मागण्यासाठी मांडळे यांच्या घरी आला होता. दोन दिवसापासून रिपेअरिंगचे काम बंद होते. रोशनने वैशाखकडे ॲडव्हान्स पैशाची मागणी केली, मात्र वैशाखने त्याच्या आईला दवाखान्यात डायलिसिससाठी घेऊन जायचे आहे, त्यामुळे ॲडव्हान्स तुला उद्या देतो असे त्याला सांगितले होते. रोशनला दुपारनंतर मांडळे यांच्या घरीकोणीच रहाणार नसल्याची खात्रीझाली होती. घरात एकटेच संजय असणार याची खात्री असल्याने रोशनने एक वेगळाच प्लॅन आखला. त्याला आज चांगलाच मोठा हात मारायचा होता, त्यासाठी त्याने अगदी अचूक प्लॅनिंगसुरू केले होते. या गुन्ह्यात आपण अडकणार नाही याची खबरदारी त्याने सुरूवाती पासूनच घेण्यास सुरूवात केली होती. संध्याकाळी सहा वाजण्याच्या दरम्यान रोशन याने पोलिसांचा तपास भरकटण्यासाठी स्वतःचा मोबाईल घरी ठेवून वडीलांचा मोबाईल सोबत घेतला. तिवसा शहरात दारू ढोसली आणि सरळ संजय मांडळे यांचे घर गाठले. त्यावेळी संजय हे घरी वरच्या मजल्यावर एकटेच होते. रोशनने त्यांच्याकडे मजुरीच्या झालेल्या पैशासोबतच काही ॲडव्हान्स पैशांची मागणी केली, मात्र संजय यांनी ॲडव्हान्स पैसे देण्यास सरळ नकार दिल्यामुळे रोशनच्या तळपायाची आग मस्तकात गेली. तो सगळे नियोजन करूनच आला होता. तो रागातच त्यांच्या घराच्या वरच्या मजल्यावरून खाली उतरला. खाली कुदळीचा दांडा पडलेला होता. तो दांडा घेऊन रोशन परत वरच्या मजल्यावर आला. आता त्याने संजय यांच्याकडे खाण्यासाठी सोप-सुपारी मागितली, तेंव्हा संजय यांनी सोप-सुपारीचा पानपूडा त्याला दिला. त्याने सुपारी खाऊन पानपुडा परत दिला. तो पानपुडा ठेवण्यासाठी संजय वळले. हीच संधी साधत रोशनने मागे लपवून ठेवलेला दांडा काढला. दुसऱ्याच क्षणी त्याने त्यांच्यावर हल्ला केला. दांड्याचे दोन-चार फटके संजय यांच्या डोक्यात हाणले. या जोरदार वाराने संजय कोसळले तरीही तो त्यांना झोडपतच होता. काही क्षणातच संजय हे रक्ताच्या थारोळ्यात कोसळले. ते निपचित पडले होते, त्यांचा श्वास थांबला होता. रोशनने त्यांचा खून केला होता. आता रोशनने झपाट्याने हालचाली केल्या. त्याने घरातील लाकडी कपाटात ठेवलेले सोन्या-चांदीचे दागिने व रोकड एका बॅगमध्ये भरून घेतली आणि दुचाकीने तो पसार झाला. जातांना त्याने दांडा परिसरातील विहीरीत फेकून दिला. दि. २७ नोव्हेंबर सोमवारी संध्याकाळी ७.३० वाजण्याच्या सुमारास तिवसा पोलिसांना माहिती मिळाली की, त्रिमूर्ती नगरातील सुवर्णकार संजय मांडळे यांची त्यांच्या घरातील वरच्या मजल्यावरील खोलीत अज्ञात व्यक्तींनी हत्या करून, घरातील कपाटात असलेले सोन्या-चांदीचे दागिने आणि रोकड असा ७४ लाख ६८हजार रूपयांचा मुद्देमाल पळवला आहे. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता वरीष्ठांना माहिती देऊन तिवसा पोलीस स्टेशनचे ठाणेदार प्रदीप ठाकूर यांनी सहकाऱ्यांसह त्रिमूर्ती नगरातील घटनास्थळी धाव घेतली. फिंगर प्रिंट एक्सपर्ट वश्वान पथकास पाचारण करण्यात आले. काही वेळात स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पथक पोलीस निरीक्षक किरण वानखडे यांच्या मार्गदर्शनाखाली घटनास्थळी पोहोचले.  मृतकाच्या घराजवळ प्रचंड गर्दी झाली होती. घटनास्थळी मांडळे यांच्या घराच्या वरच्या मजल्या वरील खोलीत संजय मांडळे यांचा रक्ताच्या थारोळ्यात मृतदेह पडलेला होता. कपाट उघडे होते. कपाटातील दागिने व रोख रक्कम गायब होती. घरात पत्नी व मुलांचा आक्रोश सुरू होता. मुलगा वैशाख रडत-रडत सांगत होता की, आईला अमरावती दवाखान्यात घेऊन गेलो होतो तर बहीण वैष्णवी बाहेरगावी गेल्याने घरी कोणीच नव्हते, सायंकाळी ७ वाजता घरी आल्यावर वडीलांचा रक्ताने माखलेला मृतदेह दिसला, कपाटातील दागिनेही गायब होते. 'पोलिसांनी दिसत्या परिस्थितीचा घटना स्थळ पंचनामा करून मृतदेह पोस्टमार्टमसाठी तिवसा सामान्य रूग्णालयात हलवला. शहरातील एका प्रसिद्ध सुवर्णकाराची हत्या झाल्याने एकच खळबळ निर्माण झाली होती. चर्चांना उधाण आले होते. सुवर्णकार मांडळे यांची हत्या कोणी केली असावी? याबाबत तर्क-वितर्कलावले जात होते. मांडळे यांची हत्या करणारा व्यक्ती कोणी तरी त्यांच्या संपर्कातील असावा असा संशय पोलिसांना होता. त्यांच्या घरी कोणीच नसल्याचा अंदाज आरोपीस होता म्हणून पोलीस युद्धपातळीवर त्यांच्या संपर्कातील व्यक्तींची चौकशी करत होते. जिल्हा पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अप्पर पोलीस अधीक्षक विक्रम साळी, उपविभागीय पोलीस अधिकारी सचिंद्र शिंदे यांनीही घटनास्थळी भेट दिली. मारेकऱ्यांनी कोणत्याच प्रकारचा पुरावा घटनास्थळी सोडला नव्हता. तपासासाठी पोलिसांची चार पथके तयार करण्यात आली. स्थानिक गुन्हे अन्वेषण विभाग व तिवसा पोलीस स्टेशनचे पोलीस पथक समांतर तपास करत होते. तिवसा शहरातील विविध ठिकाणचेसी. सी.टी.व्ही. फुटेज तपासण्यात आले, मात्र मृतकाच्या घरा जवळ कुठेही सी.सी.टी.व्ही. कॅमेरे लागले नसल्याने पोलिसांच्या पदरी निराशा पडली. पोलिसांनी संजय मांडळे यांच्या संपर्कातील तसेच घरी वावरणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची कसून चौकशी करण्यास सुरूवात केली. ६० लोकांची विचारपूस करण्यात येत होती. पोलीस तहान भूक हरवून दिवस-रात्र तपासात व्यस्त होते. पोलिसांना त्यांच्या संपर्कातील व्यक्तींच्या चौकशी दरम्यान रोशन तांबटकर या त्यांच्या घरी नेहमी येणाऱ्या मिस्त्रीवर संशय आला, कारण त्याने पोलिसांनी प्रश्न विचारण्याआधीच आपण घटनेच्या दिवशी दुपारनंतर तिवसा शहरात आलोच नाही असे मोठ्या आत्मविश्वासाने ठामपणे सांगितले होते. पोलिसांनी त्याच्या विषयी गोपनीय माहिती मिळवली असतारोशन हा त्यादिवशी दिवसभर शहरातच फिरत असल्याचे समजले, तर आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने रोशन त्यादिवशी त्याच्या वडीलांचा मोबाईल वापरत असल्याचे खात्रीलायक समजल्यामुळे पोलिसांनी रोशनला ताब्यात घेऊन 'बाजीराव'चा प्रसाद दिला. मग त्याचे उसने अवसान गळले आणि तो पटापटा बोलू लागला. त्याने पोलिसांना घडलेला सर्व प्रकार सांगितला. ॲडव्हान्स पैशासाठी एका प्रसिद्ध सुवर्णकाराची निर्घृण हत्या झाल्याच्या घटनेचा २४ तासात उलगडा झाला. कोणताही धागा घटनास्थळी न सोडणाऱ्या रोशन तांबटकरला पोलिसांनी २४तासात गजाआड केल्याने अमरावती ग्रामीण पोलिसांवर अभिनंदनाचा वर्षाव झाला. विविध स्वर्णकार संघटनांनी पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अप्पर पोलीस अधीक्षक विक्रम साळी, स्थानिक गुन्हा शाखेचे पोलीस निरीक्षक किरण वानखडे यांचा सत्कार केला तर पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी स्थानिक गुन्हा शाखेचे पोलीस निरीक्षक किरण वानखडे यांच्यासह त्यांच्या सहकाऱ्यांचा व तिवसा ठाणेदार प्रदीप ठाकूर यांच्यासह सहकाऱ्यांचा सत्कार केला. या घटनेचा अधिक तपास अमरावती ग्रामीणचे पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अप्पर पोलीस अधीक्षक विक्रम साळी, उपविभागीय पोलीस अधिकारी सचिंद्र शिंदे, स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक किरण वानखडे, तिवसा पोलीस स्टेशनचे ठाणेदार पोलीस निरीक्षक प्रदीप ठाकूर, उपनिरीक्षक पांडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन पवार, स्थानिक गुन्हे विभागाचे उपनिरीक्षक नितीन चुलपार, संजय शिंदे, मोहम्मद तसलीम, मूलचंद भांबुरकर हे करत आहेत.

## प्रेयसीच्या चारित्र्यावर संशय आला...

काही वर्ष राहिली. परंतु तिचे तिच्या नवऱ्याबरोबर फारसे पटत नसल्याने ती बाहेरख्यालीपणाने वागू लागली. या बाहेरख्याली पणातूनच ती सांगली येथे एका खाजगी कंपनीत कामाला लागली. तेथे काम करीत असताना तिचे सुत सचिन माने याच्याबरोबर जुळले.तो ही विवाहित होता. परंतु तो विवाहित आहे हे त्याने तिला अजिबात सांगितले नाही. गेल्या दोन तीन ते चार वर्षापासून त्या दोघांचे प्रेमसंबंध जुळले असल्याने तिने ही त्याला आपण विवाहित आहोत असे कधी ही सांगितले नाही. एकंदरीत त्या दोघांनी ही एकमेकापासून आपआपले सत्य लपवून ठेवले होते. सुरेखाबरोबर संबंध ठेवताना सचिन याला जरा अवघड वाटत होते. आपण कुठल्या बाईच्या नादाला लागलो आहोत हे कुणाला कळू नये म्हणून त्याने सुरेखा हिला गोड बोलून इचलकरंजीला आणले. इचलकरंजीला आल्यावर त्या दोघांनी सचिन याच्या मित्राच्या ओळखीने शहापूर तारदाळ येथील लक्ष्मीनगरमध्ये ओमकार लोहार याची भाडयाने खोली केली. त्या खोलीत ते दोघे ही नवरा बायकोप्रमाणे राहू लागले. गेल्या पाच सहा महिन्यापासून ते दोघे तेथे राहत होते. ओमकार लोहारला ही ओळखीने कुळ मिळाल्याने त्याने ही त्या दोघांची फारसी चौकशी केली नाही. अलिकडे मात्र त्या दोघात कुठल्या ना कुठल्या कारणातून सारखी भांडणे होत होती. सचिन याला ती माझ्याशी लग्न कर म्हणून सारखा मागे तगादा लावत होती.त्यातच तो तिला न सांगता तीन चार दिवस कुठे तरी गडप होत होता. याचा अर्थ तो आपल्याला टाळत आहे हे सुरेखाने ओळखले. आठवडयांतून दोन तीन वेळा झोपायला तो तिच्याबरोबर त्या खोलीत येत होता. त्याने तिला ठेवूनच घेतल्याने ती त्याच्या मागे मला बाजार वैगरे भरून दे असे सांगत होती. तो मात्र तिच्या शरिराचा उपभोग घेण्यापुरते वापर करीत असल्याने तो तिच्या मागण्याकडे लक्ष देत नव्हता. या कारणातून त्या दोघात नेहमी भांडण तंटा होऊ लागला. तो तिला दारूच्या नशेत मारहाण ही करू लागला असल्याने तिला आपला पहिला नवराच बरा असे वाटत होते. चार दिवसाची जवानी, ही जवानी ओसरली की आपल्याकडे कुणी पाहत नाही हे तिला माहित होते. सचिन हा घर खर्चाला ही पैसे देत नसल्याने ती शेजारी राहणाऱ्या महिलेच्या ओळखीने शहापुरातीलच एका गारमेंट कारखान्यात कामाला जावू लागली नेमकी हिच गोष्ट सचिन याला खटकत होती. तो तिला बाहेर कामावर जाण्यास विरोध करीत होता. या गोष्टीचा राग सुरेखाला होता. अलिकडे तर ती बरेच हाय फाय वागू लागल्याने सचिनला तिचा संशय येवू लागला.ती बाहेर कुठे कामाला जात नसून ती वेगळ्याच कामासाठी बाहेर जाते याची कुण कुण सचिन याला लागली होती. याचा जाब विचारीत त्याने सुरेखाला मारहाण ही केली. परंतु तिने त्याला तु काही माझा नवरा नाहीस आणि मी काही तुझी बायको नाही असे सांगून त्याला वाटेला लावले होते. तरी ही तो तिच्याकडे येत होता. ती दुसऱ्या कोणाला चिकटली आहे. त्यामुळे ती आपल्याला किंमत देत नाही असे त्याला वाटत होते. ती त्याचेसोबत तीन ते चार वर्षापासून राहत असली तरी तो कसा आहे काय करतो याची कल्पना तिला नव्हती. सांगलीतील पोलीस रेकॉर्डवरील तो सराईत गुन्हेगार असल्याचे तिला कळाल्यावर ती त्याला टाळू लागली होती. सुरेखा ही आपल्याला मुद्दामच टाळत आहे हे त्याच्या लक्षात आल्यावर दारू पिऊन येवून तो तिला मारहाण करीत होता. परंतु ती ही भांडणात त्याला जशास तसे उत्तर देवून बाहेरचा रस्ता दाखवू लागल्यावर त्याचे डोके सटकले होते.तो तिच्यावर चारित्र्याचा संशय घेऊन तु आता दुसऱ्याला ठेवून घेतले आहेस मग माझ्याकडे कशाला पैसे मागतेस असे म्हणत होता.तुझ्याबरोबर फुकट झोपायला मी काय तुझी बायको नाही असे तिने त्याला ठणकावून सांगितल्याने तो तिच्यावर चिडला. मी तुला पळवून आणली आहे तु माझ्याबरोबरच राह असे तो तिला सांगत होता. इकडे घर मालक ओमकार लोहार याला त्या दोघांचे सत्य माहित नसल्याने तो ही त्या दोघांच्या भांडणाकडे दुर्लक्ष करीत होता. शनिवार दि.३० डिसेंबर रोजी सचिन हा सांगलीहून इचलकरंजीला परत आला.३१ डिसेंबर प्रियेसी सुरेखा बरोबर रंगिन करण्याचा त्याने विचार केला. त्याला दारू पिण्याचे व्यसनच असल्याने आज सांगलीहून येताना त्याने दारू ढोसली होती. संध्याकाळच्या सुमारास तो घराकडे आला त्यावेळी सुरेखा घरात नव्हती. काही वेळाने ती घराकडे आल्यावर  तिने त्याला सहजच विचारले तु का माझ्याकडे आला आहेस. माझा यजमान दुसरा आहे असे तुच म्हणतोस ना मग माझ्याकडे परत कशाला आला आहेस. त्याने तिची समजुत काढली.तशी ती जेवण तयार करायला लागली. जेवणा आधी सचिन बाहेर गेला. बाहेरहून येताना त्याने परत दोन क्वाटर आपल्या घशाखाली रिचवली.त्यामुळे त्याला चांगलीच दारूची नशा चढली. आजच सुरेखाबरोबर रंगिन रात्र करायची याचा तो विचार करीत होता. ती मात्र त्याला जवळ ही घेत नव्हती.आपल्या अंगाला हात लावू नकोस असे सांगत होती. रात्रीचे ९ वाजून गेले होते. ती अंगाला हात लावू देत नसल्याने याचा राग त्याला आला.ती त्याच्याबरोबर भांडण काढत असताना तो तिला मारायला तिच्या अंगावर गेला. तिने त्याला बाजुला ढकलून दिले. रागाच्या भरात त्याने तिचा जोरात गळा आवळून धरला. ती त्याच्या तावडीतून सुटण्याचा प्रयत्न करू लागली. त्याने तिला जोरात भिंतीवर आपटले. तिच्या डोक्याला जबर मार लागल्याने ती खाली बेशुध्द पडली. ती आपल्या हातून मेली असल्याचे समजून तो खोलीला बाहेर कुलूप लावून तेथून पसार झाला. इकडे घरात काही तरी विपरीत घडल्याचे ओमकार लोहार याच्या लक्षात आल्यावर त्याने आपल्या जवळच्या मित्राला बोलावून घेतले. त्या दोघांनी घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. तर आत मध्ये सुरेखा सोलनकर ही बेशुध्द पडली असल्याचे त्यांना दिसून आले. त्यांनी लगेच तिला उपचारासाठी इचलकरंजी येथील इंदिरा आयजीएम हॉस्पिटल मध्ये दाखल केले. तेथील डॉक्टरांनी तिला तपासून तिची हालत गंभीर असल्याचे त्या दोघांना सांगितले. तिच्यावर प्राथमिक उपचार करून सांगली येथील सिव्हिल हॉस्पिटलला पाठवून दिले. तेथे तिच्यावर उपचार सुरू असताना गुरूवार दि.४ डिसेंबर २०२४ रोजी मृत्यू झाला. या घटनेची माहिती सांगली शहर पोलीसात दिल्यावर पोलीस ही तातडीने सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल झाले. मयत सुरेखा राजू सोलनकर हिची पुर्ण माहिती घेऊन या घटनेची माहिती मयत सुरेखा हिचा भाऊ जत तालुक्यातील अंकले येथील कृष्णा भूपाल दुधाळ याला दिली. ही घटना इचलकरंजी येथील शहापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली असल्याने शहापूर पोलीस ठाण्याकडे हा गुन्हा वर्ग करण्यात आला. या घटनेतील संशयीत आरोपी सचिन गौतम माने हा पळून गेला असल्याने शहापूर पोलीसांनी त्याच्या शोधासाठी रवाना केली. शुक्रवार दि.५ डिसेंबर २०२४ रोजी पोलीसांच्या एका पथकाने सचिन माने याला सांगली येथील इंदिरानगर येथून ताब्यात घेऊन शहापूर पोलीस ठाण्याला आणले. पोलीसांनी त्याच्याकडे या घटनेची चौकशी केली असता तो पोलीसांना उडवाउडवीचे उत्तरे देत होता. पोलीसांनी त्याला आपला पोलीसी खाक्या दाखविला असता त्याने आपला गुन्हा कबुल केला. या घटनेची लेखी फिर्याद मयत सुरेखा हिचा भाऊ कृष्णा भूपाल दुधाळ याने दिल्याने त्याच्या फिर्यादीवरून सुरेखा राजू सोलनकर (वय ३०) हिच्या खून प्रकरणी तिचा प्रियकर सचिन गौतम माने (वय ३२) याच्या विरोधात भा.दं.वी. कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याला इचलकरंजी येथील प्रथमवर्ग न्यायालयात हजर केले असता मा.कोर्टाने त्याला पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. या घटनेचा पुढील तपास शहापूर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक दीपक माळी हे करीत आहेत. विवाहित महिला या परपुरूषाच्या सुखाला चटावल्या की,त्या पुरूष बदलत असतात. त्या कधीच कोणाबरोबर एकनिष्ट राहत नाहीत जोपर्यंत आपली चमडी आहे तो पर्यंत त्या आपल्या प्रियकराकडून दमडी काढण्याचा प्रयत्न करतात. त्याने तिची गरज पुर्ण केली नाही तर त्या त्याला जवळ ही येवू देत नाहीत. चमडीचा सौदा आणि येरझाऱ्या चौदा असे होऊन बसते. आणि मग त्यातून खूनासारखी घटना घडते हेच या घटनेवरून दिसून येते.

## ७ वर्षाच्या भावाला होता कबुतरांचा...

पहिलीच उत्कृष्ट कारवाई करीत सात वर्षाच्या मुलाचा हत्येच्या क्लिष्ट गुन्ह्याची उकल केली. ता. १९ डिसेंबर २०२३ पासून हरवलेला मुलगा शेख अफ्फान शेख अय्युब (रा. बागवानपुरा पिंजर) याचा मृतदेह स्थानिक गुन्हे शाखा अकोला, श्वान पथक व पिंजर येथील पोलिस तसेच संत गाडगेबाबा आपातकालीन पथक पिंजर यांचे १२ दिवसांचे अथक प्रयत्नाने पिंजर-अकोला रोडवरील विहिरीत सापडला होता.ङ्घटनेचे गांभिर्य ओळखून पोलिस अधीक्षक बच्चन सिंह, अप्पर पोलिस अधीक्षक अभय डोंगरे, उपविभागीय पोलिस अधिकारी मूर्तिजापूर मनोहर दाभाडे, स्थानिक गुन्हे शाखा अकोला प्रमुख पोलिस निरीक्षक शंकर शेळके, पो.उप. नि. गोपाल जाधव व पोलिस स्टेशन पिंजरचे ठाणेदार स. पो. नि. राहुल वाघ यांनी घटनास्थळी भेट दिली. पोलिस अधीक्षकांनी तपासाबाबत सूचना दिली. त्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने विचारपूस करीत, तांत्रिक माहिती व पोलिस अधीक्षकांच्या मार्गदर्शनावरून गुन्ह्यातील संशयित यांना ताब्यात घेतले. सखोल विचारपूस केली असता मयत शेख अफ्फान शेख अय्युब याचा खून त्याचा चुलत भाऊ विधी संघर्षित बालक वय १७ वर्षे याने केल्याची कबुली दिली. ही कारवाई पो. नि. शंकर शेळके, सपोनि कैलास भगत, पोउपनि गोपाल जाधव, व स्थानिक गुन्हे शाखा अकोला येथील पोलिस अंमलदार दशरथ बोरकर, राजपालसिंह ठाकुर, गोकुळ चव्हाण, प्रमोद डोईफोडे, फिरोज खान, रवी खंडारे, अब्दुल माजीद, वसीमोद्दीन, महेंद्रं मलीये, अविनाश पाचपोर, खुशाल नेमाडे, लिलाधर खंडार, शेख अन्सार एजाज अहेमद, आकाश मानकर, धीरज वानखडे, उदय शुक्ला, स्वप्निल चौधरी, मोहम्मद आमीर, अभिषेक पाठक, चालक शेख नफीस, अक्षय बोबडे, प्रवीण कश्यप, अनिल राठोड व तांत्रिक विश्लेषक राहुल गायकवाड, गोपाल ठोंबरे, आशिष आमले यांनी केली.

# पूर्णा येथे तरुणाची भरदिवसा निर्घृण हत्या





**पूर्णा/लक्ष्मण उजगरे**

पूर्णा शहरातील श्री गुरुबुद्धीस्वामी महाविद्यालयाच्या मैदानावर तोंडाला कपडा बांधून दुचाकीवरून आलेल्या अज्ञात दोन व्यक्तींनी एका २२ वर्षीय तरुणाची पिस्तुलाने गोळ्या झाडून आणि तलवारीने सपासप वार करुन निर्घृण हत्या केली. ही थरारक घटना शुक्रवारी (दि.८) दुपारी घडली असून यामुळे शहरात एकच खळबळ उडाली आहे. या घटनेतील मयत तरुणाचे नाव आकाश गणेश कदम (वय २२ वर्षे रा.पूर्णा) असें आहे. त्या तरुणाचा खून नेमका कोणत्या कारणाने व कोणी केला हे मात्र स्पष्ट झालेले नाही. मयत तरुण हा शुक्रवारी (दि.८) दुपारी दीड ते दोन वाजेच्या सुमारास आपल्या विना नंबरच्या दुचाकीवरून येथील श्री गुरुबुद्धीस्वामी महाविद्यालय परिसरात आला होता. त्याच्या पाठोपाठ दुसऱ्या एका विनानंबरच्या काळ्या रंगाच्या दुचाकीवरून तोडांला कापड बांधलेले दोघेजण आले.त्यांनी महाविद्यालय परिसरात मयत आकाशवर पिस्तूलातुन गोळ्या झाडल्या. तेथे आकाशची दुचाकी पडलेल्या अवस्थेत दिसून आली. त्यानंतर थोड्या अंतरावर मारेकऱ्यांनी पाठलाग करत त्याच्यावर तलवारीने गळ्यावर, अंगावर, हातावर सपासप वार केले. यातच आकाशचा जागीच मृत्यू झाला आहे. घटनेची माहिती शहरात वाऱ्यासारखी पसरल्याने घटनास्थळी बघ्यांची एकच गर्दी झाली होती. माहिती मिळताच पूर्णा ठाण्याचे पो.नि. प्रदीप काकडे, सपोनि दर्शन शिंदे व कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन मृतदेह ताब्यात घेत पंचनामा केला. घटनास्थळी मारेकऱ्यांनी वापरलेली पिस्तूल, झाडलेल्या गोळीचे वेष्टण, विनानंबरची दुचाकी, चप्पल आदीं वस्तू आढळून आल्या आहेत. त्या पोलिसांनी ताब्यात घेतल्या असून, अधिक तपासासाठी ठसेतज्ञ तसेच श्वान पथकास पाचारण करण्यात आले. आरोपींच्या शोधासाठी पोलिसांची पथके रवाना करण्यात आले असल्याचे पो.नि.काकडे यांनी सांगितले. दरम्यान, या प्रकरणात शुक्रवारी संध्याकाळी उशिरापर्यंत कोणताही गुन्हा दाखल करण्यात आला नव्हता.

# नोव्हेंबर २००५ नंतर रुजू शासकीय कर्मचाऱ्यांना आता मिळणार जुन्या निवृत्ती वेतन योजनेचा पर्याय

**मुंबई/प्रतिनिधी**

१ नोव्हेंबर २००५ पूर्वीच्या जाहिरातींनुसार शासन सेवेत १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर रुजू झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना जुन्या निवृत्ती वेतन योजनेचा पर्याय देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. अशा शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना केंद्र शासनाच्या धर्तीवर महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्तीवेतन नियम, १९८२, महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण १९८४ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी व अनुषंगिक नियमाच्या तरतुदी लागू करण्यासाठी एक वेळ पर्याय (One Time Option) देण्यात येत आहे. संबंधित राज्य शासकीय अधिकारी, कर्मचारी यांनी जुनी निवृत्ती वेतन व अनुषंगिक नियम लागू करण्याचा हा पर्याय याचा शासन निर्णय प्रसिद्ध झाल्यापासून ६ महिन्यांच्या कालावधीत देणे बंधनकारक राहील. जे राज्य शासकीय अधिकारी, कर्मचारी या ६ महिन्यांच्या कालावधीत जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करण्याचा पर्याय देणार नाहीत, त्यांना नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू राहील. अधिकारी व कर्मचारी यांनी प्रथम दिलेला पर्याय अंतिम राहील. जुनी निवृत्तीवेतन व अनुषंगिक नियम लागू करण्याचा पर्याय संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी त्यांच्या नियुक्ती प्राधिकाऱ्याकडे सादर करावा. हा कर्मचारी जुनी निवृत्ती वेतन व अनुषंगिक नियम लागू होण्यास पात्र झाल्यास तशा पद्धतीचे कार्यालयीन ज्ञापन संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्याने पर्याय प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून दोन महिन्यांच्या आत द्यावे. तसेच संबंधित कर्मचारी शासकीय अधिकारी व कर्मचारी यांचे नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन (NPS) योजनेचे खाते तत्काळ बंद केले जातील जे अधिकारी व कर्मचारी जुनी निवृत्ती वेतन व अनुषंगिक नियम लागू करण्याचा पर्याय निवडतील त्यांचे भविष्य निर्वाह निधीचे (GPF) खाते उघडण्यात येईल व सदर खात्यात नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन खात्यातील (NPS) त्यांच्या हिश्श्याची रक्कम व्याजासह जमा करण्यात येईल. जुनी निवृत्ती वेतन व अनुषंगिक नियम हा पर्याय स्वीकारणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन खात्यातील (NPS) राज्य शासनाच्या हिश्श्याची रक्कम व्याजासह राज्याच्या एकत्रित निधीत वळती करण्यात येईल.

# गांधी रिसर्च फाऊंडेशनच्या 'पीस वॉक'ने नवीन वर्षाची पहाट आनंददायी व सकारात्मक

**जळगाव/प्रतिनिधी**



गांधी रिसर्च फाऊंडेशनच्यावतीने नवीन वर्षाचे स्वागत पीस वॉकसारख्या अतिशय प्रसन्न, आनंददायी, शांतीचा अनुभव देणाऱ्या व जीवनात सकारात्मकता आणणाऱ्या उपक्रमाने करण्यात आले. जैन उद्योग समूहच्या जैन हिल्सच्या निसर्गरम्य वातावरणात पंचमहाभूत तत्वे विस्ताराने मांडत त्याचा मानवी जीवनाशी संबंध याद्वारे उलगडण्यात आला. साडे तीन किलोमीटरच्या या वॉकमध्ये पृथ्वी, आप, तेज, वायू व आकाश हि पंचतत्वे आणि मानवी जीवन यांचा संबंध वैज्ञानिक व आध्यात्मिकदृष्ट्या समजावून सांगण्यात आला. निसर्गातील पंच महाभूत तत्त्वे उपलब्ध करुन देणाऱ्यांप्रती कायम कृतज्ञता बाळगली पाहिजे असे आवाहनही गांधी रिसर्च फाऊंडेशनचे प्रा. डॉ. अश्विन झाला यांनी केले. त्यांनी कबीराचे दोहे, संत वचने, सुप्रसिद्ध व्यक्तींच्या विचारांची उदाहरणे देत मानवी शरीराचा पंचतत्वांशी असलेला संबंध विशद केला. सहभागींनी आपल्या प्रतिक्रियेत अशा प्रकारच्या पीस वॉकचे नियमित आयोजन करण्याची आवश्यकता प्रतिपादित केली. जीवनातील शांतीचा सुखद अनुभव घेता आला याबद्दल आयोजकांचे धन्यवाद व्यक्त केले. समारोपात सहभागिनीं ५ मिनिटाचे ध्यान करुन शांतीचा अनुभव घेतला. आगामी काळात जीवनाशी संबंधित वेगवेगळ्या विषयांना घेऊन पीस वॉकचे आयोजन करावे अशी सूचनाही केली. पीस वॉकमध्ये डॉ. विकास गीते, डॉ. किरण पाटील, लक्ष्मीकांत मणियार, डॉ. पंकज शाह, राजीव बियाणी डॉ. रुपेश पाटील, जितेंद्र ढाके, राघवेंद्र काबरा, सोमनाथ महाजन, मिलिंद खारुळ, महेश शिंपी, नीलम जोशी, विंदा नाईक, सुनील पवार, सुभाष महाजन, अपर्णा भालेराव, विवेक कहाळे, कांचन संत, संस्थेचे समन्वयक उदय महाजन यासह ५३ स्त्री-पुरुष व मुलांचा सहभाग होता. परीक्षा नियंत्रक गिरीश कुळकर्णी यांनी प्रास्ताविक केले व आभार मानले.

# दिव्यांग कर्मचाऱ्यांसाठी महावितरणचा पुढाकार प्रेरणादायी सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी कुल्लूरकर यांचे प्रतिपादन



**कल्याण/प्रतिनिधी**

राज्य सरकारच्या परिपत्रकानुसार दिव्यांग कर्मचाऱ्यांसाठी सहायक उपकरणे देण्यात महावितरणने पुढाकार घेतला आहे. सामाजिक जाणिवेतून महावितरणने घेतलेला हा पुढाकार प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन कल्याण येथील सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी रमेश कुल्लूरकर यांनी केले. राज्य सरकारी सेवेतील दिव्यांग कर्मचाऱ्यांना सहायक उपकरणे पुरवण्याबाबत सरकारने परिपत्रक जारी केले आहे. त्यानुसार कल्याण परिमंडलातील चार दिव्यांग कर्मचाऱ्यांना बुधवारी (०३ जानेवारी) दुचाकींचे वाटप करण्यासाठी परिमंडल कार्यालयात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कल्याण परिमंडलाचे मुख्य अभियंता धनंजय औंढेकर होते. कल्याण मंडल एकचे अधीक्षक अभियंता दीपक पाटील, कल्याण दोनचे अधीक्षक अभियंता दिलीप भोळे, सहायक वाहन निरिक्षक विजय नरवाडे, अक्षया बनसोडे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी कुल्लूरकर म्हणाले, दिव्यांगांना दैनंदिन कार्यालयीन कामकाज अधिक सुलभ करण्यासाठी सहायक उपकरणे महत्वाची ठरणार आहेत. या सुविधेमुळे शारीरिक अपंगत्व असले तरी मनाने खंबीर बनून दिव्यांग कर्मचारी अधिक प्रभावीपणे काम करतील, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. मुख्य अभियंता औंढेकर यांनी कल्याण परिमंडलात एकूण २८ दिव्यांग कर्मचारी असल्याची माहिती देतानाच उर्वरित २४ कर्मचाऱ्यांनाही सहायक उपकरणे पुरवण्याची कार्यवाही तातडीने करण्याचे निर्देश दिले. दिव्यांग कर्मचाऱ्यांसाठी कल्याण परिमंडलाने घेतलेल्या पुढाकाराबद्दल प्रहार संघटनेने कृतज्ञता व्यक्त करत मुख्य अभियंता औंढेकर यांचा विशेष सन्मान केला. यावेळी प्रहार संघटनेच्या राज्य सचिव भक्ती भंडारी, महावितरणचे उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी रामगोपाल अहिर, मानव संसाधन विभागाचे वरिष्ठ व्यवस्थापक निलेश भवर, शशिकांत पोफळीकर, कर्मचारी, अधिकारी, अभियंते, कर्मचारी संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**महाराष्ट्र शासन**

**जिल्हाधिकारी, पालघर यांचे कार्यालय**

**जिल्हा मुख्यालय पालघर, पालघर - बोईसर रोड, कोळगाव, ता.नि, पालघर**

**(पुरवठा शाखा)**

दुरध्वनीक्रमांक-०२५२५-२९७०२४ ई-मेल : dsopalghar2014gmail.com

क्रमांक-पुरवठा/टे.२/राभादु/जाहिरनामा/कावि-२९६/२०२३ दिनांक : २९/१२/२०२३

**जाहीरनामा**

**प्रपत्र - अ**

| | |
|---|---|
| जाहीरनामा ज्या प्रकारच्या दुकान परवान्यासाठी आहे तो परवाना प्रकार. | **रास्तभाव धान्य दुकान** |
| अर्ज कोणत्या तहसीलदार यांचेकडे सादर करणेचा त्या तहसील कार्यालयाचे नांव व पत्ता तसेच जाहीरनाम्याशी संबंधीत तालुका - | **तहसीलदार वसई** |
| अर्ज सादर करण्याची मुदत - | दिनांक - ०१/०१/२०२३ ते दिनांक -३१/०१/२०२४ पर्यंत |

अन्न, नागरी परवटा व ग्राहक संरक्षण विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक : राभादु-१७१६/प्र.क्र.२३९/ नापु-३१, दि.०६ जुलै, २०१७ अन्वये रास्तभाव दुकाने व केरोसीन परवाने मंजूर करण्याबाबत सुधारीत आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. त्यातील तरतुदी विचारात घेऊन राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ मधील कलम १२(१)(इ) मधील तरतुदीनुसार रास्तभाव दुकान मंजुर करण्यासाठी खालीलप्रमाणे प्राथम्यक्रम निश्चित करून देण्यात आला आहे.

१) पंचायत (ग्रामपंचायत व तत्सम स्थानिक स्वराज्य संस्था)
२) नोंदणीकृत स्वयंसहाय्यता बचत गट
३) नोंदणीकृत सहकारी संस्था
४) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम किंवा संस्था नोंदणी अधिनियम या कायद्याच्या अंतर्गत नोंदणी झालेल्या संस्था
५) महिला स्वयंसहाय्यता बचत गट व महिलांच्या सहकारी संस्था

वरील प्राधान्यक्रमानुसार रास्तभाव दुकाने मंजूर केलेल्या दुकानांचे व्यवस्थापन महिला किंवा त्यांच्या समुदायाद्वारे करणे आवश्यक राहील.

प्रस्तूत जाहीरनाम्याच्या अनुषंगाने संबंधीत गावातील / क्षेत्रातील गटांना अर्ज सादर करता येतील. प्राप्त होणाऱ्या अर्जाची छाननी करण्यात येऊन पुढील निकषांच्या आधारे व वरील प्राथम्यक्रमानुसार संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्था / बचतगट / सहकारी संस्थेची निवड करण्यात येईल.

१) प्राथम्य सुचीनुसार स्थानिक स्वराज्य संस्था / बचतगट सहकारी संस्थेची निवड करतांना जेष्ट, वर्धनक्षम व नियमीत कार्यरत असलेल्या, अंतर्गत व्यवहार पारदर्शक व परतफेड चोख व नियमीत असलेल्या, प्रतिवर्षी लेखापरिक्षण केलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था / बचतगट / सहकारी संस्थेस प्राधान्य देण्यात येईल.
२) निवड करावयाच्या स्थानिक स्वराज्य संस्था / बचतगट / सहकारी संस्थेचे हिशेब व लेखे अद्यावत असावेत व परतफेडीचे प्रमाण किमान ८०% इतके असावे.
३) गटांची निवड करण्याचे काम सध्याचे रास्तभाव दुवाने व किरकोळ केरोसीन मंजुर करणारे परवाना प्राधिकारी अर्थात जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीमार्फत करण्यात येईल.
४) समितीच्या निर्णयानुसार, ग्रामीण क्षेत्रात संबंधीत गटास रास्तभाव दुकानाचे प्राधिकारपत्र किंवा किरकोळ केरोसीन परवाना देण्यापूर्वी परवाना प्राधिकाऱ्यांमार्फत सदर प्रस्ताव संबंधीत गावाच्या महिला ग्रामसभेकडे विचारार्थ व शिफारशीसाठी पाठविण्यात येईल. महिला ग्रामसभेची शिफारस विचारात घेऊन दुकान मंजुरीबाबत अंतिम निर्णय परगना प्राधिकारी घेतील.

शासन परिपत्रक क्रमांक : राभादु-२११७/प्र.क्र.१५७/नापु ३१, दिनांक : ०२ फेब्रुवारी, २०२२ अन्वये नवीन रास्तभाव दुकान / किरकोळ केरोसीन दुकान मंजूर करण्यासाठी जाहीरनामा प्रसिध्द करणे व त्यानुषंगाने नवीन रास्तभाव दुकान / किरकोळ केरोसीन दुकान मंजूर करणे यासाठी कालबध्द कार्यक्रम निश्चित केलेला होता, तसेच यापुढे दरवर्षी सदर कालबध्द कार्यक्रमानुसार नवीन रास्त भाव / किरकोळ केरोसीन परवाने मंजूर करावेत असे नमूद करण्यात आलेले आहे. त्यानुषंगाने तहसीलदार जव्हार यांचेकडून रास्तभाव दुकानांच्या रिक्त आस्थापनांबाबत तसेच जाहीरनामा काढणे आवश्यक असलेल्या रास्तभाव दुकानांच्या आस्थापनांबाबत माहिती मागविण्यात आली होती. तहसीलदार जव्हार यांचेकडील पत्र क्रमांक / पुरवठा/का.१/टे-१/कावी-६२७/२०२३, दि. २९/१२/२०२३ अन्वये खालील प्रपत्र- ब मध्ये नमुद केलेल्या रास्तभाव दुकानांचे (न्यायप्रविष्ट प्रकरणे वगळून) व्यवस्थापन नेमणूक करणेकामी जाहीरनामा काढणेबाबत विनंती करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने पुढील प्रपत्र - ब मध्ये नमुद केलेल्या गावांतील / क्षेत्रांतील स्थानिक स्वराज्य संस्था / स्वयंसहाय्यता बचतगट / सहकारी संस्था यांना कळविण्यात येते की, वसई तालुक्यातील गावांपैकी / क्षेत्रांपैकी ज्या विशिष्ट गावात / क्षेत्रात रास्तभाव धान्य दुकान चालविण्याची इच्छा आहे, तसेच ज्या स्थानिक स्वराज्य संस्था / स्वयंसहाय्यता बचतगट / सहकारी संस्था ह्या त्याच विशिष्ट गावांच्या सिमेतील आहेत, अशाच इच्छुक स्थानिक स्वराज्य संस्था / स्वयंसहाय्यता बचतगट / सहकारी संस्था यांनी त्यांच्या गावांतील वरील परवान्यासाठी विहीत करण्यात आलेल्या नमुन्यात संबंधित तहसीलदार यांचे कार्यालयात, विहीत कालावधीत परिपूर्ण अर्ज सादर करावेत. कोऱ्या अर्जाचे नमुने रक्कम रु.५/- (पाच) जमा केल्यानंतर तहसील कार्यालयातील पुरवठा शाखेतून उपलब्ध होतील.

प्रस्तूत जाहीरनाम्यानुसार खालील गावांसाठी/क्षेत्रांसाठी रास्तभाव धान्य दुकान देण्याकरीता स्थानिक स्वराज्य संस्था / स्वयंसहाय्यता बचतगट / सहकारी संस्था यांचे अर्ज मागविण्यात येत आहेत. संबंधीत इच्छुक स्थानिक स्वराज्य संस्था/ स्वयंसहाय्यता बचतगट/ सहकारी संस्थांचे अध्यक्ष / सदस्यांनी याबाबत नोंद घेऊन आपले अर्ज परिपूर्ण कागदपत्रांसह विहीत मुदतीत सादर करण्याची दक्षता घ्यावी. संबंधीत तालुक्यामध्ये आणखी पात्र गावांसाठी जाहीरनामे नव्याने काढण्याची आवश्यकता निर्माण झाल्यास, त्या जाहीरनाम्यास या जाहीरनाम्याची कोणतीही बाधा येणार नाही.

**वसई तालुक्यातील रिक्त व नव्याने मंजुर करावयाच्या रास्तभाव दुकानांची गावे खालीलप्रमाणे...**

**प्रपत्र - अ तालुका - वसई**

| अ.क्र. | गावाचे नाव व दुकान क्रमांक | ऑनलाईन दुकान क्रमांक | अ.क्र. | गावाचे नाव व दुकान क्रमांक | ऑनलाईन दुकान क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| १. | मेढे | १६४६२३८००६८९ | २. | कळंभोन | १६४६२३८००६९२ |
| ३. | परेरानगर | १६४६२३८०००७४ | ४. | तामतलाव | १६४६२३८००८२६ |

**अर्जासोबत खालील कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रती जोडणे बंधनकारक आहे.**

१. स्थानिक स्वराज्य संस्था / स्वयंसहाय्यता बचतगट सहकारी संस्था नोंदणीकृत असल्याबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्यांकडील प्रमाणपत्र
२. स्थानिक स्वराज्य संस्था / स्वयंसहाय्यता बचतगट सहकारी संस्थेच्या सर्व सभासदांची नाव, पत्ता, संपर्क क्रमांक व आधार क्रमांकासह यादी, तसेच सर्व सभासदांच्या आधारकार्डाच्या छायांकीत प्रती
३. स्थानिक स्वराज्य संस्था स्वयंसहाय्यता बचतगट सहकारी संस्थेच्या सर्व सभासदांचे एकत्रित रंगीत छायाचित्र
४. स्थानिक स्वराज्य संस्था / स्वयंसहाय्यता बचतगट सहकारी संस्था यांचे मागील तीन वर्षाचे लेखापरिक्षणाचे अहवाल
५. बँकेच्या पासबुकाची पहिल्या पानापासून सर्व पानांची छायांकीत प्रत
६. स्थानिक स्वराज्य संस्था / स्वयंसहाय्यता बचतगट / सहकारी संस्था यांनी बँकेकडून व्यवसायासाठी कर्ज घेतले असल्यास, त्याची परतफेड व इतर तपशिल दर्शविणारे बँकेचे विवरण (Bank statement)
७. सभासदांना अंतर्गत कर्ज वाटप केलेले असल्यास, त्याचा तपशिल आणि वसुलीबाबतचे विवरणपत्र
८. स्थानिक स्वराज्य संस्था स्वयंसहाय्यता बचतगट सहकारी संस्था हे ज्या ठिकाणी परवान्यानुसार दुकान चालविणार आहेत, त्या जागेच्या मालकी हक्काचा पुरावा. यात ग्रामपंचायतीकडील नमुना आठ सातबारा उतारा / नगर भूमापन विभागाकडील मिळकतीचा उतारा इ. तसेच प्रस्तावित जागा भाड्याची असल्यास ग्रामपंचायतीचा नमुना आठ सिटी सर्व्हेचा उतारा इ. व रूपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवरील जागा मालकाचे संमतीपत्र व भाडे करारनामा
९. स्थानिक स्वराज्य संस्था / स्वयंसहाय्यता बचतगट सहकारी संस्था यांच्या इतर वैशिष्ट्यपूर्ण कामाबाबत / उपक्रमाबाबतचा पुरावा (राष्ट्रीय / राज्यस्तरीय, प्रादेशिक स्तरावरील प्रदर्शनामध्ये सहभाग व इतर शासकीय योजनेमध्ये सहभाग)
१०. ज्या संस्थेने/कार्यालयाने स्वयंसहाय्यता गट स्थापन केला असेल, अशा संस्थेची/कार्यालयाची शिफारस (फक्त स्वयंसहाय्यता बचत गटासाटी लागू)
११. अर्जदार स्थानिक स्वराज्य संस्था/ स्वयंसहाय्यता बचत गट/सहकारी संस्था यांचे नावाने आधीचे रास्तभाव दुकान मंजुर नसल्याबाबतचे अध्यक्षांच्या सहीचे प्रतिज्ञापत्र

विहीत नमुन्यातील परिपूर्ण माहिती भरलेला अर्ज, त्यावर विहित ठिकाणी स्वाक्षरी, आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रती जोडून, विहीत मुदतीत संबंधीत तहसील कार्यालयात सादर करावा. एकापेक्षा जास्त स्थानिक स्वराज्य संस्था / स्वयंसहाय्यता बचतगट / सहकारी संस्था यांचे अर्ज प्राप्त झाल्यास, वरील निकषांचा प्रामुख्याने विचार करुन रास्तभाव दुकान मंजूरीसाठी पात्र स्थानिक स्वराज्य संस्था / स्वयंसहाय्यता बचतगट सहकारी संस्था यांची शासन निर्णयातील तरतदींनुसार निवड करण्यात येईल. विहित मदतीनंतर आलेल्या तसेच अपूर्ण माहिती व अपुऱ्या कागदपत्रांसह आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. सदरचा जाहीरनामा शासन निर्णय क्रमांक : राभादु १७१६/प्र.क्र.२३९/नाप-३१, दिनांक ०६ जलै, २०१७ मध्ये दिलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहून प्रसिध्द करण्यात येत प्रसिद्धी करण्यात येत आहे. सदर जाहीरनाम्यानुसार रास्तभाव दुकान मंजुरीची कार्यवाही संपूर्णत: /कोणत्याही दुकानाच्या संदर्भात व कोणत्याही टप्प्यावर स्थगिती / बंद करण्याचे अधिकार परवाना प्राधिकारी यांना राहतील, याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**(रविंद्र राजपूत)**
**प्र. जिल्हा पुरवठा अधिकारी**
**पालघर**

# मंत्रालयीन लिपिक टंकलेखकांना दरमहा पाच हजार रुपये ठोक भत्ता

**मुंबई/प्रतिनिधी**

मंत्रालयीन लिपिक टंकलेखकांना दरमहा पाच हजार रुपये ठोक भत्ता देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. मंत्रालयीन कामकाजाचे विशिष्ट स्वरुप लक्षात घेता हा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे ११ कोटी ३४ लाख ६० हजार एवढ्या खर्चास देखील मान्यता देण्यात आली. सध्या मंत्रालयातल्या सर्व प्रशासकीय विभागांमध्ये लिपिक-टंकलेखकांची संख्या १८९१ इतकी असून त्यांना याचा लाभ मिळेल. मंत्रालयामध्ये नव्याने लिपिक-टंकलेखक पदावर रुजू झालेले कर्मचारी हे अपुरी आणि महागडी निवास व्यवस्था, जिकिरीचा प्रवास, बृहन्मुंबई महापालिका क्षेत्रात तसेच जवळच्या उपनगरात भाडे तत्वावर घरे उपलब्ध न होणे या कारणांमुळे अल्पावधीत सेवा सोडून जाण्याचे प्रमाण अधिक आहे. यासाठी हा निर्णय घेण्यात आला.

# पुंण्यापेक्षा पापाचा... कायदा आपल्या बापाचा!

घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारताचे संविधान तयार करताना, तळागाळातल्या माणसाचा प्रामुख्याने विचार केला होता. कारण वर्णव्यवस्थेच्या वरवंट्याखाली भरडल्या गेलेल्या उपेक्षित समाजाला, त्याचा न्याय हक्क मिळावा आणि तो समाजाच्या मुख्य प्रवाहात यावा यासाठी बाबासाहेबांनी प्रयत्न केले. आणि संविधानात गोरगरीब जनतेला त्यांचा न्याय हक्क मिळवून दिला. पण दुर्दैवाने या देशात पुन्हा एकदा मनुवादी शक्तीने डोके वर काढायला सुरुवात केलेली आहे .त्यामुळे इथल्या सनातनी लोकांना या देशाची घटना बदलायची आहे. त्यासाठी त्यांना फायदेशीर ठरतील असे कायदे केले जात आहेत. गोरगरीब कामगार, हातावर पोट असणारे आणि रोजंदारी करून जगणारे भूमीहीन कष्टकरी, यांच्या विरोधात कायदे केले जात आहेत. सध्या केंद्र सरकारने वाहतूक कायद्यात जी सुधारणा केली, ती अशीच अन्यायकारक आहे .केंद्र सरकारने वाहतूक कायद्यात सुधारणा करताना, जर एखाद्या वाहनचालकाने अपघात केला आणि तो तिथून पळून गेला, तर त्याला दहा वर्षाची शिक्षा आणि सात लाख रुपये दंड अशी शिक्षेची तरतूद केली आहे. मात्र ही तरतूद करताना केंद्र आणि जराही विचार केलेला नाही. वाहन चालक हे प्रामुख्याने गरीब कॅटेगिरीले असतात. त्यांचे फारसे शिक्षण झालेले नसते. त्यामुळे त्यांना कायद्याची फारशी जाणीव नसते. मग तो एखाद्या धन दांडग्याचा कारचालक असो, की ट्रक चालवणारा ड्रायव्हर असो हे सर्व गरी ब कॅटेगरीतले लोक असतात. त्यामुळे एखादा कायदा बनवताना तो पूर्णपणे त्यांच्या विरोधात असता नये. वाहन चालवताना नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे. त्याबद्दल वाद नाही. प्रत्येक वाहन चालकाने काळजीपूर्वक वाहन चालवून वाहतुकीचे जे नियम आहेत ते पाळायलाच हवेत. पण कधी कधी अपघात होतात. कोण काही मुद्दाम अपघात करत नाहीत. कारण शेवटी अपघातात ड्रायव्हरच्या ही जीवाला धोका असतो. अशावेळी ड्रायव्हर मुद्दाम अपघात कसा करील? तरीही रस्ते अपघात होतात. आणि गेल्या काही वर्षामध्ये या अपघातांची संख्या वाढलेली आहे. याला काही प्रमाणात वाहन चालक ही जबाबदार आहेत. काही वाहन चालक नशा पाणी करून ड्रायव्हिंग करतात. त्यामुळेही अपघात होतात. पण कोणीही मुद्दाम अपघात करीत नाही. आणि हे ठाऊक असतानाही, केंद्र सरकारने वाहतूक कायदा १०६ (२) मध्ये शिक्षेची अशी काही तरतूद केलेली आहे, की अपघात करणारे ड्रायव्हर म्हणजे कुणीतरी प्रोफेशनल खुनी आहेत. नव्या कायद्यात वाहन चालकाने अपघात केला आणि जर तो घटनास्थळावरून पळून गेला, तर त्याला दहा वर्षाची शिक्षा आणि सात लाख रुपये दंड. अशा पद्धतीची शिक्षेची तरतूद नव्या कायद्यात करण्यात आलेली आहे. इथे एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी, ती म्हणजे ड्रायव्हरच्या चुकीमुळे म्हणा, किंवा अनावधानाने म्हणा, अपघात घडला तर अपघात स्थळा भोवती शेकडो लोक जमा होतात .अशावेळी त्यांचे पहिले टार्गेट असते वाहन चालक! ते वाहन चालकाला धरून बेदम मारतात. त्याची चूक आहे की नाही याचा कोणीही विचार करीत नाही. अशावेळी वाहन चालकाला झालेल्या मारहाणीत कित्येक ठिकाणी वाहन चालकांचा मृत्यू झालेला आहे. त्यामुळे अपघातानंतर पब्लिकचा मार खाण्यापेक्षा, पळून गेलेले बरे या एकाच उद्देशाने वाहन चालक इथून पळून जातो. मग जीव वाचवण्यासाठी पळून गेलेल्या वाहन चालकाला जर सात लाखांचा दंड आणि दहा वर्षाची शिक्षा होणार असेल, तर भविष्यात गोरगरीब माणूस ड्रायव्हरची नोकरी करणारच नाही. मग जो माणूस कमी शिकलेला आहे. ज्याच्या घरची आर्थिक स्थिती चांगली नाही. त्या माणसाने काय करावे? दुसरा कोणता व्यवसाय करावा? ड्रायव्हर म्हणून परवाना घेण्यासाठी फार मोठ्या शिक्षणाची आवश्यकता नसते. म्हणूनच गरीब मध्यमवर्गीय समाजातील लोक ड्रायव्हर बनतात. पण जर सरकार अमानवी कायदे करणार असेल, तर त्यांनी जगायचे कसे? वाहतूक कायद्यात सुधारणा व्हायला हवी. आणि त्या सुधारणेच्या अनुषंगाने वाढत्या अपघातांना आळा बसायला हवा हे शंभर टक्के खरे आहे. पण त्यासाठी वाहतूक क्षेत्राचा संपूर्ण अभ्यास करून, यात नेमके काय करता येईल, याचा विचार करायचा सोडून, जर मनमानी कायदा केला, आणि त्याचा फटका गोरगरीब वाहनचालकांना बसणार असेल, तर देशातील जनता हे कदापि मान्य होणार नाही. सगळ्याच क्षेत्रात ना खाता! ना वही मोदी कहेगा वही सही! असे चालणार नाही. या देशात ब्राह्मण समुदायाने ज्याप्रमाणे आपल्या सोयीनुसार धार्मिक कायदे बनवले, आणि राबवले. तसा प्रकार २०१४ पासून सुरू झाल्याचे दिसत आहे. एखाद्या सरकारकडे पाशवी बहुमत आहे .याचा अर्थ असा नाही सरकार मनमानी निर्णय घेऊ शकेल. लोकांशी संबंधित असलेल्या कोणत्याही गोष्टीबाबत कायदा करताना ,लोकांना विश्वासात घेणे आवश्यक आहे .पण २०१४ पासून या देशात जे कोणी सत्तेवर बसलेले आहेत, ते लोकांचा विचार करायला तयार नाहीत. त्यांच्या मर्जीनुसार कायदे केले जात आहेत. नोटबंदी, जीएसटी किंवा अन्य कायदे हे आली लहर केला कहर! अशा पद्धतीने केले जात आहेत. एकीकडे आम्ही लोकहिताचे कायदे करीत आहोत असे जनतेला दाखवायचे. आणि दुसरीकडे कायद्याचा धाक दाखवून प्रशासनाला हाताशी धरून लोकांचे गळे आवळ्याचे. असे प्रकार सुरू झालेले आहेत. आज ईडी किंवा सीबीआय सारख्या सरकारी यंत्रणांचा कशाप्रकारे गैरवापर वापर केला जात आहे ते संपूर्ण देश बघतोय. भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाई व्हायलाच हवी. याबद्दल वाद नाही. पण भ्रष्टाचारी काय फक्त विरोधी पक्षांमध्येच आहेत का? सत्ताधारी पक्षांमध्ये कोणी भ्रष्टाचारी नाही का ?केवळ विरोधी पक्षांनाच टार्गेट केले जाते, आणि सत्ताधारी पक्षातल्या भ्रष्टाचारांना सोयीस्करपणे पाठीशी घातले जात आहे. सत्ताधारी आपल्या पक्षाची ताकद वाढवण्यासाठी, विरोधी पक्षातल्या भ्रष्टाचाऱ्यांना ईडी आणि सीबीआयचा धाक दाखवून आपल्याकडे ओढून घेत आहेत. दुसऱ्याचे पक्ष फोडून नवीन नवीन सरकारी बनवली जात आहेत. हा कायद्याचा दुरुपयोग नाही का? कायद्याचा दुरुपयोग करून किती दिवस सरकार टिकवणार? इडी, सीबीआय या सरकारी यंत्रणा आहेत. त्यामुळे त्या दबावाखाली काम करीत आहेत .त्यांना एका गोष्टीची भीती आहे, जर उद्या सत्तांतर झालं, तर विरोधी पक्षातले जे कोणी सत्तेत येतील ते आपल्याला सोडणार नाहीत. आणि भविष्यात तसेच होणार आहे. आज सरकारच्या ताटाखालचे मांजर बनून ईडी किंवा सीबीआयचे जे अधिकारी विरोधी पक्षातल्या लोकांना टार्गेट करीत आहेत. त्यांचे भविष्यात काही खरे नाही. जेव्हा सत्तांतर होईल तेव्हा हे सर्व अधिकारी तुरुंगात गेलेले असतील. मग अशा पद्धतीने सरकारी यंत्रणा चालवली जाणार आहे का? भारतीय राज्यघटना ही जगातली सर्वोत्तम राज्यघटना म्हणून ओळखली जाते. कारण भारतीय संविधानात जातीयवाद ह्या शब्दाला स्थानच नाही. तरीसुद्धा कायदा धाब्यावर बसवून सनातनी लोक डोके वर काढीत आहेत. त्यांचा या देशात पुन्हा एकदा मनुवादी समाज व्यवस्था आणण्याचा प्रयत्न आहे. जर त्यांना विरोध केला नाही तर या देशातील लोकशाही आणि बाबासाहेबांचे संविधान यांना फार मोठा धोका निर्माण होऊ शकतो.

# भारतातील पहिली शिक्षिका व कवयित्री सावित्रीबाई फुले!

सावित्रीबाई फुले यांचा जन्म सातारा जिल्ह्यात नेवासे पाटलाच्या घरात नायगाव येथे ३ जानेवारी १८३१ ला झाला त्यांचा विवाह महात्मा ज्योतिबा फुले यांच्याशी लहानपणी झाला होता. त्या काळात महिलांची स्थिती अतिशय दयनीय होती कारण हजारो वर्षापासून भारतातील स्त्रियांना स्वातंत्र्य नव्हते त्यांना शिक्षण नव्हते कोणतेही अधिकार नव्हते मनुस्मृतीने सर्व महिलांना व सर्व मागासवर्गीयांना ज्ञानापासून वंचित ठेवले होते त्यांना कोणत्याच प्रकारचे स्वातंत्र्य नव्हते सिंधू बंदी शिक्षण बंदी रोटी बंदी व्यवसाय बंदी शस्त्र बंदी इत्यादी घातल्यामुळे महिला व मागासवर्गीयांची प्रगती होऊ शकली नाही. इसवी सन १८२२च्या काळात महात्मा फुले यांचे कुटुंब पुणे येथे राहण्यास आले त्यांचे खरे आडनाव गोरे होते परंतु फुले विकण्याच्या व्यवसायामुळे त्यांना फुले असे आडनाव पडले महात्मा फुले यांच्या आईचे नाव चिमणाबाई होते त्या काळात महात्मा फुलेंचे वडील गोविंदराव यांनी ज्योतिबांना शाळेत टाकले परंतु उच्चवर्णीय नोकरामुळे त्यांनी ज्योतिबाला शाळेतून काढून घेतले परंतु त्या काळात गफार बेग मुंशी यांनी त्यांच्या वडिलांना शाळेत परत टाकण्यास सांगितले त्यामुळे ज्योतिबा त्या काळात मॅट्रिक समक्ष परीक्षा पास झाले ज्योतिबा अभ्यासात फार हुशार होते त्या काळात काही मशिनरी शाळा व पंतजींच्या शाळा होत्या एकदा ते एका उच्चवर्णीय मित्राच्या लग्नात गेले असताना त्यांना वरातीतून काढून देण्यात आले त्यामुळे त्यांना मोठा धक्का बसला त्यामुळे त्यांनी वेद महाभारत धर्मशास्त्रे व इतिहास वाचला त्यांना असे कळाले की वर्णभेद व जातीभेद धर्मशास्त्रात लिहिली आहेत त्यामुळे त्यांनी धार्मिक ढोंग बाजीविरुद्ध लढा उभारला त्यांच्या या कार्यामुळे त्यांना महाराष्ट्राचा मार्टिन ल्युथर म्हणतात महात्मा फुले यांना मुंबईच्या जनतेने कोळीवाड्यातील सभेत महात्मा ही पदवी दिली होती त्यांनी अमेरिकेचा इतिहास वाचला व त्यांनी इंग्रजा विरुद्ध लढण्याचे ठरविले परंतु नंतर त्यांनी सामाजिक व धार्मिक विषमते विरुद्ध लढा उभारला त्यामुळे त्यांच्या वडिलांनी त्यांना घराबाहेर काढून दिले. आठ हजार वर्षे पूर्वी मातृसत्ताक कुटुंब पद्धती अस्तित्वात होती महिला कुटुंब प्रमुख असायची महिलांनी शेतीचा शोध लावला महिला शेती घर बांधने व वैद्यकीय बाबतीत अतिशय हुशार होत्या परंतु ४००० वर्षापूर्वी भारतात आर्यांचे आक्रमण झाले व त्यांनी भारतातील सर्व महिलांना पुरुष सत्ता कुटुंब पद्धती सुरू करून गुलाम केले त्यांचे सर्व अधिकार रद्द केले व पुरुषाकडे सत्ता घेतली भारतात इंग्रजांणी शाळा सुरू करण्याचा प्रयत्न केला. त्या काळात महात्मा ज्योतिबा फुले यांनी इसवी सन १८६९ साली छत्रपती शिवाजी महाराजांची समाधी रायगडला शोधली व प्रथम शिवजयंती साजरी केली महात्मा ज्योतिबा फुले यांनी हंटर कमिशन पुढे सर्वांना शिक्षण मिळावे म्हणून साक्ष दिली तसेच तृतीय रत्न या नाटकाद्वारे सर्वप्रथम आरक्षणाची मागणी केली त्या काळात सत्यशोधक चळवळीमध्ये सर्व समाजाचे लोक सामील झाले होते इसवी सन १८९३ साली सासवड येथे झालेल्या सत्यशोधक समाजाच्या वर्धापन दिनाच्या सावित्रीबाई ह्या अध्यक्ष होत्या. दरम्यान महात्मा ज्योतिबा फुले यांना अर्धांग वायूचा त्रास होता त्यांच्या उजव्या हाताने लेखन होत नव्हते त्या काळात त्यांनी ज्योतिबा फुले यांची फार सेवा केली त्या सक्रिय कार्यकर्त्या होत्या त्या काळात येणाऱ्या जाणाऱ्यांची कार्यकर्त्यांची काळजी घेत असत हे शिक्षण १८९७ साली भारतात प्लेगची साथ आली होती त्या काळात हजारो लोक मरत होते त्या काळात त्यांनी त्यांचा दत्तक मुलगा डॉक्टर यशवंत याला घेऊन जनतेची खूप सेवा केली व त्यांनी एका गायकवाड नावाच्या मागासवर्गीय मुलाला खांद्यावर नेऊन वाचविले परंतु प्लेगमुळेच त्यांचे दहा मार्च १८९७ ला दुःखद निधन झाले. त्यानंतर महात्मा ज्योतिबा फुले यांनी मागासवर्गीयासाठी पाण्याची विहीर खुली करून दिली त्या काळात त्यांनी उच्चवर्णीय सहित सर्व समाजाच्या महिलांसाठी भिडे यांच्या वाड्यात इसवीसन १८४८ साली पहिली मुली साठी शाळा काढली व विशेष १८५१ ला अनुसूचित जाती जातीच्या मुलासाठी शाळा सुरू केली त्या काळात परांजपे गावंडे सारख्या मित्राने साथ दिली त्या काळात सावित्री बाई फुले यांना स्वतः शिक्षण दिले तसेच सावित्रीबाई फुले यांना नगरच्या अमेरिकन मिशन शाळेत शिक्षकाच्या अभ्यासक्रमासाठी उस्ताद लहुजी साळवे यांच्यासोबत पाठवले अशा तऱ्हेने त्या भारतातील पहिल्या महिला शिक्षिका बनल्या त्या काळात धर्म मार्तंड आणि मुलीची शाळा सुरू केली म्हणून त्यांना फार त्रास दिला त्यांच्यावर शेण फेकले दगड मारले परंतु त्यांनी शिक्षणाचे कार्य सुरू ठेवले त्या काळात त्यांच्यामुळे फातिमा शेख ह्या त्यांच्या विद्यार्थिनी पहिल्या मुस्लिम शिक्षिका बनल्या त्या काळात उस्ताद लहुजी साळवे यांनी त्यांना संरक्षण दिले त्यांची मातंग समाजाची विद्यार्थिनी मुक्ता साळवे हिने इसवी सन



१८५५ साली निबंध लिहिला की मागासवर्गीयांचा धर्म कोणता हा निबंध त्या काळात फार गाजला व त्या काळात लंडनमध्ये पाठवण्यात आला होता त्या काळात उच्चवर्णीय महिलांना लहानपणी वयस्करची लग्न झाल्यामुळे त्या लवकरच विधवा होत असे त्या काळात घरातील माणसे त्यांचे शोषण करीत असत त्यामुळे त्या गरोदर राहिल्यामुळे स्व हत्याकरीत असे किंवा लहान मुलांना दूर सोडून देत असेत्यामुळे महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांनी इसवी सन १८६० साली एक बालहत्या प्रतिबंध गृह काढले त्यांनी काशीबाई नातू या उच्चविणे विधवा महिलेला स्व हत्या करण्यापासून वाचविले व तिचा मुलगा यशवंत यास दत्तक घेतले तो पुढे डॉक्टर झाला होता त्याचा विवाह त्यांनी सत्यशोधक कार्यकर्त्यांच्या मुलीशी लावून दिला. इसवी सन १८७३ ला महात्मा ज्योतिबा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली त्या काळात त्यांनी वर्णभेद जातीभेद डोंग बाजी अंधश्रद्धा सामाजिक आर्थिक विषमता याच्या विरुद्ध लढा दिला सावित्रीबाई फुले यांनी खूप वाचन केले होते त्या काळात त्यांनी इसवी सन १८५२ साली इंग्रज सरकारने मेजर कँढी यांच्या अध्यक्षतेखाली महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांचा विश्रामबागेतील वाड्यात सत्कार केला सावित्रीबाई फुले यांच्या शाळेचा दर्जा व निकाल फार चांगला होता त्या काळात इसवी सन १८७६ मध्ये फार मोठा दुष्काळ पडला होता त्या काळात त्यांनी अन्नछत्रे चालवली त्या काळात इसवीसन १८५४ मध्ये सावित्री माता फुले यांनी काव्य फुले नावाचा कविता संग्रह लिहिला होता त्या उत्कृष्ट कवयित्री होत्या त्या काळात उच्चवर्णीय विधवा महिलांना केसवपन करण्यात येत होते त्या काळात महात्मा ज्योतिबा फुले यांनी नाभिक मंडळींना सांगून ही प्रताप बंद करण्याचे आंदोलन केले व ही बातमी त्या काळात लंडनच्या वर्तमानपत्रात आली होती व तेथील महिलांनी त्याबद्दल अभिनंदन केले होते. महात्मा ज्योतिबा फुले यांनी गुलामगिरी व शेतकऱ्यांचा आसूड हे ग्रंथ लिहिले धार्मिक सामाजिक आर्थिक गुलामगिरी विरुद्ध लढा दिला त्यांच्या महान कार्यात सावित्रीबाई फुले यांनी साथ दिली त्यांच्या शैक्षणिक कार्यामुळेच व त्यागामुळे भारतातील महिला प्रगती कडे जात आहेत त्यांच्यामुळे सर्व समाजांच्या महिला व पुरुष डॉक्टर वकील न्यायाधीश पायलट इंजिनियर प्राध्यापक झालेले आहेत त्यांच्याच कार्याला छत्रपती शाहू महाराज व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर गाडगे महाराज डॉक्टर पंजाबरावजी देशमुख यांनी पुढे चालवली आहे. मात्र आज ही काही महिला अंधश्रद्धा सामाजिक विषमता मानतातत्यामुळे आता महिलांनी जागृत होणे विज्ञानवाद व समतावाद मानने गरजेचे आहे सर्वांनी तसेच सर्व महिलांनी राष्ट्रमाता जिजामाता अहिल्या माता होळकर सावित्रीबाई फुले व रमाबाई आंबेडकर आणि ताराबाई शिंदे यांचा आदर्श ठेवला पाहिजे आज आपण पाहतो प्रत्येक शाळेमध्ये किंवा कार्यक्रमात शिक्षणाची जननी सावित्रीबाई फुले यांचा फोटो लावत नाहीत परंतु ती शिक्षणाची खरी जननी सावित्रीबाई फुले आहे म्हणून त्यांच्या या त्यागाला कार्याला आपण आदरांजली राहिली पाहिजे.

**– प्राचार्य शंकर सोनवणे, लातूर**

# अटल सागरी सेतू वेगवान प्रगतीचे उद्दिष्ट साध्य करणारा प्रकल्प – मुख्यमंत्री शिंदे



**मुंबई/प्रतिनिधी**

देशातील सर्वात जास्त लांबी असलेला २२ किमीचा समुद्री मार्गावरील 'अटल बिहारी वाजपेयी शिवडी–न्हावा शेवा अटल सेतू' (मुंबई पारबंदर प्रकल्प) या प्रकल्पामुळे वेगवान प्रगतीचे उद्दिष्ट साध्य होणार आहे. मुंबई ते नवी मुंबई हे दोन तासांचे अंतर अवघ्या २० मिनिटात पार होणार असल्याने या वेगवान वाहतुकीमुळे मुंबईकरांनाही मोठा दिलासा मिळणार असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. मुंबई ट्रान्स हार्बर लिंकचा (एमटीएचएल) 'अटल बिहारी वाजपेयी शिवडी–न्हावा शेवा अटल सेतू' (मुंबई पारबंदर प्रकल्प) चे १२ जानेवारी रोजी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लोकार्पण होत असून त्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी आज या अटल सेतूची ठिकठिकाणी थांबून



पाहणी करून आढावा घेतला. यावेळी कौशल्य विकास उद्योजगता व नाविन्यता मंत्री तथा मुंबई उपनगरचे पालकमंत्री मंगल प्रभात लोढा, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, मुंबई मनपाचे आयुक्त तथा प्रशासक आय.एस. चहल, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त (एमएमआरडीए) डॉ. संजय मुखर्जी, अतिरिक्त आयुक्त डॉ. सुधाकर शिंदे, डॉ. अश्विनी जोशी, रायगडचे जिल्हाधिकारी योगेश म्हसे, नवी मुंबई मनपाचे आयुक्त तथा प्रशासक राजेश नार्वेकर आदींसह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, अटल सेतू नवी मुंबई, रायगड यासह इतर शहरांना जोडत असून त्यामुळे या भागांमध्ये मोठ्या प्रमाणात विकासाचे प्रकल्प, मोठे उद्योग समूह येणार आहेत. त्यातून या परिसराचाही विकास होणार आहे. हा मार्ग शिवडी येथून सुरु होवून समुद्रमार्गे चिर्ले येथील न्हावा शेवा येथ इतर मार्गांना जोडला जातो. मुंबईतील वाहतूक कोंडीची समस्या संपणार असून मुंबई ते नवीमुंबईत अवघ्या २० मिनिटात जाता येणार आहे. प्रकल्पाचे काम पर्यावरणाचा समतोल राखून पूर्ण केले असून समतोलामुळे शिवडी समुद्र परिसरात फ्लेमिंगो पक्षी वाढले आहेत. हा सेतू मार्ग मुंबई– गोवा महामार्ग, वसई–विरार, नवी मुंबई, रायगड जिल्ह्याला जोडला जात असल्याने विविध मोठे उद्योग, विकासात्मक प्रकल्प नवी मुंबई परिसरात मोठ्या प्रमाणावर येणार असल्याने परिसराचाही विकास होणार आहे. युवकांच्या रोजगारासाठी ५०० स्किल कौशल्य विकास केंद्रे सुरू केली असून जनतेच्या हितासाठी महत्वाचे निर्णय सरकारने घेतले आहेत, आणखी विकासात्मक निर्णय घेत आहे.

**परिसर सुशोभिकरण, वृक्षारोपणाच्या सूचना**

मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी शिवडी ते चिर्ले या अटल सेतू पुलाची पाहणी करतानाच ठिकठिकाणी उतरुन तेथील सुविधांची माहिती घेत त्याअनुषंगांने विविध सूचना एमएमआरडीए अधिकाऱ्यांना दिल्या. अटल सेतूची नियमित स्वच्छता राखण्याबरोबरच परिसर सुशोभिकरण आणि वृक्षारोपण करण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या.

**सेतूवरील वाहतूक नियंत्रण केंद्राला मुख्यमंत्र्यांची भेट**

चिर्ले टोल प्लाझाजवळील वाहतूक नियंत्रण केंद्राला (कमांड सेंटर) मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी भेट देऊन पाहणी केली. अटल सेतूवरील वाहतुकीचे नियंत्रण आणि सीसीटीव्ही यंत्रणेचे कार्य आदींचीही मुख्यमंत्र्यांनी माहिती घेतली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या दौऱ्याच्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनासह एमएमआरडीए अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. अटल सेतूची पाहणी केल्यानंतर चिर्ले येथे स्वच्छता कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. या भागात प्रकल्पाचे उद्घाटन थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे.

**अटल सेतूविषयी थोडक्यात**

मुंबई ट्रान्स हार्बर सागरी मार्ग (एमटीएचएल) हा अति जलद, अति महत्त्वाचा आणि स्थापत्य अभियांत्रिकीचा देशातील आदर्श नमुना. ५०० बोइंग विमाने व १७ आयफेल टॉवर एवढ्या वजनाच्या लोखंडाचा वापर. शिवडी–न्हावा शेवा सागरी सेतू एकूण २२ किमी लांबीचा असून त्यातील १६.५० किमी भाग समुद्रामध्ये तर उर्वरित ५.५० किमी भाग जमिनीवर. भारतातील सर्वात मोठा सागरी सेतू तर जगातील १२ व्या क्रमांकाचा सागरी सेतू.

सागरी सेतूसाठी १८ हजार कोटी रुपयांचा खर्च. सागरी सेतू मुंबई बंदर व जवाहरलाल नेहरू पोर्ट या दोन प्रसिद्ध बंदरांना जोडणारा. मुंबई, नवी मुंबई, रायगड, मुंबई–पुणे द्रुतगती महामार्ग तसेच मुंबई–गोवा महामार्ग यातील अंतर जवळजवळ १५ किमीने कमी झाले. महासेतू पूर्ण होण्यासाठी सुमारे सात वर्षाचा कालावधी लागला.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई–६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०–२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा–वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

08 TO 14 JANUARY 2024 - Page 5 (CRIME SANDHYA):Layout 1 1/6/2024 7:39 PM Page 1



# जिल्हा परिषदमार्फत राबवण्यात येणार 'माझी शाळा सुंदर शाळा' अभियान!

**पालघर/प्रतिनिधी**



शालेय शिक्षण व क्रीडा विभागाकडील शासन निर्णय क्र.मुमंअ २०२३ /प्र.क्र११४/ एसडी-६ दि.३० नोव्हेंबर २०२३ अन्वये राज्यातील सर्व माध्यमाच्या व सर्व व्यवस्थापनाच्या शाळांमधील शिक्षक, पालक, विद्यार्थी व माजी विद्यार्थी यांच्यात शाळेप्रती उत्तरदायित्वाची भावना निर्माण व्हावी व त्यायोगे स्पर्धात्मक वातावरणातून विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी आनंददायी व प्रेरणादायी वातावरण मिळावे यासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेंतर्गत मुख्यमंत्री माझी शाळा-सुंदर शाळा अभियान हे अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या माध्यमातून, विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता विकसित करण्याबरोबरच अध्ययन, अध्यापन व प्रशासन यात आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरास प्रोत्साहन देणे. शिक्षणासाठी पर्यावरण पूरक व आनंददायी वातावरणाची निर्मिती करणे. क्रीडा, आरोग्य, वैयक्तिक व परिसर स्वच्छतेचे महत्व अधोरेखित करून राज्यातून कचऱ्याबाबतच्या निष्काळजीपणाची सवय मोडून काढणे, राष्ट्रप्रेम व राष्ट्रीय एकात्मता याबाबत विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करणे. विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षणाचे महत्व पटवून देणे, विद्यार्थ्यांच्या अंगभूत गुणांना प्रोत्साहन देऊन त्यांच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण करणे. ही उद्दिष्ट साध्य करण्यासाठी ४५ दिवसात अभियानांतर्गत विद्यार्थी केंद्रित ६ उपक्रमाअंतर्गत ६० गुणांचे व शाळा व्यवस्थापनाकडून आयोजित ५ उपक्रम व त्यातील विविध घटकांचा सहभाग यासाठी ४० गुण असे एकूण १०० गुण मुल्यांकनासाठी ठेवण्यात आले आहेत. सदर मुल्यांकनाकरिता प्राथमिक स्तरावरील, तालुकास्तरावरील, जिल्हास्तरावरील, विभागस्तरावरील मुल्यांकन समिती शासननिर्णयात नमूद करण्यात आली आहे. यात शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळांमधील व उर्वरित इतर व्यवस्थापनाच्या शाळांकरिता प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक आलेल्या तालुकास्तरावर पहिले बक्षीस रु.३ लाख, दुसरे बक्षीस रु.२ लाख, तिसरे बक्षीस रु.१ लाख तर जिल्हास्तरावर पहिले बक्षीस रु.११ लाख, दुसरे बक्षीस रु.५ लाख, तिसरे बक्षीस रु.३ लाख व विभागस्तरावर पहिले बक्षीस रु.२१ लाख, दुसरे बक्षीस रु.११ लाख ,तिसरे बक्षीस रु.७ लाख आणि राज्यस्तरावर पहिले बक्षीस रु.५१ लाख, दुसरे बक्षीस रु.२१ लाख, तिसरे बक्षीस रु.११ लाख रक्कम पारितोषिक म्हणून अनुदेय असेल.तरी पालघर जिल्ह्यातील सर्व शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळा व उर्वरित इतर व्यवस्थापनाच्या शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी, पालक, माजी विद्यार्थी, शाळा व्यवस्थापन समिती, केंद्रप्रमुख व गटशिक्षणाधिकारी तसेच सर्व शिक्षण प्रेमी यांना आवाहन करण्यात येते की भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेंतर्गत मुख्यमंत्री माझी शाळा-सुंदर शाळा अभियान या अभियानात १००% सहभाग नोंदवावा. या योजनेअंतर्गत https://education.maharashtra.gov.in या शासनाच्या वेबसाईट वरील सरल प्रणालीमधील शाळा (संकेतस्थळ) पोर्टलवर मुल्यांकनाकरिता व्यवस्था करण्यात आली आहे.

प्रत्येक शाळा स्तरावर लॉगीन मध्ये या अभियानाच्या मुल्यांकनाची प्रश्नावली समोर पीडीएफ/ छायाचित्र व त्या समोर शब्दात विवरण नमूद देण्यात आली आहे. तरी सर्व शाळांनी या उपक्रमांतर्गत उपक्रमनिहाय फोटो, व्हिडिओ व चित्रीकरण, वृतपत्रे कात्रणे पोर्टल वर दि. १५/०१/२०२४ पर्यंत उपलोड करून आपला सहभाग नोदवावा, असे आवाहन जिल्हा परिषद अध्यक्ष, मुख्य कार्यकारी अधिकारी, उपाध्यक्ष, शिक्षणाधिकारी (प्राथमिक/ माध्यमिक), यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# देवणीत आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन!




**देवणी/प्रतिनिधी**

देवणी शहरात दर्पण दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात देवणी शहरातील आप्पाजी कॉम्पलेक्स मधील दै.पुण्यनगरी संपर्क कार्यालयात आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन करण्यात आले. प्रतिमेचे पुजन देवणी शहराचे उपनगराध्यक्ष अमित मानकरी यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी व्हॉईस ऑफ मिडीया संघटनेचे देवणी तालुकाध्यक्ष दैनिक 'पुण्यनगरी' तालुका प्रतिनिधी प्रा.रेवण मळभागे सर होते. यावेळी ज्येष्ठ पत्रकार महेश कंजे, हसन मोमीन, शकील मनियार, आनंद अंकुलगे, आश्विन लांडगे, बालाजी कवठाळे, शादुल बौडीवाले, लक्ष्मण रणदिवे, प्रमोद लासुणे, सागीर मोमीन, राहुल बालुरे, कृष्णा पिंजरे इत्यादीसह असंख्य पत्रकार बांधव उपस्थित होते.

## तलासरी, डहाणू तालुक्यात ३.४ रिष्टर स्केलचा भूकंपाचा धक्का!

डहाणू : पालघर मधील तलासरी व डहाणू तालुका पुन्हा एकदा भूकंपाने हादरला आहे. आज दुपारी १:४७ मिनिटांच्या सुमारास ३.४ रिष्टर स्केलचा भूकंपाचा धक्का बसला. भूकंपामुळे नागरिकांमध्ये पुन्हा भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पालघर मधील डहाणू आणि तलासरी तालुक्यात २०१८ पासून भूकंपाचे धक्के बसण्याचे प्रकार सुरू आहेत. या वर्षी जानेवारीच्या पहिल्या आठवड्यामध्ये भूकंपाचे हादरे जाणवत आहेत. अचानक पुन्हा सुरू झालेल्या भूकंपाच्या हादऱ्यांमुळे परिसरातील नागरिकांमध्ये पुन्हा भीती पसरली आहे. भूकंपामुळे आपत्कालीन परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता असल्यामुळे प्रशासनाकडून भूकंप प्रवण क्षेत्रात पुन्हा जनजागृती करून सुरक्षा साधनांचे वाटप करण्याची मागणी करण्यात येत आहे.

# गौतमनगर निर्मळ गावात शौर्यदिन उत्साहात साजरा



**वसई/प्रतिनिधी**

१ जानेवारी शौर्यदिना निर्मित गीतमनगर गास, (निर्मळ) रहिवासी संघातर्फे शौर्य दिन उत्सहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरूवात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्ध पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून सामुदायिक त्रिशरण पंचशील घेण्यात आले. तदनंतर उभारण्यात आलेल्या विजयस्तंभास ग्रामस्थ व पदाधिकारी यांच्यातर्फे मानवंदना देण्यात आली. गौतमनगर गावचे अध्यक्ष तथा भारतीय बौद्ध महासभा वसई तालूका अध्यक्ष मंगेश क. मोहित व संस्थापक कृष्णाजी चव्हाण आणि कार्यकर्ते चंद्रकांत स. चव्हाण, नरेश तांबे यानी १ जानेवारी भिमा कोरेगाव शौर्य दिनाचे महत्व वरील मान्यवरांनी पटवून दिले. विजयस्तंभाची सजावट व अवती-भवतो रांगोळी महिलानी काढून चांगले वार्तावरण निर्माण केले. कार्यक्रमाच्या शेवटी आभार सहसचिव अनंत चव्हाण यांनी मानले. कार्यक्रमात यशस्वी रित्या पार पाडण्यात गौतमनगर, गास (निर्मळ) रहिवासी संघाच्या सर्व पदाधिकारी व कार्यकत्यानी मेहनत घेऊन कार्यक्रम पार पाडला.

# वसई किल्ल्या संवर्धन करणे काळाची गरज -श्रीदत्त राऊत

**वसई/प्रतिनिधी**




वसईचा किल्ला हे वसईचे भूषण आहे. जगाच्या नकाशावर वसईचा किल्ला अशी ऐतिहासिक ओळख वसईची आहे. काळानुसार वसईच्या किल्ल्याची प्रचंड प्रमाणात पडझड होत आहे. परंतु या किल्ल्याचे संवर्धन करणे हि आजच्या काळाचे गरज आहे, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध इतिहास संशोधक श्रीदत्त राऊत यांनी समाज उन्नती मंडळ माणिकपूर संचलित मनोहर वाचनालय व जेष्ठ नागरिक संघ आयोजित वसईतील 'न्यात अज्ञात ऐतिहासिक स्थळे' या कार्यक्रमात केले. या कार्यक्रमाचे प्रास्तविक भाषण डॉ.प्रदीप जाधव यांनी केले. आपल्या प्रास्तविकपर भाषणात त्यांनी श्रीदत्त राऊत यांनी सतत २१ वर्ष केलेल्या गड संवर्धन व इतिहास संकलनाचा कार्याची माहिती उपस्थित प्रेक्षकांना दिली. प्रथम श्रीदत्त राऊत यांनी व्हिडीओच्या माध्यमातून वसई किल्ल्याचा संपूर्ण अंतर्गत भागाची सखोल माहिती दिली. वसई परिसरातील प्राचीन मंदिरे, गड किल्ल्यांची माहिती दिली चिमाजी अप्पाचा जीवनपट आपल्या सुमधुर शब्दांनी उलगडून प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. सध्या वसई किल्ल्यात चालणाऱ्या अनैतिक गोष्टीबद्दल खेद व्यक्त केला. वसईचा किल्ला हे उत्तम पर्यटन होऊ शकते. या साठी किल्ल्यामध्ये अनेक सुविधांची गरज आहे. यासाठी शासकीय व राजकीय इच्छा शक्तीची गरज आहे असे परखड मत व्यक्त केले. या कार्यक्रमांतर्गत मंडळातर्फे घेण्यात आलेल्या 'चित्रकला स्पर्धा व हस्ताक्षर स्पर्धा यांचे निकाल जाहीर करून विजेत्या मुला-मुलींचा सत्कार प्रमाणपत्र व भेटवस्तु देऊन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. तसेच ७५ वर्ष पूर्ण झालेल्या जेष्ठ नागरिकांचा देखील सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमासाठी मंडळाचे अध्यक्ष डॉ.प्रदीप जाधव, कार्यध्यक्ष हेमंत राऊत, विश्वस्थ अनिल वनमाळी, चिटणीस, जे.ना.संघ जगदीश जाधव व्यासपीठावर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व उपस्थितांचे आभार डॉ. प्रदीप जाधव यांनी मांडले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी, मनोहर वाचनालयाचे कर्मचारी व पदाधिकारी यांनी अथक परिश्रम घेतले.

# पालघर जिल्ह्यातील एसटीचे उत्पन्न वाढले मात्र कामगारांची उणीव!

**पालघर/प्रतिनिधी**

पालघर जिल्ह्यात एकूण आठ एसटी आगार आहेत. गणपती, होळी, दिवाळी या सणांच्या निमित्ताने एसटीला राज्यात प्रवासी वाहतूक करताना चांगले उत्पन्न मिळाले तरी आगारात कर्मचाऱ्यांची संख्या अतिशय कमी असल्याने एकेका आगाराच्या गरजेनुसार कर्मचारी उपलब्ध नाहीत. एसटी महामंडळ कर्मचारी भरती करीत नाही. त्यामुळे आगारांना शंभर-शंभर कर्मचाऱ्यांची कमतरता भासत असून मनुष्यबळा अभावी प्रवाशांना त्यांच्या गरजेनुसार सेवा देता येत नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पन्नास वर्षे व त्याहून अधिक वयाच्या महिलांना एसटी भाड्यात ५० टक्के सूट दिली आहे. ६५ वर्षे वयाच्या ज्येष्ठांना तिकिटात ५० टक्के सवलत दिली आहे. तर ७५ वर्षे वयाच्या प्रवाशांना एसटीचा मोफत प्रवास आहे. त्यामुळे एसटीला प्रवासी वाढ झाली खरी मात्र कर्मचारी भरतीत एसटी महामंडळ करीत नाहीत. त्यामुळे येनकेन प्रकारे शासनाच्या धोरणाप्रमाणे एसटीचे उत्पन्न वाढले तरी प्रवासी सेवा वाढविता येत नाही. राज्य सरकार या बाबत का धोरण बदलून कर्मचाऱ्यांची भरती करीत नाहीत. अलिकडे एसटीचे ड्रायव्हर भरती करायचे म्हटले तर कमी पगारात चांगले ड्रायव्हर मिळत नाहीत.आता ड्रायव्हरसारख्या कुशल कामगारांना अनेक संधी उपलब्ध असतात. एसटी महामंडळाचा दोलायमान कारभार सर्वश्रृत असल्याने एसटीला ड्रायव्हर कमी पगारात मिळत नसावे. नियमानुसार वेतन व सर्व भत्ते व सवलती कर्मचाऱ्यांना मिळाल्या तर तसेच वेळेवर पगार मिळाला तर एसटीला ड्रायव्हरची उणीव भासणार नाही.

# अंबरनाथ नगरपरिषदेच्या आवारात मनसे कार्यकर्त्यांचे 'कचरा फेक' आंदोलन

**अंबरनाथ/प्रतिनिधी**



अंबरनाथमध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने कार्यकर्त्यांनी अंबरनाथ नगर परिषदेच्या आवारात कचरा फेक आंदोलन केल. अंबरनाथ मधील वार्ड क्रमांक २८ मधील नागरिकांनी वेळोवेळी अर्ज करूनही नगरपालिकेने वार्डातील कचरा उचलला जात नसल्याने, परिसरातील चौकामधील कचरा उचलून अंबरनाथ नगरपरिषदेच्या आवारात कचरा फेक आंदोलन करण्यात आले. कचऱ्याचा ढिगारा साचल्याने दुर्गंदी पसरत असल्या मुळे आजार निर्माण होतात. वार्ड नं.२८ मधील नागरिकांचे म्हणणे असून, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पदाधिकारी यांनी दखल घेत,बबलू खान यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. वार्डातील त्वरित कचरा उचलला न गेल्यास आरोग्य अधिकाऱ्यांच्या टेबलावर कचरा फेकून आंदोलन करणार असा इशारा मनसेच्या कार्यकर्त्यांनी यावेळी दिला. या आंदोलना दरम्यान मनसेच्या कार्यकर्त्यांनी नगरपालिका कार्यालयात अधिकाऱ्यांच्या विरोधात घोषणाबाजी करीत आंदोलन केले. आंदोलन वेळी मनसे कार्यकर्ते, तसेच वार्ड मधीलअसंख्य नागरिक उपस्थित होते.

# विविध मागण्यांसाठी जनतेचे तहसील कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन

**वाडा/प्रतिनिधी**



वाडा तालुक्यातील जनतेच्या अत्यंत महत्त्वाच्या व जिव्हाळ्याच्या मागण्यांसंदर्भात समाजिक कार्यकर्ते सुनिल धानवा यांच्या मार्गदर्शनाखाली वाडा तहसील कार्यालयासमोर आक्रोश मोर्चा व ठिय्या आंदोलनाचे आयोजन करण्यात आले होते. या आंदोलन महिलांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला होते. वाडा तालुक्यातील गरीब रेशन कार्ड धारकांना तसेच विभक्त कुटुंबांना तात्काळ रेशनधान्य मिळाले पाहिजे, रेशनकार्ड आधारकार्ड व इतर ऑनलाईन पद्धत तात्काळ पूर्ण करून रेशन कार्डधारकांना न्याय मिळावा. वाडा तालुक्यातील सर्व मुख्य रस्त्यावरील खड्डे बुजवण्यात यावेत, गायरान इमान देवस्थान जमिनी कसणाऱ्यांच्या नावे झाल्या पाहिजे, गाव पाड्यातील रस्त्याची सोय झाली पाहिजे व ओहोळ नाला पाण्याच्या ठिकाणी साकव बांधून जनतेची सोय झाली पाहिजे, पावसामुळे नैसर्गिक आपत्ती व नुकसान झालेल्या सर्व शेतकरी वनपट्टेधारकांना नुकसान भरपाई मिळाली पाहिजे, आंबा व शेतीच्या इतर नुकसानीची भरपाई मिळाली पाहिजे, आरोग्य सेवा तात्काळ व योग्यवेळ मिळावी, वन विधेयक कायद्याची अंमलबजावणी व्हावी, रोजगार हमी कायद्याची अंमलबजावणी तात्काळ झाली पाहिजे अशा विविध मागण्या घेऊन धानवा यांनी तहसीलदार भाऊसाहेब अंधारे यांची भेट घेऊन चर्चा केली यावेळी मोर्चे करी ठिय्या मांडून बसले होते.

# समाजात सर्वत्र महिलांचा सन्मान होणे, हेच खरे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना अभिवादन -पालिका आयुक्त अजय वैद्य

**भिवंडी/प्रतिनिधी**



समाजातील सर्व स्तरातील महिला जिथे काम करतात, तिथे त्यांचा योग्य तो मानसन्मान होणे आवश्यक असून त्यांना घरीदेखील मान सन्मान देणे आवश्यक आहे, आपल्या रितीरिवाजा प्रमाणे स्त्री ही पूजनीय आहे, स्त्रीला मातृत्व दातृत्वाची देणगी आहे, आपण स्त्रीशक्ती रुपात तिची पूजा करतो, भारत देशाला आपण मातेच्या रूपात बघतो आहे म्हणून भारताला सुद्धा आपण भारत माता म्हणून उल्लेख करतो अशा स्त्रीवर कुठेही अन्याय होणार नाही, त्यांच्या वर अत्याचार होणार नाही, याची दखल सर्व समाजाने घेणे आवश्यक आहे तेच खऱ्या अर्थाने सावित्रीबाई फुले यांना अभिवादन असेल असे प्रतिपादन पालिका आयुक्त अजय वैद्य यांनी केले. सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त मुख्य कार्यक्रमाचे आयोजन स्व.गाजेंगी सभागृह करण्यात आले होते.त्यावेळी पालिका आयुक्त अजय वैद्य बोलत होते. यावेळी व्यासपिठावर पालिका अतिरिक्त आयुक्त संजय हेरवाडे, विठ्ठल डाके, उपायुक्त मुख्यालय दीपक झिंजाड, समाज कल्याण उपायुक्त प्रणाली घोंगे, कार्यक्रमाच्या मुख्य अतिथी डॉ.अरुंधती भालेराव, वैद्यकीय अधिकारी बुशरा सय्यद, भिवंडी इंडीयन मेडिकल असोसिएशनच्या भिवंडी शाखेच्या अध्यक्षा डॉ.उज्वला बर्दापूरकर उपस्थित होते. भारतीय संस्कृती हे महिलांचा सन्मान करणारी संस्कृती आहे. असे सांगत आयुक्त अजय वैद्य यांनी अनेक पौराणिक दाखले देत महीलांचा महत्व विषद केले. आज अनेक महिला विविध ठिकाणी चांगल्या प्रकारे काम करीत आहेत. पालिकेत कार्यरत असलेल्या महिला देखील विविध ठिकाणी चांगले काम करीत आहेत. विशेष उल्लेखनीय म्हणजे वैद्यकीय आरोग्य विभागात अनेक महिला चांगल्या प्रकारे काम करत आहेत.चार महिला अधिकारी आज संपूर्ण वैद्यकीय विभाग सांभाळत आहेत. या वैद्यकीय विभागात व आरोग्य विभागात प्रत्यक्ष जागेवर वस्तीमध्ये, नागरिकांमध्ये मध्ये जाऊन काम करणाऱ्या अशा चांगल्या महिला कर्मचारी यांचा या निमित्ताने सत्कार करण्यात येत आहे ही अभिनंदनीय बाब असल्याचे आयुक्त अजय वैद्य यांनी शेवटी नमूद केले. यावेळी डॉ.अरुंधती भालेराव यांचा महिलांच्या जीवनावर आधारित ती आणि मी हा विशेष कार्यक्रम महिलांच्या आयुष्यावर विविध टप्प्यांवर स्त्री जन्मापासून तिच्या वार्धक्यापर्यत प्रवास प्रसंगानुरुप गाण्याद्वारे सादर केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपायुक्त प्रणाली घोंगे यांनी केले तर आभार प्रदर्शन जनसंपर्क अधिकारी मिलिंद पळसुले यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्याकरता समाज कल्याण विभाग प्रमुख प्रकाश वेखंडे व त्यांच्या सहकारी यांनी विशेष मेहनत घेतली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला पालिका आयुक्त अजय वैद्य यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.


**जिल्हा परिषद पालघर**
**ग्रामीण पाणीपुरवठा विभाग**

जा.क्र.:पाजिप/पापुवि/निविदा/११/२०२४ दिनांक : ०३/०१/२०२४

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर यांच्या वतीने कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद पालघर यांचेकडील जिल्हा परिषदेच्या अखत्यारितील विविध विभागाकडील वाहन, भंगार साहित्य, फर्निचर, संगणक तसेच अनुषंगिक बाबींच्या विक्रीबाबत Online द्वारे निविदा मागविण्यात येत आहे.

- विस्तृत माहिती व सविस्तर निविदा प्रपत्रे हे http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
- सदरची निविदा दिनांक ०४/०१/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजल्यापासून दिनांक १८/०१/२०२४ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत Download करता येतील.
- यापुढील सर्व शुद्धीपत्रक अथवा इतर माहिती ही http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरूनच प्रसिद्ध केली जाईल.

निविदा अटी शर्तीमध्ये बदल करणे. प्राप्त निविदेपैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. पालघर यांनी राखून ठेवला आहे.

सही/-
(जी.पी. निवडंगे)
कार्यकारी अभियंता
ग्रामीण पाणीपुरवठा विभाग
जिल्हा परिषद, पालघर


# कथाकथन स्पर्धेत कादंबरी मुद्रस आणि संतोष गायकवाड यांची बाजी



वसई : वसईमध्ये नरवीर चिमाजी आप्पा मैदानात सुरु असलेल्या ३४ व्या वसई तालुका कला क्रीडा महोत्सवामध्ये आयोजित मराठी कथाकथन स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक सौं कादंबरी विकास मुद्रस आणि तर द्वितीय पारितोषिक संतोषकुमार गोविंद गायकवाड यांनी पटकवून बाजी मारली आहे. या स्पर्धेत उत्तेजनार्थ म्हणून धनश्री दाडस हिने बक्षीस मिळविले.

# तृतीयपंथीयांच्या वेशात ट्रेमध्ये शिरले आणि प्रवाशांना लुटले

**नागपूर/प्रतिनिधी**

हिजड्यांच्या वेशात आलेल्या ६ जणांनी पुणे हटिया गाडीत प्रवाशांना लुटले. दहा जणांना बेदम मारहाण करून लुबाडल्याची धक्कादायक घटना आज पहाटे घडली. एका महिलेने पैसे नसल्याचे सांगितल्याने तिच्या एक वर्षाच्या मुलीला हिसकावल्याचे समोर आले आहे. या गाडीतील प्रवाशांनी दिलेल्या माहितनुसार, २२८४५ पुणे हटिया ही गाडी बुधवारी सकाळी ११ वाजता पुण्यावरून निघाली. साधारण रात्री १२ वाजताच्या सुमारास वर्धा स्टेशनवर गाडी थांबली. सर्वात शेवटी असणाऱ्या जनरल कोचमध्ये ६ लुटारु चढले. गाडी सुरू होताच सुरुवातीला टाळ्या वाजवत त्यांनी पैसे मागायला सुरूवात केली. प्रत्येकाने किमान ५०० रुपये द्यावे असे फर्मान त्यांनी सोडले, जे देत नव्हते त्यांना बेदम मारहाण केली जात होती. अशा प्रकारे किमान दहा जणांना मारहाण झाल्याची माहिती आहे. एका महिलेने आपल्याजवळ पैसे नसल्याचे सांगताच तिची १ वर्षाची मुलगी त्यांनी हिसकावून घेतली, पैसे दे नाही तर या मुलीला घेऊन जाऊ, असे ते म्हणत होते, शेवटी अन्य प्रवाशांनी पैसे गोळा करून दिल्यावरच मुलीला सोडण्यात आले. जवळपास दीड तास या गाडीत हा धुमाकूळ सुरू होता. रात्री दीड वाजताच्या सुमारास आजनी नागपूर दरम्यान गाडीचा वेग कमी झाला, तेव्हा सर्व लुटारू उतरून पळून गेले, यापैकी एकाच्या हाती पिस्तूल होते त्यामुळे घाबरून आम्ही विरोध केला नाही असे प्रवाशांचं म्हणणं आहे.

# राष्ट्रीय नाभिक संघटना आपल्या दारी या उपक्रमाची कुडुस येथे सांगता

**वाडा/प्रतिनिधी**

वाडा तालुक्यात राष्ट्रीय नाभिक संघटना वाडा तालुका अंतर्गत नाभिक समाजाची जनजागृती करण्यासाठी राष्ट्रीय नाभिक संघटना आपल्या दारी हा उपक्रम दिड महिन्यापासून चालु केलेला होता. नाभिक समाजाची असलेली परिस्थिती व्यवसाय चालविण्यासाठी येणाऱ्या अडचनी तसेच कोरोना काळापासून नाभिक व्यवसायावर झालेल अतिक्रमन तसेच शासकीय योजनेचा लाभ नाभिक समाजाला कसा मिळेल या अश्या अनेक असणाऱ्या अडचनी राष्ट्रीय नाभिक संघटनेच्या माध्यमातून सोडविण्यासाठी संघटना आपल्या दारी हा उपक्रम राष्ट्रीय नाभिक संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री अरुणजी जाधव व राष्ट्रीय सरचिटणीस श्री महेंद्रजी जाधव यांच्या आदेशाप्रमाणे सुरु केलेला होता या उपक्रमाची सुरवात वाडा तालुक्यातील खैर अंबिवली या गावातुन करण्यात आली त्यानंतर दूसरा टप्पा गातेस या गावात व तीसरा टप्पा



केलठन व चौथा टप्पा अंबिस्ते व टकली याठिकाणी व पाचवा टप्पा कुडुस या ठिकाणी ठेवुन या उपक्रमाची सांगता करण्यात आली या ठिकाणी पालघर जिल्हा सरचिटणीस बबन भोईर यांनी राष्ट्रीय नाभिक संघटनेची पालघर जिल्हात नाभिक समाजाची असलेली परिस्थिती याबद्दल समाजाला माहिती दिली तसेच पालघर जिल्हाध्यक्ष मनोज जाधव यांनी वाडा तालुक्यातील नाभिक समाजाची असलेली ताकद व महिलांना समाजाची तसेच संघटनेची माहिती देऊन त्यांना पुढे कस नेता येईल या बाबत उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले व राज्य शासन व केंद्र शासन असलेल्या योजनाची माहिती तसेच राष्ट्रीय नाभिक संघटनेचे कार्य व सामाजिक काम तसेच नाभिक समाजाला कसा न्याय देता येईल तसेच वाडा तालुक्यातील नाभिक समाजाच्या असणाऱ्या अडचनी याबाबत त्यांच्या अडचनीचे समाधान याबाबत मार्गदर्शन प्रदेश सचिव तुषार भोईर यांनी केले या उपक्रमाला राष्ट्रीय नाभिक संघटनेचे प्रदेश सचिव तुषार भोईर, ठाणे पालघर विभागीय अध्यक्ष रामचंद्र भोईर, पालघर जिल्हाध्यक्ष मनोज जाधव, पालघर जिल्हा सरचिटणीस बबन भोईर, कर्मचारी संघटना पालघर जिल्हाध्यक्ष भूपेंद्र चातुर्य, पालघर जिल्हा युवाध्यक्ष धनेश साने, वाडा तालुका कार्याध्यक्ष सचिन भोईर, तालुका सचिव प्रफुल्ल काळे, महिला आघाडी तालुकाध्यक्ष रुपाली भोईर, उपाध्यक्ष, रविंद्र जाधव, वाडा शहर अध्यक्ष विशाल जाधव, युवा अध्यक्ष प्रथमेश भदाने व राष्ट्रीय नाभिक संघटनेचे पदाधिकारी व नाभिक समाजाच्या महिला व बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान १ वरून...

## अश्विनीच्या 'लव्ह स्टोरी'चा भयंकर...

कामाला लागली. गळ्यावर दाबल्यागत खुणा दिसत असल्याने पोलिसांनी तपासाची गती वाढवली व आशिषला विचारपूस केली. यावेळी तो पोलिसांसोबत दवाखान्यात होता. शवविच्छेदन अहवालात सर्व उघड होण्याची कल्पना येताच त्याने रात्री दवाखान्यातच खुनाची कबुली दिली. पोलिसांनी या प्रकरणी भादंवि ३०२ अन्वये गुन्हा नोंद करून आशिषला ताब्यात घेतले. गुन्ह्याचा तपास पोलिस निरीक्षक अभिजित पाटील व उपनिरीक्षक महेंद्र शहारे, हवालदार विनायक बेदरकर करीत आहेत. अश्विनी नागपूरला मावशीकडे राहायची. घरची परिस्थिती हलाखीची असल्याने ती नागपूरला व्यावसायिक शिक्षण घेत होती. १२ वी नंतर तिने भंडारा येथील महाविद्यालयात तात्पुरता प्रवेश घेतला होता. सध्या हिवाळी परीक्षा सुरू असल्याने ती परीक्षा देण्यासाठी २२ तारखेला सोनूली येथे आली होती.

## राम राम केला म्हणून जाब विचारायला...

या कारणामुळे चक्क हत्या करण्यात आली आहे. या प्रकारामुळे लातूरात खळबळ माजली. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. आरोपी फरार झाले असून पोलिस त्यांचा तपास करत आहे. सकाळी नमस्कार का घातला? यावरूनही वाद उफाळून आला होता. होळी या गावातील महादेव उर्फ मुन्ना केरबा यादव आणि त्यांचा लहान भाऊ संभाजी केरबा यादव सकाळी घरासमोर बसले असताना गावातील काही तरुणांनी नमस्कार घातला होता. यावरून वाद वाढला आणि विकोपाला गेला. सकाळी शाब्दिक बाचाबाची झाली होती. यादव बंधूचे प्रकाश जाधव यांच्यासोबत शिव रस्त्यावरून वाद सुरू होते. त्यातच सकाळी नमस्कार का घातला यावरूनही वाद उफाळून आला होता. रात्री दहा वाजताच्या सुमारास यादव बंधू यांनी सकाळच्या घटनेचा जाब विचारण्यासाठी प्रकाश जाधव यांच्या घराकडे गेले. त्यावेळी प्रकाश जाधव यांच्या सह तीन ते चार जणांनी त्यांच्यावर तीक्ष्ण हत्यारांनी वार सुरू केले. या जबर हल्ल्यात महादेव उर्फ मुन्ना याचा जागीच मृत्यू झाला असून लहान बंधू संभाजी गंभीर जखमी झाला आहे. महादेव यादव याच्या शरीरावर तीक्ष्ण हत्याराचे अनेक वार आहेत.

होळी हे गाव दोन हजार लोकसंख्येचा आहे. गावात आज गोंधळाचा कार्यक्रम होता. गोंधळाच्या कार्यक्रमाकडे अनेकांचे लक्ष होतं. याच वेळी यादव बंधू हे प्रकाश जाधव यांच्या घराकडे गेले होते. महादेव उर्फ मुन्ना यादव हा भारतीय जनता पक्षाचा कार्यकर्ता असल्याची माहिती समोर आली आहे. मागील काही दिवसापासून गावातील शिव रस्त्यासाठी तो प्रयत्न करत होता. यातूनच गावातील काही लोकांबरोबर त्याचे वाद सुरू होते. सकाळच्या घटनेनंतर वाद विकोपाला गेले आणि खुनासारखी घटना घडली आहे. होळीसारख्या गावामध्ये दोन बंधूवर प्राणघातक हल्ला होऊन एकाचा मृत्यू झाला आणि एक गंभीर जखमी असल्याची माहिती पोलिसांना कळाली. औसा पोलीस ठाण्याचे पीआय त्याचबरोबर किल्लारी पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकाऱ्यांचे एक पथक अशे तीन पथके गावात दाखल झाले आहेत. जखमी संभाजी यादव यास तात्काळ लातूरच्या वैद्यकीय महाविद्यालयामध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. रात्री उशिरापर्यंत पोलीस पंचनाम्याचे काम सुरू होते. घटनेची माहिती गावात कळाल्यानंतर गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. आरोपी प्रकाश जाधव आणि इतर तीन ते चार जणांची माहिती पोलिसांनी घेतली आहे.हे सर्व आरोपी फरार झाले आहेत.

पोलिसाची तीन पथके आरोपीचा शोध घेण्यासाठी रवाना करण्यात आली आहेत. मध्यरात्रीनंतर मृत महादेव उर्फ मुन्ना यादव याचा मृतदेह हासेगाव प्राथमिक आरोग्य केंद्रात उत्तरीय तपासणीसाठी पाठविण्यात आला आहे. जखमी संभाजी यादव यांच्यावर लातूर येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. संभाजीची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती आहे.

## दारुड्या मुलाने आयुष्याची माती ...

काम करत होता, पण महिन्याभरापूर्वी त्याने तेथे जाणे बंद केले. महिनाभर त्याने घरातच बसून काढले. त्यानंतर त्यालात्याच्या गावातच काम मिळाले. खडकजांब गावातच असणाऱ्यासगुणा कंपनीत तो आता कामालाजावू लागला होता. अशातच तीघटना घडली. बुधवार दि. २२ नोव्हेंबर २०२३ रोजीचा दिवस. दुपारचे ४ वाजले होते. उशीर कुटुंबीयांचे नातेवाईक असलेले सुरेश सुधाकर कांडेकर (रा. खडकजांब शिवार, गुंजाळ वस्ती, ता. चांदवड) यांना ते घरातच असतांना साहेबराव गुंजाळ यांचा फोन आला. त्यांनी सांगितले की, 'तुमचा मेहुणा किशोर उशीर हा लोखंडेवाडी शिवारातील पालखेड धरणाच्या भरावाच्या ठिकाणी मृतावस्थेत पडला आहे.' आपल्या मेहण्याबाबतची वाईट बातमी ऐकताच सुरेश कांडेकर यांनी गावातीलच शांताराम भास्कर उशिर, रतन गोटीराम उशिर, सुनिल नारायण उशिर व इतर नातेवाईकांना सोबत घेवून घटनास्थळ गाठले, तेंव्हा त्यांना लोखंडेवाडी शिवार पालखेड धरणाच्या भरावाजवळ लोकांची गर्दी झालेली दिसून आली. त्याठिकाणी पोलीसही आलेले दिसून आले.ते धावत-पळतच घटनास्थळी गेले असता घटनास्थळावर धरणाच्या भरावाच्या कच्च्या रस्त्यावर व धरणाच्या आतील पाण्याच्या बाजूने भरावाच्यादगडांवर किशोरचा मृतदेह पडलेला होता. त्याच्या कपाळावर कोणत्या तरी धारदार हत्याराने वार करून मोठी खोलवर जखम करण्यात आली होती. त्याच्या तोंडाच्या जबड्याला, दोन्ही डोळ्यांना, चेहऱ्यावर, गालावर व डोक्यावर मोठी जखम झालेली होती आणि त्यातून मोठ्या प्रमाणावर रक्तस्त्राव झालेला होता. किशोरला कोणीतरी धारदार हत्याराने मारहाण केली होती, तो रक्ताच्या थारोळ्यात पडला होता. त्याच्या कमरेची पँट गुडघ्यापर्यंत खाली निघालेली होती. भरावाच्या कच्च्या रस्त्यावर व बाजूला रक्ताचे डाग दिसून येत होते. तेथे देशी प्रिन्स संत्रा नावाच्या दारूच्या रिकाम्या बाटल्या व इतर खाण्याच्या कागदी प्लेटा पडलेल्या दिसून आल्या त्यामुळे सर्वांची खात्री झाली की किशोर याला दारू पाजून धारदार हत्याराने वार करून त्याचा खूनकेला आहे. पोलिसांनी घटनास्थळाचा आणि मृतदेहाचा पंचनामा केला आणि तो मृतदेह पोस्टमार्टमसाठी सरकारी रूग्णालयात पाठवून दिला. दरम्यान सुरेश सुधाकर कांडेकर यांनी या घटनेप्रकरणी वणी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली.किशोर हा दि. २१ नोव्हेंबर २०२३ रोजी दुपारी ३ वाजता घरातून बाहेर पडला होता, त्यानंतर दुसऱ्या दिवशीही तो घरी आला नव्हता. दि. २२ नोव्हेंबर २०२३ च्या दुपारी ४ वाजता त्याचा मृतदेहच आढळून आला होता. आदल्या दिवशीच्या ३ वाजल्यापासून ते दुसऱ्या दिवशीच्या ४ वाजेपर्यंतच्या दरम्यान त्याचा कोणीतरी अज्ञात कारणाने खून केला होता. त्याच्या खूनप्रकरणी सुरेश कांडेकर यांनी वणी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. गुन्हा रजि. नं. ४३६ / २०२३ भा.दं. वि. कलम ३०२ नुसार गुन्हा दाखल केला गेला. किशोर उशिर याचा खूनकोणी केला? का केला? याची उकल करण्यासाठी वणी पोलीस पथक कामाला लागले. पोलीस अधीक्षक शहाजी उमाप, अप्पर पोलीस अधीक्षक आदित्य मीरखेलकर, उपअधीक्षक संजय बांबळे, गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांच्यामार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक' पोलीस निरीक्षक गणेश शिंदे, वणीचे सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश बोडखे व त्यांच्यासहकाऱ्यांनी या गुन्ह्याच्या तपासाला सुरूवात केली. पोलिसांनी किशोर उशिरविषयी माहिती गोळा केली. किशोर हा २६ वर्षाचा तरूण होता. तो विवाहित होता, पण त्याची पत्नी रक्षाबंधनाच्या सणावेळी माहेरी गेली होती, ती घरी परतलीचनव्हती. त्याला कारण होते किशोरचे दारूचे व्यसन. किशोरला दारूचे व्यसन होते.तो काम-धंदा करत असला तरी त्याला दारूसाठी पैसे पुरत नसत, म्हणून तो आपल्यावडीलांकडे दारूसाठी पैसे मागत असे, त्यासाठी वडीलांशी भांडण करत असे. सतत पैशाची मागणी करून तो आपल्या वडीलांना बेजार करून सोडत असे. यामुळे त्याचे वडील वैतागून गेले होते. पोलिसांनी इत्यंभूत माहिती मिळवली होती. त्यावरूनच त्यांना पुढील तपास करावयाचा होता. या माहितीवरूनपोलिसांना किशोर उशीर याच्या नातेवाईकांविषयीच संशय येवू लागला होता, त्यादृष्टीने पुरेशी माहिती घेतल्यानंतरच संदीप छगन गायकवाड (वय ३०) आणि एका विधीसंघर्षीत बालकास पोलिसांनी चौकशीसाठी ताब्यात घेतले. पोलिसांनी त्या दोघांकडे चौकशी केली असता एक धक्कादायक माहिती पुढे आली. किशोरच्या खुनामागे संदीप गायकवाड आणि त्या विधीसंघर्षीत बालकाचा हात असला तरीत्यांनी हे काम निव्वळ १८ हजार रूपयांसाठी केल्याचे स्पष्ट झाले. हे १८ हजार रूपये कोणी देवू केले होते? याचा शोध घेतला असता असे समजले की आपल्या मुलाचा खून करण्यासाठी किशोरचे वडील दगू जयराम उशिर (वय ५७) यानेच हे पैसे देवू केले. किशोर हा दारूसाठी सतत पैशाची मागणी करतो.

दारूच्या नशेत शिवीगाळ दमबाजी करतो, कधी-कधी मारहाणही करतो. या त्रासाला कंटाळून किशोरच्या वडीलाने दगूने त्याला ठार मारण्याची १८ हजाराची सुपारी दिली. ही सुपारी संदीप गायकवाडने घेतली होती. संदीप व त्याचा विधीसंघर्षीत बालक या साथीदाराने किशोरला दारू पाजण्याच्या बहाण्याने पालखेड धरणाच्या भराव परिसरात आणले आणि तेथे त्याला दारू पाजून त्याच्यावर धारदार हत्याराने वार करून त्याला ठार केले. घेतलेल्या सुपारीचे काम फत्ते झाल्यावर संदीप आणि त्याचा साथीदार हे घटनास्थळावरून पळून गेले. मुलाच्या त्रासाला कंटाळून मुलाला ठार मारण्याची सुपारी देणाऱ्या दगू जयराम उशिर (वय ५७) याच्यासह संदीप छगन गायकवाड या दोघांना पोलिसांनी अटक केली. संशयित विधीसंघर्षीत बालकास बालसुधारगृहात पाठवण्यात आले आहे.

## सहन झाला नाही तिला सिगारेटचा...

धुरामुळे झालेल्या वादातून वांद्रे येथे फ्रान्सिस ऊर्फ शफी फर्नांडिस (५१) यांची चौघांनी चाकूने वार करून हत्या केल्याची घटना बुधवारी रात्री घडली. वांद्रे पोलिसांनी याप्रकरणी चौघांविरुद्ध हत्येचा गुन्हा दाखल करून अब्बास मोहमद अली शेख याला अटक केली आहे. वांद्रे येथील चॅपल रोड परिसरात वास्तव्यास असलेले फ्रान्सिस ऊर्फ शफी हे इस्टेट एजंट होते. ते नाताळनिमित्त आयोजित कार्यक्रम आटोपून कुटुंबीयांसोबत घरी परतत होते. त्यावेळी एक तरुण सिगारेट ओढत उभा होता. त्याने सोडलेल्या धुराचा त्रास शफी यांच्या पत्नीला झाला. हे पाहून त्यांनी या तरुणाला जाब विचारला. त्यावेळी याठिकाणी असलेली एक महिला आणि अब्बास यांनी शफी यांना शिवीगाळ केली. त्यांनी आणखी दोघांना या ठिकाणी बोलावले. हा वाद इतका विकोपाला गेला की, तिघांनी मिळून शफी यांच्या डोक्यावर मानेवर, छातीवर चाकूने वार करून जखमी केले. या घटनेची माहिती मिळताच वांद्रे पोलिस घटनास्थळी पोहोचले. जखमी शफी यांना रुग्णालयात नेण्यात आले. मात्र दाखल करण्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला.

पान ८ वरून...

## देवणीत रेशन दुकानदारांचा बेमुदत ...

वर्षापासून करावे लागत आहे. तसेच आत्महत्याग्रस्त मराठवाडा व विदर्भातील १४ जिल्ह्यामध्ये शेतकरी योजनेतील बंद केलेले रेशनचे धान्य तात्काळ चालू करण्यात यावे. मुळात शासनाने ज्यांच्यासाठी ही योजना तयार केलेली आहे. त्या शेतकरी रेशन कार्ड धारक यांची डीबीटीला विरोध आहे. त्यांना पैसे नको धान्य हवेत आहेत. शासनाने कोरोना महामारीच्या काळामध्ये देशभरातील शेकडो रेशन दुकानदार कोरोना बाधित होऊन मृत्युमुखी पडले. त्यांच्या कुटुंबीयांना आता पर्यंत कसलीही आर्थिक मदत दिली नाही. त्या कोरोना काळामध्ये साधे सॅनिटायझरची बाटली, हॉडग्लोजचा पुरवठा देखील शासनाने केले नाही. याची दखल शासनाने अद्याप घेतलेली नाही. राज्य शासन मे २०२१ मध्ये राज्यातील रास्त भाव दुकानदार यांच्या कडून धान्याचे चलन भरून धान्य वितरणासाठी दुकानदारास दिले. शासनाने जीआर काडून सदरचे धान्य मोफत वितरण करावस लावले. सदरचे धान्याचे रक्कम भरलेली दुकानदारां यांना व्याजासह देण्यात यावे. रेशन दुकानदारास मिळणारे तुटपुंजे मार्जिनची वाढ करण्यात यावे. मार्जिनची रक्कम नियमित दरमहा न मिळता सहा सहा महिने उशिराने मार्जिनची रक्कम मिळत नाही. राज्यातील एका रास्त भाव दुकानदाराने आर्थिक संकटाला व्यवस्थित होऊन आत्महत्या केली असून सुद्धा शासनाचे डोळे अद्याप उघडले नाहीत. यासह विविध १६ प्रलंबीत मागण्यासाठी देशभरात चालू असलेल्या बेमुदत अनिश्चित काळासाठी रेशन दुकान बंद आंदोलनात ७व्या दिवशीही शासनाकडून कोणतेही मार्ग निघाले नाही. जो पर्यत आमच्या मागण्या मान्य होत नाही तो पर्यत दुकाने बंद करून आमच्या आंदोलन चालूच राहील असे रेशन दुकानदार संघटना देवणी तालुका अध्यक्ष नितीन देशमुख यांनी यावेळी बोलताना सांगितले.

## वसईत अण्णासाहेब वर्तक ...

'हीच अमुची प्रार्थना अन् हेच अमुचे मागणे' हे मानवतेचा उद्घोष करणारे प्रार्थनागीत सादर केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरविंद उबाळे यांनी महान व्यक्तींच्या जयंतीदिनाच्या कार्यक्रमाच्या माध्यमातून होणारा त्यांच्या विचारांचा जागर महत्त्वाचा असून यामागे पुस्तकी शिक्षणापलीकडचा सर्वांगीण विकासाचा विचार उद्देश असतो असे सांगितले. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या, विद्यावर्धिनी शिक्षणसंस्थेच्या व्यवस्थापकीय समितीच्या सदस्य आणि सुप्रसिद्ध लेखिका वीणा गवाणकर यांनी सावित्रीबाईपासून प्रेरित झालेला स्त्रीवादी विचार हा अंतिमतः मानव मुक्तीचा विचार असल्याचे प्रतिपादन केले व विद्यार्थिनींनी वाचन आणि अभ्यासाच्या माध्यमातून खऱ्या अर्थाने स्वतःचा सर्वांगीण विकास करून घ्यावा असे सांगितले. या कार्यक्रमाच्या मुख्य वक्त्या प्रा. वैखरी नवेले यांनी प्रथा-परंपरा मोडणाऱ्या, स्त्रीशक्तीला बळ देणाऱ्या सावित्रीबाई फुले यांच्या चरित्रातील काही प्रसंगांच्या आधारे त्यांच्या व्यक्तिमत्वाच्या विविध अंगांचा परामर्श आपल्या भाषणातून घेतला. जुन्या प्रथा परंपरांच्या प्रभावाखाली असलेल्या तत्कालीन समाजात शिक्षण घेणे आणि शिक्षण देणे या दोन्हीही अत्यंत कष्टसाध्य असणाऱ्या गोष्टी करून समाजाला दिशा देणाऱ्या सावित्रीबाईंच्या व्यक्तिमत्वाचा तसेच शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रातील त्यांच्या कार्याचा परिचय प्रा. नवेले यांनी विद्यार्थ्यांना करून दिला. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना पांडुरंग गजानन नाईक यांनी हल्लीच्या स्पर्धात्मक वातावरणामुळे बाल्य व तारुण्य हरवत असून शिक्षणाचे व्यवसायीकरण व माणसाचे यांत्रिकीकरण होत असल्याची खंत व्यक्त केली. कनिष्ठ महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या विद्यार्थ्यांनी स्त्रीशिक्षणविषयक पथनाट्य, तसेच 'आम्ही सावित्रीच्या लेकी' हे गीत सादर केले. महाविद्यालयाच्या उपप्राचार्य डॉ. जानकी सावगाव, डॉ. अनिलकुमार शेळके, महाविद्यालयाच्या अंतर्गत दर्जा आश्वस्तता कक्षाचे प्रमुख डॉ. हिरानंद खंबायत, महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. अजय कांबळे, कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्य प्रा. स्वाती जोशी, प्रबंधक दिलीप वर्तक आणि महाविद्यालयातील विविध विभागातील शिक्षक-प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रा.डॉ.लतिका पाटील यांनी सूत्रसंचालन केले. महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अनिलकुमार शेळके यांनी आभारप्रदर्शन केले. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. शत्रुघ्न फड आणि प्रा. भारती तोरणे यांनी या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

## वसईतील मेहतर समाजाला जातीचा...

नाकारले जात आहेत असे एक ना अनेक सवाल करत, याचा शोध उपविभागीय अधिकारी वसई प्रांत यांनी घेतला पाहिजे आणि त्याचा खुलासा मा वसई उपविभागीय अधिकारी वसई प्रांत यांनी या समाजाच्या लोकांना पुढे केला पाहिजे असे म्हटले आहे. तसेच शासनाने वेळोवेळी सुधारणा करून घालून दिलेल्या नियमानुसार जातीचे दाखले का दिले जात नाहीत? तसेच आपण जातीचे दाखले देण्यासंदर्भात वरील प्रमाणे सुधारणा केल्या आहेत. त्या कशाच्या आधारे केल्या आहेत? त्याबाबत शासनाचे अथवा विधिमंडळाने पारित केलेल्या शासनाच्या परिपत्रकाची छायांकित प्रत देण्यात यावी अशी मागणी शरदअण्णा तिगोटे यांनी केली आहे.

## वसई-विरारमधील प्रवाशांना नवीन ...

माहिती आणि महत्व उद्घाटनावेळी नागरिकांना प्रात्यक्षिकासह देण्यात आली. यामध्ये कोणत्याही प्रकारची शंका अथवा अडचण निर्माण झाल्यास याबाबतची सूचना एस.एन.एन. कंपनीच्या snnhelplinegmail.com या अधिकृत संकेतस्थळावर करावी, असे जाहीर करणेत आले. या कार्यक्रमावेळी महानगरपालिकेचे उप-आयुक्त नानासाहेब कामठे व समीर भूमकर, परिवहन समिती सभापती कल्पक सुदाम पाटील, माजी स्थायी समिती सभापती प्रशांत राऊत, माजी परिवहन सभापती भरत गुप्ता व प्रितेश पाटील, परिवहन समितीचे विद्यमान सदस्य हेमांग शहा, बाबुभाई राजपुरोहित, स्वप्नील कवळी, अमित वैद्य, माजी नगरसेवक हार्दिक राऊत, माजी परिवहन सदस्य वसंत वरे व इतर मान्यवर उपस्थित होते. आपली बस ॲपचे सादरीकरण आणि या कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्र.सहा.आयुक्त विश्वनाथ तळेकर यांनी केले.

## पालघर जिल्ह्यातील मोडकळीस...

कामांनाही प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत सन २०२२-२३मध्ये जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र आणि निवासस्थानाच्या जीर्ण इमारतींच्या दुरुस्तीबाबत आणि पुनर्बांधणीसाठी निधीची तरतूद केली असल्याची माहिती आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांनी दिली.

## बजाज फिन्सर्व चे एक पाऊल पर्यावरण ...

बजाज फिन्सर्व कंपनी देशातील सर्वात मोठी ठेव घेणारी एनबीएफ सई म्हणून उदयास आली आहे. ३० सप्टेंबर २०२३ रोजी ५४, ८२१ कोटी आहे. बजाज फायनान्स मुदत ठेवी उपक्रम हा सर्वाधिक स्थिरता असलेल्या उपक्रम असून क्रिसल (सीआरआयएफआयएल) द्वारे एएए/ स्थिर आणि आयसीआरएद्वारे एएए स्थिर प्रमाणित केले गेले आहे . ज्या मुळे गुंतवणूकदाराकरिता हा गुंतवणूकीचा एक सुरक्षित असा पर्याय ठरतो. ३ जानेवारी २०२४ बजाज फ़ायनान्स लिमिटेड., बजाज फ़िन्सर्वचा एक भाग असून, देशातील सर्वात मोठ्या आर्थिक सेवा समूहांपैकी एक आहे, ज्यांच्याद्वारे त्यांच्या ॲप किंवा संकेतस्थळाचा माध्यमाने बुक केलेल्या डिजिटल मुदत ठेवींवरती (एफ़डी) आकर्षक असा ८.८५,% चा व्याज दर दिला जाणार आहे. कंपनीचा पचा माध्यमातून गुंतवणूकीची एक बाजारपेठ खुली होणार आहे, जिथे ग्राहकांना म्युच्युअल फ़ंडाचे देखील अनेक पर्याय उपलब्ध असतील.

## मराठी रंगभूमीचे प्रश्न सोडविण्यासाठी...

सहकार्य करण्यात येईल. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नाट्यगृहात पूर्वीप्रमाणे विजेचा खर्च आकारला जाईल. ज्येष्ठ कलावंतांच्या घराबाबतही शासन सकारात्मक आहे. नाट्यसृष्टीच्या उत्कर्षासाठी एकत्रित प्रयत्न करताना मराठी रंगभूमीसाठी शासनाकडून सर्व प्रकारचे सहकार्य करण्यात येईल अशी ग्वाही त्यांनी दिली.

**मराठी नाटकाने मनोरंजन आणि प्रबोधनाचे कार्य केले-खासदार शरद पवार**

चिंचवडच्या पावन भूमीत नाट्य संमेलन होत असल्याबाबत आनंद व्यक्त करून ज्येष्ठ नेते खासदार शरद पवार म्हणाले की, सर्व कलांचा संगम असलेली रंगभूमी सर्वाधिक परिणामकारक माध्यम आहे. नाटकाचा मुख्य उद्देश मनोरंजन असल्याचे भरतमुनी यांनी म्हटले आहे, मात्र नाटकाच्या माध्यमातून प्रबोधन आणि ज्ञानदानाचे कार्य उत्तमरितीने होते. रंगभूमीच्या माध्यमातून अनेक वर्षे लोकप्रबोधनाचे कार्य होत आहे. मराठी नाट्यसृष्टीद्वारे नवे विषय मांडले जात आहेत. नाट्य रसिकांना नाटकांकडे आकर्षित करणारी नाटके रंगभूमीवर यावीत, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. नाट्य संमेलनाच्या निमित्ताने राज्याच्या विविध भागात कार्यक्रमांचे आयोजन होणार असल्याने नाट्यरसिकांना ही मोठी पर्वणी आहे, असेही श्री.पवार म्हणाले. उद्योगमंत्री श्री.सामंत म्हणाले की, पिंपरी चिंचवड येथे नाट्य संमेलनाचा निर्णय एकमताने घेण्यात आला. या नाट्य संमेलनानंतर कलाकार आणि पडद्यामागील कलावंतांचे प्रश्न सोडविण्यासाठी बैठकींचे आयोजन व्हावे आणि ज्येष्ठ कलाकारांच्या वृद्धाश्रमासाठी शासनाने निधी द्यावा,अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. शासनातर्फे नाट्य संमेलनासाठी प्राप्त निधीचा उपयोग कलाकार आणि पडद्यामागील कलावंतांना मानधन आणि आरोग्य विमा काढण्यासाठी करण्यात येईल, असेही श्री. सामंत म्हणाले.

**नाट्य प्रशिक्षणाद्वारे रंगभूमीचा विकास-जब्बार पटेल**

नाट्य संमेलनाध्यक्ष जब्बार पटेल म्हणाले, मराठी रंगभूमी प्रगल्भ आणि विविधतेने नटलेली आहे. नाट्य प्रशिक्षणाच्या माध्यमातून रंगभूमीचा अधिक विकास होईल. देशपातळीवरील उत्तम कलाकारांच्या माध्यमातून विद्यापीठातून नाट्यकलेचे प्रशिक्षण आणि संशोधन व्हावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. जगात सुंदरता निर्माण करण्यासाठी कलावंतांनी एकत्रित प्रयत्न करावा, असे मावळते संमेलनाध्यक्ष श्री. गज्वी म्हणाले. नाट्य संमेलन हे कलावंतांसाठी दिवाळी असून एकत्रित विचार करण्याची उत्तम जागा आहे, असे श्री. दामले म्हणाले. प्रास्ताविक विश्वस्त अजित भुरे यांनी केले. श्री.भोईर यांनी स्वागतपर भाषणात नाट्य संमेलनाच्या आयोजनात सहकार्य करणाऱ्या सर्वांना धन्यवाद दिले. यावेळी वामन पंडित संपादित 'रंगवाचा' या नियतकालिकाचे आणि १००व्या मराठी नाट्य संमेलनाच्या निमित्ताने पिंपरी चिंचवड शाखेतर्फे तयार करण्यात आलेल्या 'नांदी' या स्मरणिकेचे प्रकाशन मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते, तर प्रेमानंद गज्वी यांचे आत्मकथन 'रंग निरंतर'चे प्रकाशन ज्येष्ठ नेते श्री. पवार यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस दीपप्रज्वलन आणि घंटेचे पूजन करून १०० व्या अखिल भारतीय नाट्य संमेलनाचे उद्घाटन करण्यात आले. ज्येष्ठ नेते तथा नाट्य परिषदेचे विश्वस्त शरद पवार यांच्या हस्ते रंगमंचाच्या पडद्याचे अनावरण करण्यात आले. कार्यक्रमाला आमदार उमा खापरे, अण्णा बनसोडे, अश्विनी जगताप, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह, जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख, नाट्य परिषदेचे सर्व विश्वस्त, कृष्णकुमार गोयल, पी.डी. पाटील, नाट्य कलावंत आणि नाट्य रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

08 TO 14 JANUARY 2024 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 1/6/2024 7:40 PM Page 1



# पालघर जिल्हा परिषद शाळेतून 'इस्त्रो'मध्ये जाणारा वैज्ञानिक घडावा - जिल्हा परिषद अध्यक्ष प्रकाश निकम






**पालघर/प्रतिनिधी**

आज आपण जगत असलेल्या प्रत्येक गोष्टीच्या मागे विज्ञान आहे, इतकी प्रगती विज्ञानाने केली आहे, जिल्ह्यातली इंग्रजी माध्यमाचे विद्यार्थी निश्चितच प्रगती करतात परंतु जिल्हा परिषद चे विद्यार्थी देखील आपले कौशल्य वापरून अनेक प्रयोग आपली बुद्धी वापरून करीत असतात, याचा प्रत्यक्ष अनुभव घेतला असून जिल्हा परिषद शाळेतून किमान एक तरी विद्यार्थी इस्त्रो मधे वैज्ञानिक म्हणून रुजू व्हावा अशी माझी मनापासून इच्छा आहे, अशा भावना जिल्हा परिषद अध्यक्ष प्रकाश निकम यांनी व्यक्त केल्या. शिक्षण विभाग जिल्हा परिषद पालघर, पालघर गणित व वैज्ञानिक अध्यापक मंडळ आणि थीम ग्लोबल स्कूल आणि ज्युनिअर कॉलेज बोईसरयांच्यामार्फत ५१ वे जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शन थीम कॉलेज ऑफ इंजीनियरिंग बोईसर येथे आयोजित करण्यात आले होते त्यावेळी ते बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले की, शिक्षकांनी विद्यार्थ्यांची त्यांची गोडी, त्यांची जिज्ञासा कशात आहे हे ओळखून त्यादृष्टीने विद्यार्थ्यांकडे लक्ष केंद्रित करावे, असे सांगून थीम कॉलेज ने जिल्हा परिषदेच्या विद्यार्थ्यांसाठी आपले कॉलेज उपलब्ध करून दिले आणि उत्कृष्ट आयोजन केले त्याबद्दल अध्यक्ष प्रकाश निकम यांनी आभार व्यक्त केले. विज्ञान प्रदर्शनाच्यापहिल्या सत्राचे उद्घाटन खासदार राजेंद्र गावित यांच्या हस्ते करण्यात आले, तर दुसऱ्या सत्राचे उद्घाटन जिल्हा परिषद अध्यक्ष प्रकाश निकम यांच्या हस्ते मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे, उपाध्यक्ष पंकज कोरे, थीम कॉलेज चे चेअरमन मोहम्मद शरीफ थीम, संस्थापक मोहम्मद हुसैन थीम यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. यावेळी मा.अध्यक्षा तथा जि. प. सदस्य वैदेही वाढाण, भावना विचारे, जयेंद्र दुबळा, मंगेश भोईर, महेंद्र भोणे उपस्थित होते. या विज्ञान प्रदर्शनात जिल्ह्यातील एकूण ८० प्रकल्प सहभागी झाले आहेत. आज पासून सुरू झालेले हे प्रदर्शन तीन दिवसीय असून सात परीक्षकांमार्फत जिल्हा स्तरावरील प्रयोगांची निवड करण्यात येणार आहे. खास. राजेंद्र गावित यांनी विद्यार्थ्यांची शाळेतून होणारी गळती थांबवण्यासाठी प्रयत्न करावेत असे सांगून आधुनिक तंत्रज्ञानाची उदाहरणे देऊन विज्ञानाचे महत्व सांगितले. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मुलांना जिंकण्यासाठी नाही तर स्पर्धेत सहभागी होऊन स्वतःला सिद्ध करण्यासाठी सहभागी व्हा असे सांगून शुभेच्छा दिल्या. उपाध्यक्ष पंकज कोरे यांनी तालुक्यावरून जिंकून जिल्हास्तरावर आलेल्या सर्व बाल वैज्ञानिकांचे अभिनंदन करून आपले अनुभव यावेळी विद्यार्थ्यांसमोर मांडले. 'थीम'चे चेअरमन मो.शरीफ यांनी आमच्यावर विश्वास ठेऊन सिद्ध करण्याची संधी दिली याबद्दल मान्यवरांचे आभार व्यक्त केले. सदस्या वैदेही वाढाण यांनी आपले मनोगत व्यक्त करून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. शिक्षणाधिकारी संगीता भागवत यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक सादर केले. मा.शिक्षणाधिकारी शेषराव बडे यांनी आभार व्यक्त केले. पालघर जिल्हा गणित-विज्ञान अध्यापक मंडळाचे अध्यक्ष संतोष पावडे, थीम कॉलेज यांच्या नियोजनाने हा कार्यक्रम यशस्वी झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रतिभा कदम यांनी केले. तालुका अध्यक्ष शशिकांत ठाकूर, उपशिक्षणाधिकारी मते सर, गणेश प्रधान, रुपेश वझे, शिक्षक, सहभागी झालेल्या प्रकल्पांचे शिक्षक, थीम कॉलेजचे प्राध्यापक विद्यार्थी उपस्थित होते.

# वलांडी व जवळगा येथील जय संघर्ष वाहन चालकांचा 'रास्ता रोको' आंदोलन



**देवणी/प्रतिनिधी**

देवणी तालुक्यातील वलांडी येथे राज्य मार्गावरील हिट अँड रण हा कायदा रद्द करावा या प्रमुख मागणी साठी जय संघर्ष वाहन चालक मालक संघटनेच्या वतीने निलंगा उदगीर राज्य मार्गावरील रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.व तसेच जवळगा येथे वलांडी शिरोळ अंतपाळ रोडवरील रास्ता रोको आंदोलन करण्यात आले त्यात शेकडो ड्रायव्हर बांधव उपस्थिती होते. अपघात घडल्यास जखमींना मृत्युच्या दारी सोडून पळून जाणे हे प्रत्येक मानवी मनाला पटण्यासारखे मुळीच नाही, परंतु स्वतःचा जीव वाचविण्यासाठी धडपड करणे हा गुण प्रत्येक प्राणी मात्रामध्ये जन्मजात असल्या कारणाने आणि आपल्या भारत देशामध्ये दलीत आणि आदिवासी यांच्यासाठी जशी कठोर कायद्याची तरतूद आहे तशा एखाद्या कठोर कायद्याचे संरक्षण ड्रायव्हरला नसल्या कारणाने ड्रायव्हर हा केवळ स्वतःच्या जीवाच्या भितीने अपघात स्थळावरून पळुन जातो, त्या करीता ड्रायव्हर सुरक्षा कायद्याची प्रथमतः अमलबजावणी करणे आणि त्यानंतर हिट अँड रण या नविन कायद्यामध्ये कारावासाचा कालावधी व आर्थिक दंड यामध्ये कमी करून त्यानंतरच कायदा लागू करावे अशी मागणी करण्यात आली. सदर कायदा रद्द करण्यात यावा यासाठी दिनांक ३/१/२०२४ रोजी रस्ता रोको आंदोलन वलांडी येथे सकाळी ११ वाजता राज्य मार्गावर करण्यात आले.यावेळी महसूल विभागाचे मंडळ अधिकारी बालाजी केंद्रे वलांडी सज्जाचे तलाठी अबरार शेख यांना निवेदन देण्यात आले, या आंदोलनात श्रमिक अभियान संस्थापक ज्ञानेश्वर सूर्यवंशी यांनी मनोगत व्यक्त केले.यावेळी वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष आयुब सौदागर व सर्व चालक मालक पदाधिकारी सदस्य उपस्थित होते तसेच देवणीचे पोलीस निरीक्षक विष्णुकांत गुट्टे यांच्या मार्गदर्शनाखाली चौक बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या वाढदिवसानिमित्त दवणहिप्परगा येथे विकास कामाचे उद्घाटन!



**देवणी/प्रतिनिधी**

मौजे दवणहिप्परगा ता.देवणी जि.लातूर येथे केंद्रीय मंत्री तथा रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले यांच्या वाढदिवसानिमित्य पेवर ब्लॉक रस्त्याच्या कामाचे सुभारंभ करण्यात आले. यावेळी सरपंच सतीश नामदेवराव पाटे, चेअरमन अविनाश बाबुराव पाटील, ग्राम विकास अधिकारी स्वामी उपसरपंच माधव मालीपाटील, ग्राम पंचायत सदस्य ज्ञानेश्वर पाटील, आकाश पाटील, संतोष सगर, अक्षय टिळे, लक्ष्मीबाई कांबळे, तसेच धनराज गायकवाड, गुणवंत कांबळे, पद्माकर कांबळे, मारोती कांबळे, कमलाकर कांबळे सह गावातील जेष्ठ नागरिक उपस्थित होते. सदरील कामाचा सातत्याने पाठपुरावा करून रिपाई देवणी तालुका अध्यक्ष गणेशभाऊ कांबळे दवणहिप्परगेकर यांनी काम मंजूर करून घेतले असल्याने स्थानिक नागरिकांकडून समाधान व्यक्त होत आहे.

# मुलगा व मुलगी असा भेदभाव न करता समान संधी उपलब्ध करणे गरजेचे - मनिषा आव्हाळे

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**



माझ्या गावातही मला एवढी छोटीसी मुलगी काय करणार असे विचारत होते पण आज मी स्वतः आय.ए.एस.होऊन माझी स्वतःची ओळख निर्माण केली आणि मुलींमध्ये क्षमता आहे हे दाखवून दिले याचा मला निश्चितच अभिमान आहे म्हणून आज समाजात मुलगा व मुलगी असा भेदभाव न करता प्रत्येकाला शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे असे प्रतिपादन सोलापूर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे यांनी केले. सोलापूर जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहामध्ये महिला व बालकल्याण विभागाने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी आव्हाळे या बोलत होत्या. उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन) स्मिता पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) इशाधीन शेळकंदे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) अमोल जाधव, जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रसाद मिरकले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले, जिल्हा कृषी विकास अधिकारी परमेश्वर वाघमोडे, कार्यकारी अभियंता बांधकाम संतोष कुलकर्णी, नरेंद्र खराडे, शिक्षणाधिकारी (नियोजन) सुलभा वठारे, उपशिक्षणाधिकारी संजय जावीर, वरिष्ठ भूवैज्ञानिक तज्ञ डॉ.मुश्ताक शेख, ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता गाडेकर आदी उपस्थित होते. यावेळी प्रास्तविकामध्ये प्रसाद मिरकले म्हणाले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी शिक्षण क्षेत्रासाठी महत्वपूर्ण असे योगदान दिले आहे म्हणून त्यांनी केलेल्या महान कार्यामधून काही अंशी उतराई होणेच्या दृष्टीने जिल्हा परिषद सोलापूर यांचे वतीने माझी सिद्धकन्या... माझा आत्मसन्मान... हा अनोखा उपक्रम सुरू करणेत आलेला आहे. आज प्रत्येकाचे घर असणे हे एक स्वप्न असते आणि त्या घरावर आपल्या आधी आपल्या मुलींच्या नावाची पाटी लावण्याचा उद्देश आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री ना.अजित पवार यांनी मांडलेल्या महिला धोरणामध्ये वडिलांच्या आधी आईचे नाव लावण्याबाबत सूचित केले असल्याचेही सांगितले. यावेळी जिल्हा परिषदेमध्ये मुलगी असणाऱ्या खाते प्रमुख अधिकारी यांना प्रातिनिधिक स्वरूपात मुलीच्या नावाची पाटीचे वितरण करण्यात आले. यावेळी जिल्ह्यातील सर्व बालविकास प्रकल्प अधिकारी, सर्व अंगणवाडी पर्यवेक्षिका, जिल्हा परिषद मुख्यालयातील कक्ष अधिकारी अविनाश गोडसे, विवेक लिंगराज, अनुपमा पडवळे, शिवानंद मगे व सर्व महिला कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.संयुक्ता पाटील व पर्यवेक्षिका शोभा तडलगी यांनी केले. सदरचा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी वरिष्ठ सहायक सचिन आंबेकर, परमेश्वर पांचाळ, अमिता वसेकर ऋषिकेश जाधव आणि श्रीकांत मेहेरकर यांनी प्रयत्न केले.

## थोडक्यात वृत्तांत

### विधी पळसापुरे यांना राष्ट्रीय युवा पुरस्कार जाहीर



देवणी : भारत सरकारच्या क्रिडा व युवक कल्याण मंत्रालय तर्फे देण्यात येणाऱ्या राष्ट्रीय युवा पुरस्कारासाठी लातुरच्या कु.विधी पळसापुरे यांना जाहीर झाला आहे. येत्या १२ जानेवारी रोजी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत नाशिक येथे पार पाडणाऱ्या राष्ट्रीय युवा महोत्सवामध्ये हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. कु. विधी ह्या माझा करिअर गाईड फाउंडेशनच्या संस्थापिका असून सामजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्या बद्दल हा पुरस्कार जाहीर झाला आहे. गेल्या ८ वर्षापासून विधी सातत्याने विविध विकास कामे करत असून, शैक्षणिक क्षेत्रात विद्यार्थ्यांच्या निःशुल्क करिअर मार्गदर्शनाचे कार्य त्या करत आहेत. या आधी २ ऑक्टोबर रोजी देशाच्या संसदेतील त्यांचे भाषण सबंध महाराष्ट्रात लोकप्रिय झाले होते. लातूरचे नाव देश पातळीवर पुन्हा एकदा गाजविल्या मुळे कु. विधी व त्यांच्या आई वडिलांचे सर्वत्र कौतुक होत आहे. दिनांक ३० डिसेंबर २०२३ रोजी उदगीर येथे झालेल्या महाराष्ट्र शासनाच्या राज्यस्तरीय युवा महोत्सवात क्रिडा व युवक सेवा संचालनालय चे मंत्री संजय बनसोडे यांच्या हस्ते विधी पळसापुरे यांचा सत्कार व अभिनंदन करण्यात आले. या वेळी लातूर लोकसभा मतदासंघांचे खासदार सुधाकर शृंगारे व इतर मान्यवर उपस्थित होते.

### संजय गांधी निराधार योजना समितीच्या अध्यक्षपदी प्रशांत पाटील जवळगेकर यांची निवड



देवणी : देवणी तालुका संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीच्या अध्यक्षपदी प्रशांत पाटील जवळगेकर यांची निवड लातूर जिल्हयाचे पालकमंत्री गिरीश महाजन यांच्या शिफारस पत्रानुसार जिल्हाधिकारी यांनी केली आहे. या कार्यकारिणीत एक अध्यक्ष तर नऊ अशासकीय सदस्य राहणार आहेत. उर्वरित कार्यकारिणीतील सदस्य खालील प्रमाणे मनोहर पटणे, धोंडराज गुणाले, उद्धव गायकवाड, रंजना पौळकर, विजयकुमार बोरोळे, सुप्रिया माने, तुकाराम पाटील, प्रशांत पाटील दवणहीप्परगेकर, शिवराज बिरादार आदिंची निवड करण्यात आली आहे तर शासकीय सदस्य म्हणून गटविकास अधिकारी, सचिव म्हणून तहसिलदार हे काम पाहतील. या निवडी बद्दल भा.ज पा तालुकाध्यक्ष काशीनाथ गरीबे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती बालाजी बिरादार, माजी सरपंच हणमंत बिरादार, शंकर पाटील तळेगावकर, सूर्यभान विप्तल, गोपीनाथ सगर, विजयकुमार लुल्ले, चंद्रशेखर महाजन, विजयकुमार मुक्के, राम रेड्डी, सोमनाथ बोरोळे, अमर पाटील, ओम धनुरे, किशोर निडवंचे, शिवाजी तपसाले, रामलिंग शेरे आदींनी अभिनंदन केले आहे.

### वसईतील एसटी बस डेपो इमारतीची दुरुस्ती

वसई : वसईतील एसटी आगाराची सध्याची इमारत मोडकळीस आली आहे. अनेक वर्ष जुनी झाल्याने तिची ही अवस्था झाली आहे. त्यामुळे धोकादायक अवस्थेत प्रवासी व कर्मचारी यांना या ठिकाणी वावरावे लागत आहे. अखेर आता एसटी महामंडळाकडून या आगाराच्या दुरुस्तीचे काम सुरू करण्यात आले आहे. वसई गावात एसटी आगार आहे. या आगारातून दररोज असंख्य गावात लांब पल्याच्या बसेस सोडल्या जातात. त्यामुळे वसईसह विविध ठिकाणचे नागरिक यातून प्रवास करतात. वसईच्या विविध ठिकाणचे नागरिक यातून प्रवास करतात. ही इमारत अनेक वर्षे जुनी झाल्याने त्या इमारतीला अनेक तडे गेले आहेत. तर काहीं ठिकाणी स्लॅबचे काँक्रीट निखळून लोखंडी सळ्या बाहेर आल्या आहेत. अशा धोकादायक अवस्थेत येथील कर्मचारी व प्रवासी यांना वावरावे लागत होते. कोणत्याही क्षणी जर एखादा भाग कोसळला तर मोठी दुर्घटना होण्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली होती. याबाबत नागरिक व प्रवासी यांनी सुद्धा या आगाराचे नूतनीकरण करण्याची मागणी केली होती. अखेर मागील काही दिवसांपासून वसईच्या आगाराच्या दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले आहे.

# वसई अण्णासाहेब वर्तक महाविद्यालयाचा 'विवान' वार्षिक क्रीडामहोत्सव उत्साहपूर्ण वातावरणात साजरा

**वसई/प्रतिनिधी**



वसई येथील अण्णासाहेब वर्तक महाविद्यालयात नुकतेच विवान वरिष्ठ, कनिष्ठ वार्षिक क्रीडा महोत्सवाचे आंतर-वर्ग क्रीडा स्पर्धा आयोजन करण्यात आले होते. या क्रीडामहोत्सवात क्रिकेट, कॅरम, बॅडमिंटन, बुद्धीबळ , रस्सीखेच, टेबल टेनिस, अथेलेटिक्स या स्पर्धाचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरविंद उबाळे यांच्या हस्ते , उपप्राचार्य डॉ. अनिलकुमार शेळके, महाविद्यालयाचे प्रबंधक दिलीप वर्तक यांच्या उपस्थितीत या स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. बॅडमिंटन च्या एकेरी सामन्यात मुलांमध्ये प्रथम पारितोषिक अर्थव राऊत तर द्वितीय पारितोषिक साद राऊत तसेच मुलींमध्ये प्रथम पारितोषिक कनिषा पाटील तर द्वितीय पारितोषिक किन्हेरी कवळी या स्पर्धकांना मिळाले. बॅडमिंटनच्या दुहेरी मुलांच्या सामन्यांमध्ये प्रथम पारितोषिक संग्राम साहू आणि निरंजन वैशव तसेच द्वितीय पारितोषिक आयुष कट्टीयाल आणि निधीश चोरगे तसेच मुलींच्या सामन्यांमध्ये प्रथम पारितोषिक जिया नाईक आणि द्वितीय पारितोषिक कनिषा पाटील आणि अमृता नाईक या स्पर्धकांना मिळाले . टेबल टेनिस मुलांच्या सामन्यांमध्ये प्रथम पारितोषिक प्रतीक जुवेकर तर द्वितीय पारितोषिक कनवा पाटील तसेच मुलींच्या सामन्यांमध्ये प्रथम पारितोषिक सिद्धी जाधव तर द्वितीय पारितोषिक क्रिशा शेट्टी या स्पर्धकांना मिळाले. बुद्धिबळ मुलांच्या सामन्यांमध्ये प्रथम पारितोषिक प्रतीक जुवेकर तर द्वितीय पारितोषिक आदित्य मिश्रा तसेच बुद्धिबळ मुलींचे सामन्यांमध्ये प्रथम पारितोषिक हंसिका मेराई आणि द्वितीय पारितोषिक वैष्णवी विसपुते या स्पर्धकांना मिळाले. रस्सीखेच या सामन्यांमध्ये प्रथम पारितोषिक वरिष्ठ महाविद्यालयातील एस.वाय.सी.एस. या वर्गास मिळाले तर द्वितीय पारितोषिक एफ.वाय.जे.सी सायन्स या वर्गास मिळाले. क्रिकेटच्या सामन्यांमध्ये प्रथम पारितोषिक ईश्वरी मुलम आणि ग्रुप तसेच द्वितीय पारितोषिक जिया नाईक आणि ग्रुप यांना मिळाले विवान वरिष्ठ, कनिष्ठ वार्षिक क्रीडा संमेलनाच्या शेवटी सर्व विजेत्या स्पर्धकांना अण्णासाहेब वर्तक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अरविंद उबाळे , ग्रंथालय प्रमुख अजय कांबळे, वरिष्ठ महाविद्यालयाचे जिमखाना प्रमुख डॉ. मनीष तिरपुडे, कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्य सौ.स्वाती जोशी, कनिष्ठ महाविद्यालयाचे जिमखाना प्रमुख प्रा. विलास खोपकर यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. विवान या वरिष्ठ / कनिष्ठ वार्षिक क्रीडासंमेलनाचे आयोजन महाविद्यालयाच्या क्रीडासमितीने केले. डिसेंबर महिन्याच्या अखेरीस आयोजित करण्यात आलेल्या या चार दिवसीय क्रीडासंमेलनात महाविद्यालयातील एकंदर ७०० ते ८०० विद्यार्थी सहभागी झाले. दरवर्षीप्रमाणे शिक्षकेतर आणि प्रशासकीय कर्मचाऱ्यांच्या वतीने सत्यनारायण पूजा व त्यानिमित्ताने सर्वांच्या कुटुंबीयांचे संमेलन झाले त्यामध्ये विविध खेळांच्या माध्यमातून सर्वांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केल्याचे महाविद्यालयाचे प्रबंधक दिलीप वर्तक यांनी सांगितले. महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांमध्ये संघभावना वाढीस लागावी तसेच खिलाडीवृत्तीने परस्पर सहकार्य वृद्धिंगत व्हावे यासाठी शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठीही या क्रीडास्पर्धेत विविध मैत्रीपूर्ण सामन्यांचे आणि क्रीडास्पर्धांचे आयोजन करण्यात आले आल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य अरविंद उबाळे यांनी दिली.

# विरारमध्ये पतंग उडविताना मुलाचा गच्चीवरून पडून मृत्यू

विरार : पतंग उडविताना गच्चीवरून पडून १३ वर्षीय मुलाचा मृत्यू झाला आहे. कार्तिक सुभाष रेवाळे (१३) असे या मुलाचे नाव आहे. विरार पूर्वेच्या साईनाथ नगर परिसरात शुक्रवारी सायंकाळी पाचच्या सुमारास ही दुर्घटना घडली. पतंग उडविण्यासाठी लहान मुले व तरुणाईने सुरुवात केली आहे. विरार पूर्वेच्या साईनाथ नगर मधील साई वैष्णवी अपार्टमेंटमध्ये राहणारा कार्तिक रेवाळे (१३) हा मुलगा शुक्रवारी संध्याकाळी ५.०० च्या सुमारास इमारतीच्या गच्चीवर पतंग उडवत होता. पतंग उडवत असताना अचानक त्याचा तोल जावून तो खाली कोसळला. त्याच्या छाती व पोटावर गंभीर दुखापत झाली. त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी विरार पोलीस ठाण्यात अपघाती मृत्यूची नोंद केली आहे.




**ग्रामपंचायत कार्यालय शेल्हाळ तालुका उदगीर येथे सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली यावेळेस मनोजभाऊ चिखले माजी पंचायत समिती सदस्य, ग्रामसेवक पी.वाय.पवार व गावातील प्रतष्ठित नागरीक उपस्थित होते.**

08 TO 14 JANUARY 2024 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 1/6/2024 7:41 PM Page 1






# देवणीत रेशन दुकानदारांचा बेमुदत संप



**देवणी/प्रतिनिधी**

संपूर्ण देशामध्ये रेशन दुकानदार यांच्या अनेक वर्षापासून विविध प्रलंबित मागण्यासाठी १ जानेवारी २०२४ पासून पुकारलेल्या देशव्यापी बंद मध्ये देवणी तालुक्यातील सर्व रेशन दुकानदार आपली रेशन दुकाने अनिश्चित काळासाठी बेमुदत बंदचा सलग आज ७ व्या दिवशी रेशन दुकान बंद आहेत. शासनाकडील प्रलंबित विविध मागण्या मान्य करत नाहीत तो पर्यत आंदोलन चालू राहील असे संघटनेच्या वतीने सांगण्यात आले आहे.

ऑल इंडिया फेअर प्राईस शॉप किपर फेडरेशन दिल्ली या संघटने कडून संपूर्ण देशभरा मध्ये रेशन दुकान बंद केले. या संपात अखिल महाराष्ट्र राज्य स्वस्त धान्य दुकानदार व केरोसिन वितरण परवानाधारक महासंघ यांनी या देश व्यापी रेशन वितरण बंदला पाठिंबा देत महाराष्ट्र राज्यातील ५२ हजार रास्त भाव दुकानदाराने १ जानेवारी पासून बंद मध्ये सहभागाचे झाले. त्या अनुषंगाने देवणी तालुक्यात सर्व ६० दुकानदाराने आपले रेशन दुकाने बंद करून बेमुदत संपावर गेले. असे रास्त भाव दुकानदार संघटना देवणी तालुका अध्यक्ष नितीन देशमुख यांनी या वेळी बोलताना सांगितले. अनेक वर्षापासून केंद्र व राज्य शासनाला वेळो वेळी आता पर्यत शेकडो निवेदन देऊन सुद्धा शासनाने कसल्याच पद्धतीची दखल रेशन दुकानदार यांची घेतली नाही. रेशन दुकानदार यांचे मार्जिनची रक्कम १० वर्षासून वाढ केलेली नाही. महागाई निर्देशांकानुसार प्रतिवर्षी वाढ करणे आवश्यक असताना देखील महागाई निर्देशांकानुसार मार्जिनदिली जात नाही. दहा वर्षापूर्वी ठरवून दिलेली मार्जिनची रक्कम राज्यातील रेशन दुकानदारांन परवडत नाही. शासनाने दिलेल्या एपॉस मशीन 2G असून त्या मशीन कालबाह्य झालेले आहेत. अंगठ्याचे ठसे घेत असताना नेटवर्क व सर्ववरचा वारंवार त्रास दुकानदारांना होते. असून अनेक वेळा या मशीनमुळे रेशन दुकानदार व लाभार्थी यांच्यात वाद विवाद विकोपाला गेल्याचे घटना घडत आहेत. या मशीनला लागणारे डाटा स्वखर्चातून रेशन दुकानदार यांना अनेक ...पान ६ वर

# वसईतील मेहतर समाजाला जातीचा दाखला देण्याच्या प्रक्रियेत दिरंगाई-शरदअण्णा तिगोटे

**वसई/प्रतिनिधी**

वसई, ठाणे, मुंबई व पालघर या परिसरात साधारणतः सन १८६० च्या अगोदरपासून मेहतर हरिजन समाज राहत आहे. या समाजाला रुखी वाल्मिकी या नावाने शासनाने नवीन ओळख दिलेली आहे. हा रुखी वाल्मिकी समाज वसई तालुक्यात सन १८६० च्या अगोदरपासून वास्तव्यास आहे. परंतु आपण येथे रुजू झाल्यापासून रुखी वाल्मिकी समाजाच्या अर्जदाराचे प्रकरण १९५० चा जात दर्शक पुरावा सादर करा सर्व नातेवाईकांचे कागदपत्र सादर करा असे उत्तर काढून प्रकरण निकाली काढत आहेत असे प्रजा सुराज्य पक्षाचे अध्यक्ष शरद तिगोटे यांनी वसई प्रांत अधिकाऱ्यांना पत्राद्वारे म्हटले आहे. ते पुढे म्हणाले, वसई नगरपरिषदेमध्ये हा समाज सफाई कामगार म्हणून कामाला होता व आहे. त्याचा उल्लेख वसई नगरपरिषदेमध्ये सफाई कर्मचारी म्हणून सेवा पुस्तकाच्या



माध्यमातून आढळून येतो. त्यामध्ये सोलंकी, चव्हाण, रावल अशी आडनावे आढळून येतात. त्यामुळे भिवंडी प्रांत व नवीन वसई प्रांत यांनी मेहतर रूखी वाल्मिकी समाजाला जातीचे दाखले दिले आहेत. असे असून सुद्धा ह्या समाजाला जातीचा दाखला नाकारला जात आहे. या उलट आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आदिवासी समाजाला आदिवासी प्रकल्प कार्यालयातून एक शिफारस पत्र घेऊन तसेच नात्यातल्या एखाद्या व्यक्तीचा १९५० चा जात दर्शक पुरावा असल्यास किंवा नसल्यास त्यांना जातीचा दाखला दिला जातो. मात्र रुखी वाल्मिकी मेहतर समाजाने नात्यातला एखाद्याचे १९५० चा जात दर्शक पुरावा देऊनही त्यांना जातीचा दाखला दिला जात नाही असे का असा सवाल केला आहे. हा भेदभाव का केला जात आहे? समाजाला जातीचे दाखले का ...पान ६ वर

# वसईत अण्णासाहेब वर्तक महाविद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती साजरी



**वसई/प्रतिनिधी**

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची १९३ वी जयंती आज वसईच्या अण्णासाहेब वर्तक महाविद्यालयात एकपात्री प्रयोग, पथनाट्य, गीते व्याख्यान अशा कार्यक्रमांनी साजरी करण्यात आली. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाने आयोजित केलेल्या या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून सुप्रसिद्ध लेखिका आणि विद्यावर्धिनी शिक्षण संस्थेच्या व्यवस्थापन मंडळाच्या सदस्य वीणा गवाणकर होत्या. विद्यावर्धिनी शिक्षणसंस्थेचे उपाध्यक्ष पांडुरंग गजानन नाईक यांच्या अध्यक्षतेखाली महाविद्यालयाच्या प्रांगणात हा कार्यक्रम झाला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला दीपप्रज्वलन आणि सावित्रीबाईंच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. प्रेरणा खेडेकर या विद्यार्थिनीने 'सावित्रीबाईंचे आजचे मनोगत' हा एकपात्री प्रयोग सादर केला. सांस्कृतिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी, ...पान ६ वर

# वसई-विरारमधील प्रवाशांना नवीन वर्षाची भेट; 'आपली बस' ॲपचे शानदार उद्घाटन



**वसई/प्रतिनिधी**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या परिवहन सेवेला १२ वर्ष पूर्ण झालेली आहेत. ३४व्या वसई तालुका कला क्रीडा महोत्सवाचे औचित्य साधून परिवहन सेवेच्या 'आपली बस' (apali bus) ॲपचे लोकार्पण आमदार हितेंद्र ठाकूर यांच्या उपस्थितीत व आमदार क्षितीज ठाकूर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी पालघर जिल्हा पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, माजी जिल्हाधिकारी प्रशांत नारनवरे, माजी महापौर प्रवीण शेट्टी याशिवाय विविध सामाजिक आणि राजकीय नेते उपस्थित होते. परिवहन बस सेवेचा लाभ घेत असताना वेळेचे नियोजन, बसेसची उपलब्धता आणि तपशील याशिवाय अपेक्षित ठिकाणी जाण्यासाठी लागणारा वेळ ही सर्व माहिती आपली बस या ॲप मधून प्रवाशांना घर बसल्या उपलब्ध होणार आहे. आपली बस या ॲप ची संक्षिप्त ...पान ६ वर

# पालघर जिल्ह्यातील मोडकळीस आलेले आरोग्य केंद्र दुरुस्त होणार

**वसई/प्रतिनिधी**

पालघर जिल्ह्यात जिल्हा परिषद प्रशासनाच्या अंतर्गत आरोग्य केंद्रे यांची अवस्था नाजूक आहे. ते नव्याने दुरुस्त करण्याची गरज आहे. ही गेल्या अनेक वर्षाची ओरड होती. आता मात्र शासनाने या केंद्राच्या दुरुस्तीसाठी पाऊल उचलले आहे. जिल्ह्यातील एकूण १६ आरोग्य केंद्राच्या नुतनीकरणाच्या कामाला सुरुवात होणार आहे. या आरोग्य केंद्राच्या दुरुस्तीला शासनाने मान्यता देऊन निधी मंजूर केला आहे. वसई-विरारसह पालघर जिल्ह्यातील मोडकळीस आलेल्या १६ प्राथमिक आरोग्य केंद्राच्या दुरूस्तीचा मार्ग मोकळा झाला आहे. (स्ट्रक्चर ऑडीट) करून त्यांच्या पुर्नबांधणीच्या कामाला शासनाने मान्यता दिली आहे. वसईतील नवघर, चंदनसार, भाताणे, सोपारा, आगाशी, कामण, पारोळ आणि निर्मळ येथील आठ प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या इमारतीची पडझड झाली होती. त्यामुळे दुर्घटनेचीही शक्यता होता. अशीच परिस्थिती पालघर जिल्ह्यातील इतर



केंद्रांमध्ये देखील वाईट परिस्थिती होती. त्यातील ८ आरोग्य केंद्र दुरुस्त केली जातील. जिल्ह्यातील १६ प्राथमिक आरोग्य केंद्रा आणि उपकेंद्रांची झालेल्या दुरवस्थेचा प्रश्न नुकत्याच झालेल्या हिवाळी अधिवेशनातही उपस्थित करण्यात आला होता. प्रहार जनशक्ती पक्षाने केंद्राच्या दुरूस्तीसाठी पाठपुरावा केला होता. डॉक्टर्स, परिचारिका यांच्या निवासस्थानांच्या दुरुस्तीच्या ...पान ६ वर

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते १००व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे उद्घाटन

# मराठी रंगभूमीचे प्रश्न सोडविण्यासाठी शासन कटिबद्ध -मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**पुणे/प्रतिनिधी**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते १०० व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे उद्घाटन करण्यात आले. मराठी रंगभूमीचे प्रश्न सोडविण्यासाठी लवकरच बैठकीचे आयोजन करण्यात येईल तसेच वृद्ध कलावंतांचे मानधन वाढविण्यात येईल, असे प्रतिपादन श्री. शिंदे यांनी केले. मोरया गोसावी क्रीडा संकुल चिंचवड येथील आद्य नाटककार विष्णुदास भावे रंगमंचावर आयोजित या कार्यक्रमाला उद्योगमंत्री तथा नाट्य संमेलनाचे निमंत्रक उदय सामंत, ज्येष्ठ नेते तथा नाट्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष खासदार शरद पवार, खासदार श्रीरंग बारणे, ९९ व्या नाट्य संमेलनाचे अध्यक्ष प्रेमानंद गज्वी, नाट्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ.जब्बार पटेल, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले, नाट्य परिषदेच्या पिंपरी चिंचवड शाखेचे अध्यक्ष भाऊसाहेब भोईर आदी उपस्थित होते.



मराठी माणसाच्या नाट्यप्रेमामुळे १०० वर्षे ही गौरवशाली परंपरा लाभली असल्याचे नमूद करून मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, देशात नाट्य कलेला २ हजार वर्षाची दीर्घ परंपरा लाभली आहे. मराठी रंगभूमीची सुरुवात विष्णुदास भावे यांच्या सीता स्वयंवर नाटकाने झाल्यानंतर मराठी रंगभूमीने अनेक बदल पाहिले आहेत. अनेक थोर कलाकारांच्या योगदानातून मराठी रंगभूमी बहरली. नाटक रसिकांच्या पसंतीस उतरण्यासाठी आशय, विषय, सादरीकरण, नेपथ्य, संगीत याची चाकोरी मोडण्याची गरज असते, मराठी रंगभूमीने ते केल्याने या रंगभूमीचा उत्कर्ष होत आहे. आज समाजमाध्यमांच्या काळातही प्रेक्षक नाटकांना गर्दी करतात. व्यावसायिक सोबत प्रायोगिक रंगभूमीलाही चोखंदळ प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळतो आहे. हजारो कलाकार आणि पडद्यामागील कलावंतांनी यासाठी योगदान दिले आहे. गेल्या १०० वर्षात सुवर्णकाळ अनुभवताना अनेक अडचणींवर मात करीत रंगभूमी पुढे जात आहे. म्हणूनच या रंगभूमीचा आनंद सोहळा दिमाखात साजरा होत आहे, असे मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले. मराठी रंगभूमीच्या विकासासाठी प्रयत्नशील असल्याचे नमूद करून श्री. शिंदे म्हणाले की, १०० वे नाट्य संमेलन असल्याने नाट्य संमेलनासाठी ९ कोटी ८३ लाख आणि मुंबई येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहासाठी १०कोटींचा निधी देण्यात आला आहे. सांस्कृतिक कार्य विभागाकडून नवी नाट्यगृहे उभारण्यात येणार आहेत मात्र हे करतांना नाट्य कलावंतांच्या मागणीनुसार जुन्या नाट्यगृहाच्या दुरुस्तीसाठी नगरविकास विभागाच्या माध्यमातून कार्यवाही करण्यात येईल. मराठी नाट्य परिषदेसाठी मुंबईत भूखंड देण्याबाबत ...पान ६ वर

# 'बजाज फिन्सर्व'चे एक पाऊल पर्यावरण पुरक दिशेकडे; गुंतवणूकदारांचा ही होणार फायदा!

**वसई/प्रतिनिधी**

बजाज फिन्सर्वच्या ॲप किंवा संकेतस्थळावर बुक केलेल्या एफडीवर गुंतवणूकदारांना आकर्षक व्याज दर नव्या वर्षाच्या दोन तारखेपासून मिळणार आहे. या बजाज फिन्सर्व च्या घोषणेमुळे गुंतवणूकदारांचा फायदा तर होणारच आहे मात्र पर्यावरण पुरक दिशेकडे ही एक पाऊल नववर्षात टाकले जाणार आहे. डिजिटल क्रांती च्या दिशेने टाकलेले हे एक पाऊल आहे. जे पर्यावरण पुरक असून गुंतवणूकदारांसाठी हा एक सहज व सोपा डिजिटल प्रवास असणार आहे. या डिजिटल प्रक्रीयेचा अवलंब करणाऱ्यांना उच्च व्याजदराचा लाभ देखील मिळणार आहे. मागील दोन वर्षात आमच्या ठेवीची संख्या दुप्पट झाली आहे. ही दुप्पट वाढ म्हणजे बजाज ब्रॅण्ड वर गुंतवणूकदारांनी दाखवलेल्या विश्वासाची पोच पावती आहे, अशी माहिती बजाज फिन्सर्व चे मुदत ठेवी आणि गुंतवणूक विभाग प्रमुख सचिन सिक्का ही या घोषणेच्या प्रसंगी दिली. जेष्ठ नागरिक यांनी ४२ महिन्यांसाठी मुदत ठेवी जर प किंवा संकेतस्थळावर बुक केल्या तर त्यांना ८.८५% वार्षिक व्याज दर मिळणार आहे. ६० वर्षाखालील ठेवीदारांना ८.६०% वार्षिक व्याज दर प किंवा संकेतस्थळावर बुक केल्या वर मिळणार आहे नवीन मुदत ठेवी आणि त्यांच्या परिपक्कते नंतर ४२ महिन्या करिता केल्या जाणाऱ्या ५ कोटी रुपयांपर्यंतच्या ठेवीवरील सुधारीत व्याज दर लागू केले जातील. ...पान ६ वर